# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक ०९-११-१९९२ ते ११-०२-१९९३**

**रजिष्टर क्र. १४**

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०९-११-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचा इतिवृत्तांत सोमवार, दिनांक ०९-११-९२ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती श्री.इकबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली समिती सभागृहात स्थायी समिती सुरूवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी व खालिल स. सभासद उपस्थित होते.**

१. मा.श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
२. मा.श्री.भगुरे तुळशीराम छगन
३. मा.श्री.अलीम बेग मिर्झा कलीम बेग
४. मा.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
५. मा.श्री.विजय गोविंदराव पालीवाल
६. मा.श्री.जावेद हसन खान कासीम हसन खान
७. मा.श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
८. मा.श्री.पेरकर विठठल कोंडाजी
९. मा.श्री.शिंदे मधुकरराव माणिकराव
१०. मा.श्री.ओक जयवंत केशवराव

**विषय क्र.३६३/१ :**

दिनांक १७.१०.१९९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>**संवाद :-**</u>

**श्री.अलीम बेग :** मनपा मालकीच्या नेहरू भवन या इमारतीची स्थिती अत्यंत खराब आहे.अ नेक खुर्च्यांची मोडतोड झालेली आहे. त्यामुळे नियोजिहत कार्यक्रमाचे वेळी अनेक अडचणी येतात. नेहरू भवन इमारतीचे दुरूस्ती बाबत संबंधित विभागाकडून अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तेव्हा या इमारतीची दुरूस्ती का करण्यात येत नाही चा खुलासा व्हावा.

**उप अभियंता (इमारती) :** आकाशवाणी तर्फे आयोजित कार्यक्रमाचे वेळी नेहरू भवन येथील खुर्च्यांची बरीच मोडतोड झालेली आहे.

**श्री.अलीम बेग :** ज्या जमिनीवर नेहरू भवनची इमारत उभी आहे या ठिकाणी वास्तव्य करीत असलेल्या नागरिकांची घरे संपादित करून नेहरू भवनची इमारत तयार करण्यात आलेली आहे. परंतू सद्याच्या परिस्थितीत या इमारतीचा योग्य उपयोग करून घेत येत नाही. ही बाब लक्षात घेता येत नाही. ही बाब लक्षात घेवून पुर्वी या ठिकाणी जे नागरीक वास्तव्य करीत होते त्यानांच पुन्हा त्यांच्या मुळ जमिनीवर बसवावे का ?

**शहर अभिंयता :** इमारत दुरूस्ती व देखभाल या शिर्षका अंतर्गत अर्थसंकल्पात केलेली तरतुद खर्च पडलेली आहे.

**मा.सभापती :** दुरूस्त अर्थसंकल्पाचे वेळी इमारत दुरूस्ती व देखभाल या शिर्षकात सदर कामाचा समावेश करून काम करून घ्यावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.विठ्ठल पेरकर :** विशेष स्थायी समितीने श्री.वाळूजकर यांचे अपिल प्रकरणी दिलेल्या रूलिंग बाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**श्री.नारायण फत्तेलेष्कर :** स्थायी समितीने दिलेल्या निर्णयानुसार कमलनयन बजाज हॉस्पीटल या इमारतीवर मालमत्ता कर आकारणी करण्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**श्री.अजिजुल्ला बेग :** कर्मचाऱ्यांचे अपील आणि काळया यादीत समाविष्ट केलेले गुत्तेदार या प्रकरणी स्थायी समितीच्या विशेष सभेची तारीख निश्चित करण्यात यावी आणि मागील स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे प्रत्येक महिन्याचे पहिल्या मिटींग मध्ये विविध विभागात झालेल्या ए-१ आणि रेटलिस्टच्या कामाची माहिती सभासदांना पुरविण्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा.उप आयुक्त :** सर्व शाखा प्रमुखांनी विविध विभागातर्फे झालेल्या ए-१ आणि रेट लिस्टच्या कामाची माहिती आगामी सभेच्या दोन दिवस अगोदर सचिव यांचेकडे देण्याची व्यवस्था करावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** विविध विभागातर्फे एन-१ आणि रेट लिस्टच्या कामाची माहिती प्रत्येक महिन्याचे पहिल्या सभेत सभासंदाना हस्तांतरीत करण्याबाबत स्थायी समितीने दिलेल्या निर्णयावर सचिव यांनी काय कार्यवाही केली. सचिव यांचे मार्फत शाखा प्रमुखांना खुलासा कळविण्यात आला काय ?खुलासा कळविला नसलयास तो का कळविला नाही या प्रकरणी विधि सललागार याचां सल्ला घेण्यात यावा.

**विधी सल्लागार :** अधिनियमाच्या नुसार स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाबाबत सचिव विभागातर्फे सर्व शाखा प्रमुख यांना खुलासा करणे आवश्यक आहे.

**मा.सचिव :** सर्व शाखा प्रमुख बैठकीस उपस्थित असतात व त्यांचेकडे मिटींगचा इतिवृत्तांत (विषयपत्रिका) नियमित पाठविला जातो त्या नुसार त्यांनी कार्यवाही करावयाची असते.

**श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.मधुकर शिंदे, श्री.अजिजुल्ला बेग, श्री.जावेद हसन खान** : नेहरू रोजगार योजने अतंर्गत सर्व सभासंदांना १०/११ फॉर्मचे वाटप करण्यात आले होते त्या पैकी किती फर्म मंजुर झाले सभासदांनी दिलेल्या फार्मवर काय कार्यवाही झाली या बाबत संबंधित विभागाला लेखी पत्र दिले आहे परंतू अद्या ाप खुलासा झालेला नाही. तेव्हा वरील प्रक्रणी माहिती देण्यात यावी मिळालेल्या माहितीनुसार या कार्यवाहीमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे.तसेच महाराष्ट्र शासनाच्या नियोजित मंत्रिमंडळ बैठकीनिमित्त मा. जिल्हाधिकारी यांचे निवास्थान विद्यापीठ विश्रामगृह इत्यादी ठिकाणी मनपाचे जे कामगार काम करतात त्यांना परत बोलावून घेण्यात यावे. जर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ मिटर बाबत पैसे घेते तेव्हा विद्यापीठ विश्रामगृह व इतर ठिकाणी सफाईसाठी आपले कामगार का ठेवण्यात येतात. त्या त्या विभागाकडे सफाई कामगार नाहीत का ? अशा विश्रामगृहाची सफाई सार्वजनिक बांधकाम विभाग करील अन्यत: मनपा सफाई कामगार तर्फे विद्यापीठ व इतर विश्रामगृहाची सफाई करण्यात आली असल्यास त्यांच्याकडून मोबदला वसूल करण्यात यावा.

**सहाय्यक आयुक्त -२ :** नियोजित मंत्रीमंडळ बैठकीसाठी विविध विभागाचे विश्रामगृह ताब्यात घेतले जातात म्हणून अशा ठिकाणी मनपा सफाई कामगार ठेवले आहेत.

**मा.सभापती :** प्रकल्प अधिकारी कर आकारणी अधिकारी सहाय्यक आयुक्त आणि सर्व संबंधित शाखा प्रमुखांनी आवश्यक ती माहिती पुढील सभेपर्यंत द्यावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** औरंगाबाद शहरात व्यवसाय करणाऱ्या नागरिकांना अन्न भेसळ प्रतिबंधक परवाना मिळाल्याशिवाय पोलीस विभागातर्फे आवश्यक तो परवाना दिला जात नाही. परंतू व्यवसायिक नागरीकांना मनपातर्फे देण्यात येणाऱ्या अन्न भेसळ प्रतिबंधक परवाना देतांना बराच त्रास दिला जातो.

**मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आरोग्य विभागात अन्न भेसळ प्रतिबंधक परवाना देण्याची प्रकरणे प्रलंबीत नाही किंवा अशा प्रकारचा परवाना देतांना त्रासही दिला जात नाही परंतु पोलीस आयुक्त कार्यालयाची स्थापना होण्यापुर्वी मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडून जो एक विशिष्ट प्रकारचा परवाना देण्यांत येतो. त्यात मनपातर्फे नमुन्याप्रमाणे नाहरकत प्रमाणपत्र द्यावयाचे आहे. हे नाहरकत प्रमाणपत्र देतांना विशिष्ट गोपनियता पाळावी लागते.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** श्री.वाळुजकर यांनी स्थायी समितीकडे दाखल केलेल्या अपिल प्रकरणी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**सहाय्यक आयुक्त-१ :** श्री.वाळुजकर यांचे अपिलप्रकरणी स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार श्री.वाळुजकर यांचे प्रकरण सादर केले असता सदर प्रकरणी शासनाचे प्रकरणी शासनाचे आदेश प्राप्त करावे असा शेरा मा.आयुक्तांनी दिला आहे.

**श्री.मधुकर शिंदे, श्री.विठ्ठल पेरकर, श्री.गिरजाराम हाळनोर :** श्री.वाळुजकर हे मनपा कर्मचारी आहे. संबंधितांवर झालेल्या अन्याय विरुध्द श्री.वाळुजकर यांनी नियमाप्रमाणे स्थायी समितीकडे अपिल केले आहे. व त्यावर स्थायी समितीने रुलींगही दिले आहे. तेव्हा या प्रकरणी शासनाचे आदेशाची काय गरज आहे. याचा अर्थ स्थायी समितीची बेईज्जती आहे.

**मा.उपआयुक्त :** प्रशासनातर्फे कर्मचाऱ्यांचे अपिल प्रकरणी विशेष स्थायी समितीमध्ये खुलासा केला आहे. तरी पण स्थायी समितीने अपिल प्रकरणी रुलींग दिले आहे. म्हणून मा.आयुक्त यांनी अपिल प्रकरणी शासनाकडे मार्गदर्शन मागितले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-४ प्रमाणे कर्मचाऱ्यास निलंबित करणे, कामावरुन काढून टाकणे खालच्या पदावर आणणे या शास्त्रीविरुध्द स्थायी समितीकडे अपिल करता येते.

**विधी सल्लागार :** कर्मचाऱ्याचे अपिलप्रमाणे स्थायी समितीने दिलेल्या रुलींगबाबत महापालिका अधिनियम कलम ४५ प्रमाणे सदर प्रकरणी शासनाचे मार्गदर्शन मागविले आहे.

**श्री.विठ्ठल पेरकर, श्री.मधुकर शिंदे :** कर्मचाऱ्यांच्या अपिल प्रकरणी स्थायी समितीने दिलेल्या रुलींगबाबत शासनाचे मार्गदर्शन घेण्याऐवजी सदर प्रकरणे स्थायी समितीकडे पाठविण्यांत यावी. महापालिकेमध्ये पदनिर्माण करतांना कमीटीची मंजूरी घेतली जाते.

**मा.उपआयुक्त :** स.सभासदांच्या सुचनेप्रमाणे अपिल प्रकरण नियमाप्रमाणे सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यांचा प्रश्न नाही. परंतू अधिनियमाचे कलम ५६ प्रमाणे ज्या प्रकरणात अपिल करता येते. अशा प्रकरणात कार्यवाही करता येते.

**श्री.अजिजुल्ला बेग, श्री.गिरजाराम हाळनोर :** स्थायी समितीने तुलनात्मकदृष्ट्या कमी असलेल्या दरपत्रकास मंजूरी दिलेल्या कामासाठी प्रशासनातर्फे २% अनामत रक्कम भरणे आणि कामाचा आदेश बाबतचे पत्रक लवकर दिले जात नाही. याबाबत विचारणा केली असता बजेट शिल्लक नाही असे सांगितले जाते. २% अनामत रक्कम भरणे व कामाचा आदेश देणे याबाबत चे पत्रक न मिळालेली सहा प्रकरणे आमच्याकडे आहेत. या प्रकरणी माहिती घेतली असता मनपाच्या तिजोरीत पैसा नाही. पण अर्थसंकल्पात तरतूद आहे. हे कसे याबाबत खुलासा व्हावा. त्यासाठी कराची वसुली वाढविण्यांत यावी. एखाद्या विभागीय कार्यालयाकडून कराची ९०% वसुली होते आणि दुसऱ्या विभागीय कार्यालयाकडून कराची ३०% वसुली होते. अशा प्रकारे कमी जास्त वसुली होत असतांनाही कामे हाती घेतांना याबाबींचा विचार केला जात नाही.

**मा.सभापती :** ठराव क्र.३०७ व ३२५ बाबत दिनांक १७.१०.९२ रोजी झालेल्या निर्णयानुसार स.सभासद श्री.विजय पालीवाल, विठ्ठल पेरकर व जावेद हसन खान यांचे समवेत सदरील कामाची पाहणी करण्यांत आली. असून संरक्षित भिंतीची आवश्यकता लक्षात घेता ठराव क्र.३०७ व ३२५ ला मंजूरी देण्यांत येते.

**श्री.जावेद हसन खान, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.विजय पालीवाल :** दिनांक १७.१०.९२ च्या सभेत ठराव क्र.३०० अन्वये औरंगपुरा भाजी मार्केटच्या नाल्यालगत रंगारगल्ली येथील डी.पी.रोडमध्ये बाधीत होणाऱ्या दुकानदारासाठी ३१ दुकाने बांधण्याच्या कामाकरिता मंजूरी दिलेली आहे. या रस्त्यावरील रहदारी लक्षात घेता आणि कामाची तातडी लक्षात घेता सदर काम तातडीने सुरु करण्याकरिता अधिनियमाच्या कलम ६७ (३) (सी) अन्वये गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचेमार्फत मा.आयुक्त यांनी सदर काम सुरु करण्याची कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे रंगारगल्ली येथील डी.पी.रस्त्यात बाधित होणाऱ्या दुकानदारांकरिता औरंगपुरा भाजी मार्केटच्या नाल्यालगत ३१ दुकाने बांधण्याचे काम कलम ६७ (३) (सी) अन्वये गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचे मार्फत करुन घेण्याची कार्यवाही मा.आयुक्त यांनी करावी.

तसेच ठराव क्र.३६१ बाबत स्थायी समितीच्या स.सभासदांबरोबर झालेल्या चर्चेनुसार सिडको एन-२ जे सेक्टर मधील गाळे धारकांना मार्च-१९८७ ते मार्च १९८९ पावेतो पाणीपट्टी माफ करण्यांत यावी.

**मा.उपअभियंता, स्पेशल ड्रेनेज :** ठराव क्र.३४९ मध्ये विशाल कन्स्ट्रक्शन ऐवजी विपुल कन्स्ट्रक्शन अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

**मा.सभापती :** दिनांक १७.१०.९२ च्या इतिवृत्ताबाबत सुचविलेल्या सर्व दुरुस्त्या करण्यात याव्यात.

**ठराव :**

दि.१७.१०.९२ च्या इतिवृत्तांमध्ये

१) ठराव क्र.३०० मध्ये कामाची तातडी लक्षात घेता प्रस्तावित काम अधिनियमाच्या कलम ६७ (३) (सी) अन्वये गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचे कडून करुन घेण्याबाबत मा.आयुक्त यांनी कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले अशी वाढ करण्यास.

२) ठराव क्र.३०७ च्या कामाची पाहणी करण्यात आली असून मरिमाता सेंटलिकं टँक साठी संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी आणि अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५.५०% कमी दराच्या श्री.एम.ए.अजिज यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. अशी दुरुस्ती करण्यास.

३) ठराव क्र.३२५ च्या कामाची पाहणी करण्यांत आली असून कोतवालपूरा येथील सी.टी.एस.क्र.२९-३० येथील रेखांकनाअंतर्गत मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरिता गुत्तेदार श्री.राजासिंग यांच्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधितांकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३.५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. अशी दुरुस्ती करण्यास.

४) ठराव क्र.३४९ मध्ये संस्थेचे नांव विशाल कन्स्ट्रक्शन ऐवजी विपुल कन्स्ट्रक्शन अशी दुरुस्ती करण्यास.

५) ठराव क्र.३६१ च्या विषयांत जुन्या संचिकेप्रमाणे दि.०१.०३.८७ ते ३१.०३.८७ पावेतो अशी नोंद घेण्यांत आली आहे. त्याऐवजी मुळ प्रस्तावानुसार जुन्या संचिकेप्रमाणे दि.०१.०३.८७ ते ३१.०३.८९ पावेतो अशी दुरुस्ती करण्यांस आणि या ठरावाबाबत झालेल्या चर्चेनुसार सिडको येथील ४८३ गाळे धारकांना प्रत्येकी रु.५७७/- या प्रमाणे मार्च १९८७ ते मार्च १९८९ पावेतो एकूण रक्कम रु.२,७८,६९१/- ची थकीत पाणी पट्टी माफ करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वरील अनु क्र.१ ते ५ मध्ये दर्शविलेल्या दुरुस्ती व वाढ यासह दि.१७.१०.९२ रोजी संपन्न झालेल्या इतिवृत्तास मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र.३६४/२ :**

वार्ड क्र.५१ मो.सिल्कमिल कॉलनी येथे ड्रेनेज लाईन अपरुटींग करुन २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.२,७२,०००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे. सदर काम करणे आवश्यक असल्याने मा.आयुक्तांनी अंदाजपत्रकास मंजूरी दिलेली आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

वार्ड क्र.५१ मो.सिल्कमिल कॉलनी येथे ड्रेनेज लाईन अप्रुटींग करुन २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता र.रु.२,७२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३६५/३ :**

वार्ड क्र.२० मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून ते भोईवाडा पर्यत यु.सी.आर.एस.गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.२,९३,०००/- चे तयार करण्यांत आले असून प्राप्त सरकारी अनुदानातून काम करणेस्तव मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२, दि.२०.०८.९२ नुसार दै.लोकमत व औरंगाबाद टाईम्स मध्ये जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.स.रफिकोद्दीन | - | १८.९९% कमी |
| २. | मे.आनंद बिल्डर्स | - | १८.४% कमी |
| ३. | मे.एम.एम.कन्स्ट्रक्शन | - | १२.६% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.९९% कमी दराची श्री.स.रफिकोद्दीन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

वार्ड क्र.२० मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून भोईवाडा पर्यंत यु.सी.आर.एस.गटार बांधण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १८.९९% कमी दराच्या श्री.सय्यद रफिकोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३६६/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रचनाकार कॉलनी येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१,७१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास दि.०९.०५.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदरचा खर्च शासकीय अनुदानातून १९९१-९२ या सदरातून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/अशअ/४३२/९२, दि.२८.०८.९२ द्वारे दै.देवगिरी तरुण भारत या वर्तमानपत्रात जाहिरात देवून प्रगट निविदा मागविल्या असता एकूण पाच कोऱ्या निविदा विक्री झाल्या व पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.खाजा मोईनोद्दीन | - | ३.८६% कमी |
| २. | श्री.डी.एस.जग्गी | - | २% कमी |
| ३. | श्री.पी.एम.चोरडीया | - | २.१% जास्त |
| ४. | मे.रे.कन्स्ट्रक्शन कं. | - | ११% जास्त |
| ५. | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | २०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.८६% कमी दराची श्री.खाजा मोईनोद्दीन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रचनाकार कॉलनी येथे रोडचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३.८६% कमी दराच्या श्री.खाजा मोईनोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. काम तातडीचे असल्यामुळे सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**विषय क्र.३६७/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्टँडर्ड कॉलनी रेल्वेस्टेशन येथे खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.६५,०००/- च्या अंदाजपत्रकास दिनांक १८.०६.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च शासकीय अनुदान सन १९९१-९२ या सदराखाली करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बां-२/४३२/९२, दि.२८.०८.९२ द्वारे दै.देवगिरी तरुण भारत या वर्तमानपत्रात जाहिरात देवून प्रकट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सलीम अहमद | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | ४% जास्त दराने |
| ३. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ११% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.सलीम अहमद यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्टॅंडर्ड कॉलनी रेल्वेस्टेशन येथे खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री.सलीम अहमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३६८/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा एम.आय.डी.सी.येथील बेडसे पल्प ते प्रोटॉन फॅन पर्यंत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.९,०४,०००/- चे अंदाजपत्रकास दि.०३.०७.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरचा खर्च शासकीय अनुदान १९९१-९२ या सदराखाली करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/अशअ/४३२/९२, दि.२८.०८.९२ द्वारे दै.देवगिरी तरुण भारत या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.डी.एस.जग्गी | - | १३% कमी |
| २. | श्री.पी.एम.चोरडीया | - | ११.८७% कमी |
| ३. | श्री.खाजा मोईनोद्दीन | - | ७.८६% कमी |
| ४. | मे.रे.कन्स्ट्रक्शन कं. | - | ६.६९% कमी |
| ५. | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | १% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% कमी दराची श्री.डी.एस.जग्गी यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेडसे पल्प ते प्रोटॉन फॅन पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% कमी दराच्या श्री.डी.एस.जग्गी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३६९/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एम.आय.डी.सी.चिकलठाणा येथील पुनम बिस्कीट ते एलोरा स्टील कंपनीपर्यंत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी

सन १९९१-९२ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रुपये ७,६४,२००/- चे अंदाजपत्रकास दिनांक ०३.०७.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च शासकीय अनुदान १९९१-९२ या सदराखाली करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/अशअ/४३२/९२, दि.२८.०८.९२ द्वारे दैनिक देवगिरी तरुण भारत या वर्तमान पत्रात जाहिरात देवून प्रगट निविदा मागविल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

१. श्री.पी.एम.चोरडीया - ११.८७% कमी
२. श्री.खाजा मोईनोद्दीन - ७.८६% कमी
३. श्री.डी.एस.जग्गी - ७.२५% कमी
४. मे.रे.कन्स्ट्रक्शन कंपनी - ३.३४% कमी
५. मे.गुरुनानक इंडस्ट्रीज - १% कमी दराने

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८७% कमी दराची श्री.पी.एम.चोरडीया यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एम.आय.डी.सी.चिकलठाणा येथील पुनम बिस्कीट ते एलोरा स्टील पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११.८७% कमी दराच्या श्री.पी.एम.चोरडीया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७०/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, घाटी स्लम भागात ४ मीटर रुंदीचे रस्त्यात बाधित होणाऱ्या घरांच्या भिंती पाडून त्या पुन्हा बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.१,८४,१००/- ला स्थायी समिती ठराव क्र.११५/१८, दि.२३.०६.९२ द्वारे मंजूरी मिळाल्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना दि.११.०८.९२ द्वारे दै.देवगिरी तरुण भारत, दै.लोकधर्म व दै.औरंगाबाद टाईम्स मध्ये विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता एकूण ११ निविदा विक्री झाल्या पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

१. श्री.कुलवंतसिंग - १०% जास्त
२. श्री.अलीउद्दीन - ०.०१% कमी

तुलनात्मकदृष्ट्या श्री.अलीउद्दीन यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी स्लम भागात चार मिटर रुंदीचे रस्त्यात बांधित होणाऱ्या घरांच्या भिंती पाडून त्या पुन्हा बांधणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या श्री.अलीउद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७१/९ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, दरवर्षीप्रमाणे यावर्षीही संक्रांती निमित्त चतुर्थश्रेणी स्त्री कर्मचाऱ्यांना साड्या व शर्ट-सलवार कापड देणे करिता मुंबई,

नागपूर व पुणे व स्थानिक वर्तमानपत्रातून जाहिरात प्रसिध्द करण्यांत आली होती. त्यानुसार पाच निविदापत्रके (दरपत्रके) प्राप्त झाली. तसेच दि.१५.०७.९२ ला खरेदी समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे शासन व शासन अंगीकृत उद्योगाकडून त्यांनी विक्री करत असलेल्या साड्यांचे पण दर मागवून खरेदी करण्यांत येईल. त्यानुसार प्राप्त निविदापत्रकाचे दर व शासन उद्योगाच्या साहित्याचे (साडी व इ) दर व दर्जा बाबत खरेदी समितीने खालीलप्रमाणे साहित्य (साडी व इ) खरेदी करण्याबाबत शिफारस केली आहे. मा.आयुक्तांनी खालील मुद्दे लक्षात घेता महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाच्या साड्या खरेदी करण्यास मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने शासन अंगिकृत महामंडळाकडून शासकीय, निमशासकीय व महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना कपडा घेतांना प्रथम प्राधान्य द्यावे असे आदेश आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाकडून साड्या खरेदी कराव्यात. शासनाच्या तजविज धोरणानुसार कोल्हापूर, पुणे, पिंप्री चिंचवड, महानगरपालिका व कल्याण महापालिकेने महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना साड्या आणि अन्य पोषाख हातमाग महामंडळाकडून खरेदी केलेले आहेत. त्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेने खरेदी कार्यवाही करावी.

अन्य एजन्सीच्या साड्या खरेदीत मनपाला अधिक खर्च करावा लागणार आहे. मनपाची आर्थिक बचत "हातमाग महामंडळाच्या साड्या खरेदी केल्याने होणार आहे."

हातमाग महामंडळाच्या साडीचे सूत ८०x८० काऊन्टचे आहे. त्यामुळे ती टिकाऊ व भरणारी आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता मा.आयुक्तांनी हातमाग महामंडळाच्या साड्या खरेदी करण्यास मान्यता दिलेली आहे. साड्या व साड्यांचा तपशिल व शर्ट सलवार, ओढणी कापड इ. दरांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

१) <u>महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, औरंगाबाद :</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नऊवारी साडी रंगीत रंग आकाशी, निळा, किनार गडद्, निळी व बॉर्डरवर ए.एम.सी.विणकाम | - | रु.१५५.०० प्र.नग |
| २. | सहावारी साडी रंग आकाशी, निळा, किनार गडद् निळी व बॉर्डरवर एम.एम.सी.विणकाम | - | रु.९२.०० प्र.नग |
| ३. | नऊवारी साडी पांढरी किनार गडद् निळी किनारवर ए.एम.सी.असे विणकाम | - | रु.१२५.०० प्र.नग |
| ४. | सहावारी साडी पांढरी किनार गडद् निळी किनारवर ए.एम.सी. विणकाम | - | रु.८५.०० प्र.नग |

२) <u>मे.रमेश बिन्नीज टेकस्टाईल्स :</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ब्लाऊस पीस ८० से.मी. प्र.नग रंग आकाशी निळा पशमिना बाँड | - | रु.२२.५० प्र.नग |
| २. | ब्लाऊज पीस ८० से.मी.प्र.नग रंग पांढरा ""पशमिना ब्रॉंड" | - | रु.२२.५० प्र.नग |

३) मे.संतोष सेल्स कॉर्पोरेशन :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शर्ट सलवार कापड ७ मी.प्र.नग रंग आकाशी निळा "गोल्डी ब्रॉंड" | - | रु.२६१ प्र.नग |
| २. | ओढणी कापड २.५ मी. प्र.नग रंग आकाशी निला "रुप कन्या ब्रॉंड" | - | रु.५५.०० प्र.नग |

वरीलप्रमाणे साड्या, शर्ट सलवार कापड व इतर साहित्य खरेदी करण्यास अंदाजित खर्च रु.२,६८,०००/- पर्यंत येईल. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**श्री.विठ्ठल पेरकर, श्री.जोवद हसन खान, श्री.विजय पालीवाल :** मनपा चतुर्थश्रेणी स्त्री कर्मचाऱ्यांना दरवर्षी ज्याप्रमाणे साड्या घेण्यांत येतात. त्याचप्रमाणे याही वर्षी साडी खरेदी करण्यांत याव्यात.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** भांडार विभागाचे प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवत असतांना खरेदी करावयाच्या साहित्यासाठी आलेल्या सर्व दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता का दिला जात नाही? त्यामुळे खरेदी करावयाच्या साहित्यासाठी कोणकोणती दरपत्रके आलेली आहेत व त्याचे दर काय आहेत याचा बोध होत नाही. यापुर्वीही साहित्य खरेदी करण्याच्या ठरावामध्ये फक्त आयटम नंबर दिले होते.

**मा.उपआयुक्त :** मनपा प्रशासनास आवश्यकतेनुसार ज्या ज्या वस्तु खरेदी कराव्यालागतात त्या त्या वस्तु खरेदीसाठी मुख्य लेखा परिक्षक यांचे अधिपत्याखाली अधिकाऱ्यांची एक खरेदी कमेटी स्थापन करण्यांत आली आहे. सदर कमेटी खरेदी करावयाच्या ॲटमची प्रत बघून शिफारस करते. यापुर्वी ज्या कामाकरिता दरपत्रके आली आहेत. यामध्ये १५१ प्रकारचे ॲटम आहेत. या सर्व ॲटमचा तुलनात्मक तक्ता संबंधित संचिकेसोबत जोडलेला आहे. या तुलनात्मक तक्त्यांची प्रत सर्व सभासदांना माहितीसाठी दिली जाईल.

**मा.सभापती :** विषय क्र.९ मधील अनुक्रमांक ३ वर मे.संतोष सेल्स कॉर्पोरेशन याऐवजी मे.रमेश संतोष जैन अशी दुरुस्ती करण्यांत यावी. तसेच स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे प्रशासनाने हातमाग साडीची शिफारस केली असली तरी दरवर्षी प्रमाणे मनपा चतुर्थश्रेणी महिला कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे साड्यांचे वाटप करण्यांत यावे.

| अ.क्र. | साडीचा प्रकार | | दर |
|---|---|---|---|
| १ | नऊवारी तुळशी साडी | - | रु.१९८/- |
| २ | सहावारी मेहक साडी | - | रु.१६०/- |
| ३ | नऊवारी पांढरी साडी | - | रु.२२५/- |
| ४ | सहावारी पांढरी साडी | - | रु.१०७/- |

आणि ब्लाऊज पीस व शर्ट सलवार ओढणी बाबत प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

महापालिका चतुर्थश्रेणी स्त्री कर्मचारी कामगारांना दरवर्षी वाटप करण्यांत येणाऱ्या गणवेशासाठी सर्वानुमते असे ठरले की, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मनपा चतुर्थश्रेणी स्त्री कामगारांना खालीलप्रमाणे टेरिकॉट साड्या, ब्लाऊज पीस व शर्ट सलवार ओढणीचे वाटप करण्यांत यावे.

| अ.क्र. | गणवेशाचा प्रकार | दर | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|
| अ) १. | नऊवारी तुळशी साडी | रु.१९८.५० | अरमान |
| २. | सहावारी मेहक साडी | रु.१६०.०० | अरमान |
| ३. | नऊवारी पांढरी साडी-तुळशी | रु.१९८.५० | अरमान |
| ४. | सहावारी पांढरी साडी मेहक | रु.१६०.०० | अरमान |
| ब) १. | ब्लाऊज पीस-८० से.मी.रंग आकाशी निळा "पशमिना ब्रॉंड | रु.२२.५० (प्र.नग) | मे.रमेश बिन्नीज टेकस्टाईल्स |
| २. | ब्लाऊज पीस-८० से.मी.रंग पांढरा पशिमीना ब्रॉंड | रु.२२.५० (प्र.नग) | मे.रमेश बिन्नीज टेकस्टाईल्स |
| क) १. | शर्ट सलवार कापड ७ मिटर रंग आकाशी निळा "गोल्डी ब्रॉंड" | रु.२६१.०० (प्र.नग) | मे.रमेश संतोष जैन |
| २. | ओढणी कापड २.५ मीटर रंग आकाशी निळा रुप कन्या ब्रॉंड | रु.५५.०० (प्र.नग) | मे.रमेश संतोष जैन |

वरीलप्रमाणे प्रस्तावित अ,ब व क मध्ये दर्शविलेल्या दराने गणवेशासाठी लागणारे कापड खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७२/१० :**

मा.आयुक्त यांचे मंजूरीनुसार मालमत्ता अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहेत की, चेलीपुरा ते रोषनगेट या शहर विकास योजनेतील ५० फुट रुंद रस्त्याचे विकास कामी संपादित व ताब्यात घेतलेल्या मिळकत न.भु.क्र.९७८४ च्या हिश्यातील साहित्य कार्यालयाने सन १९९० मध्ये नायब तहसिलदार यांचे उपस्थितीमध्ये ताब्यात घेतले होते व त्यांचे सिलमध्येच मनपा कार्यालयाच्या इमारतीमध्ये ठेवलेले होते.

या साहित्यावर हक्क नमूद करणारी व्यक्ती स्वत:हून हजर न झाल्या कारणाने कार्यालयाने स्थानिक वृत्तपत्रात जाहिर नोटीस जा.क्र./मनपा/मामअ/१७०५/९२, दि.२४.०७.९२ प्रसिध्द करुन या साहित्यावर मालकी हक्क प्रस्थापित करणाऱ्या व्यक्तीस जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत कार्यालयाशी संपर्क साधण्यास सुचित करण्यांत आले होते. मात्र त्याप्रमाणे मालकी हक्क प्रस्थापित करणारी व्यक्ती हजर न झाल्या कारणाने शेवटी या साहित्याचा जाहिर लिलाव करण्याचा निर्णय घेतला.

या साहित्यात टी.व्ही., रेडीओ, टेप रेकॉर्डर व त्याचे दुरुस्ती साहित्य इ.साहित्य समाविष्ट आहे. स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली (प्रथम) लिलाव जाहिर नोटीस क्र.मनपा/मामअ/२१९१/९२, दि.०१.१०.९२ नुसार दि.१५.१०.९२ रोजी लिलाव कार्यवाही करण्यांत आली होती. सर्वात जास्तची दोनबार बोली रक्कम रु.४,७७५/- ची प्राप्त झाली होती. जी प्रशासनाने नामंजूर करुन फेर जाहिर लिलाव नोटीस क्र.मनपा/मामअ/२२८३/९२, दि.२३.१०.९२ प्रमाणे फेर लिलाव दि.३०.१०.९२ रोजी करण्यांत आला. सरकारी बोली रु.१ लाखाची असतांना सर्वात जास्तची दोनबार बोली श्री.शेख नुर शे.हबीब यांची र.रु.८,०००/-

ची प्राप्त झालेली आहे. जी या कामी पुन्हा जाहिरात खर्चात अधिक वाढ होऊ नये ही बाब विचारात घेवून प्रशासनाने मंजूर केलेली आहे.

करिता वर उल्लेखित सर्वात जास्तची दोन बार बोली रक्कम रु.८,०००/- ला स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झाल्यास लिलाव मंजूर करुन संबंधिताकडून लिलावाची रक्कम वसुल करुन घेऊन लिलाव साहित्याचा त्यास ताबा दिला जाईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर :** चेलीपुरा ते रोशनगेट या रस्त्याचे विकास कामे नगर भूमापन क्र.९७/४ च्या हिश्यातील ताब्यात घेतलेल्या साठी त्याची सरकारी बोली रु.१,००,०००/- असतांना दोन वेळा जाहिर लिलाव करुनही प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कमी किंमतीची बोली प्राप्त झाली आहे. ही बाब विचारात घेता ताब्यात घेतलेल्या साहित्याची तांत्रिक दृष्ट्या किंमत ठरविण्यांत यावी म्हणजे त्यानंतर यावर विचार करता येईल.

**मा.उपआयुक्त :** चेलीपुरा ते रोषनगेट रस्त्याचे विकास कामे ताब्यात घेतलेल्या प्रस्तावित साहित्याचा लिलाव करण्याच्या दृष्टीने दोन वेळा जाहिरात प्रसिध्द करण्यांत आली त्यानुसार दोन वेळच्या जाहिरातीसाठी आलेल्या खर्च लक्षात घेता ताब्यात घेतलेल्या साहित्यासाठी पुन्हा जाहिरात खर्च करणे योग्य वाटले नाही म्हणून दुसऱ्यावेळी जाहीर लिलावाद्वारे आलेल्या लिलावाचा प्रस्ताव सभागृहापुढे मंजूरीसाठी ठेवला आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चेलीपुरा ते रोशनगेट या ५० फुट विकास रस्त्याचे वेळी नगर भूमापन क्र.९७८४ च्या हिश्यातील ताब्यात घेतलेल्या टी.व्ही., रेडीओ, टेपरेकॉर्डर, व त्यांच्या दुरुस्तीचे साहित्य इ.साहित्याकरिता फेर जाहिरातीनुसार श्री.शेख नूर शेख हबीब यांची रक्कम रु.८,०००/- ची सर्वात जास्तीची दोन बार बोलीस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७३/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गारखेडा सूत गिरणी ते सिडको या रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.५,२३,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५६/८२, दि.२१.०९.९२ द्वारे दै.मुकद्दस, दै.स्वरगंगा, दै.रहेबर, दै.मराठवाडा या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ०.५% कमी |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | २% जास्त |
| ३. | मे.पाल कन्स्ट्रक्शन कं. | - | ४% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराची श्री.मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा सुतगिरणी ते सिडको या रस्त्याचे खडी करण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराच्या मेसर्स एस.एच.असोशिएटस यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७४/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विष्णू नगर येथील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने रक्कम रुपये ५,२४,४००/- चे तयार करण्यांत आले असून त्यास दिनांक ०९.०५.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५६८२/९२, दि.२१.०९.९२ द्वारे दै.मुकद्दस, दै.स्वरगंगा, दै.रहेबर, व दै.मराठवाडा या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट फेरनिविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण (११) अकरा निविदा विक्री झाल्या. असून निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला एकूण (४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.एम.मंडोरे | - | ०.३०% कमी दराने |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | १% जास्त दराने |
| ३. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ५% जास्त दराने |
| ४. | मे.पॉल कन्स्ट्रक्शन | - | ५.१०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३०% कमी दराने श्री.एस.एम.मंडोरे यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विष्णूनगर येथील अंतर्गत खडी रस्त्याचे काम करण्यासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.३०% कमी दराच्या श्री.एस.एम.मंडोरे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७५/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद प्रभाग क्र.५४ येथील शांता नर्सिंग होम ते कांचनवाडी पुर्वेकडील टेकडी पर्यंत माती भराव काम व खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने रक्कम रुपये ७,७५,०००/- च्या अंदाजपत्रकास दिनांक १२.०२.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

सदरच्या कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५६८२/९२, दि.२१.०९.९२ द्वारे दै.मुकद्दस, दै.स्वरगंगा, दै.रहेबर, व दै.मराठवाडा या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट फेरनिविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण (११) अकरा निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित

वेळेला एकूण (३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१. मे.पॉल कन्स्ट्रक्शन - ०.५% कमी दराने
२. श्री.कुलवंतसिंग - ४% जास्त दराने
३. मे.एस.एच.असोशिएटस - ५% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराने मे.पॉल कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद प्रभाग क्र.५४ येथील शांता नर्सिंग होम ते कांचनवाडी पुर्वेकडील टेकडी पर्यंत माती भराव काम व खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.५% कमी दराच्या मे.पॉल कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७६/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मजनुहील ते दिल्ली गेट पर्यंत रोडचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने रक्कम रुपये ६,८८,०००/- च्या अंदाजपत्रकास दिनांक २९.१०.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरचा खर्च सन १९९०-९१ च्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

सदरच्या कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५६८२/९२, दि.२१.०९.९२ द्वारे दै.मुकद्दस, दै.स्वरगंगा, दै.रहेबर, व दै.मराठवाडा या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट फेरनिविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण (११) अकरा निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला एकूण (३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१. श्री.एस.ए.नवाब - ०.०३% कमी दराने
२. श्री.कैसर खान - ८.००% जास्त दराने
३. श्री.कुलवंतसिंग - ६% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराने श्री.एस.ए.नवाब यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मजनुहील ते दिल्ली गेट पर्यंत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०३% कमी दराच्या श्री.एस.ए.नवाब यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७७/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.हर्षनगर येथील कब्रस्थानाभोवती संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २९.०४.९२ ठराव क्र.५९२/७३ अन्वये रक्कम रु.१,७२,३४०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/शअ/६४८/९२, दि.०६.१०.९२ अन्वये (दुसरी वेळ) बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत दोन कोऱ्या निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत (२) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दिनांक २०.१०.९२ ला उघडण्यांत आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सलीम अहेमद | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | २.७५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. सलीम अहेमद यांची निविदा दर मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.हर्षनगर येथील कब्रस्थानाभोवती संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. सलीम अहेमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७८/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.३६ संजयनगर, बायजीपुरा येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची २५० मी.मी.व्यासाची ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.२,६४,६००/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.१५/९२, दि.०१.०६.९२ नुसार मंजूरी मिळालेली आहे. तसेच सदरचा खर्च स्लम विभागातील सन १९९२-९३ च्या भांडवली तरतूदीतून करण्यांत येईल.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.११/११३३/९२, दि.१९.०८.९२ ला दैनिक अजिंठा, आलमगीर टाईम्स व दै.लोकधर्म या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दहा निविदा विकण्यांत आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.संजय सिराजुद्दीन | - | ६.५% जास्त |
| २. | श्री.कैसर खान | - | ८% जास्त |
| ३. | मे.रामेश्वर कन्स्ट्रक्शन | - | ३.१% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१% जास्त दराचे मे.रामेश्वर कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रक आहे. परंतू सदर दर मान्य वाटत नसल्यामुळे मा.आयुक्त यांनी संबंधित गुत्तेदार मे.रामेश्वर कन्स्ट्रक्शन यांना दर वाटाघाटी करण्यास्तव बोलावण्यांत आले. मा.आयुक्त, मा.लेखापरिक्षक, कार्यकारी अभियंता यांच्या समक्ष दर वाटाघाटी करण्यांत आले. संबंधिताने ३.१% जास्त दराऐवजी ३% जास्त दराने काम करण्यांस संमती दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३६ संजयनगर बायजीपुरा येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची २५० व ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता मे.रामेश्वर कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित संस्थेकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७९/१७ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शिवाजी मैदान येथे कुत्राघराचे उर्वरित कामासाठी स्थायी समिती बैठक दि.२३.०७.९२ ठराव क्र.११७/२० अन्वये रक्कम रु.१,६७,९०२/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/शअ/५३०/९२, दि.११.०८.९२ अन्वये निविदा मागविले असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण-६ निविदा विक्री झाल्या. पैकी निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद गयासोद्दीन | - | ४.९७% जास्त |
| २. | श्री.एल.एम.पडघन | - | ८% जास्त |
| ३. | श्री.आर.एल.बारवाल | - | ६% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९७% जास्त दराची श्री.सय्यदल गयासोद्दीन यांचे निविदा दर होते. दर जास्त वाटत असल्यामुळे मा.आयुक्तांनी समक्ष वाटाघाटी करुन सदरचे काम ४.९७% जास्त दराऐवजी ३% जास्त दराने करण्यास मंजूरी दिलेली आहे.

तरी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची श्री.सय्यद गयासोद्दीन यांचे निविदा दर मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामाची पाहणी करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.३८०/१८ :**

पाणी पुरवठा - २ च्या दुरुस्ती व देखभालीच्या कामाअंतर्गत १००,१५०, २०० मी.मी.व्यासाचे सी.आय.स्लुस व्हॉल्वची अत्यंत गरज भासते व त्यामुळे काम पडून राहते. त्यासाठी स्लुस व्हॉल्व खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रुपये ४,९७,०७३/- तयार करण्यांत आले आहे. तरी प्रस्ताव मान्यतेसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा-२ च्या अंतर्गत दुरुस्ती व देखभालीच्या कामाकरिता आवश्यक असलेले १००,१५०,२०० मी.मी.व्यासाचे सी.आय.स्लुस व्हॉल्व खरेदी करण्यासाठी रक्कम रु.४,९७,०७३/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८१/१९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ड्रेनेज विभागासाठी ड्रेनेज लाईनवर एस.एफ.आर.सी.रिंग व ढापे टाकण्यासाठी सदरील ढापे खरेदी करण्याचे

अंदाजपत्रक रक्कम रुपये ९,००,०००/- चे तयार करण्यांत आलेले असून सदरील काम शासकीय अनुदान सन १९९१-९२ चे अंतर्गत करणेस्तव मंजूरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१६/१९५९/९२, दि.०७.१०.९२ ला दैनिक देवगिरी, तरुण भारत, लोकधर्म, औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात देवून "डी" फॉर्म नमुन्यात मॅनिफॅक्चरर कडून निविदा विकण्यांत आलेली होती. सदर निविदा मे.के.के.मेन होल आणि ग्रिटींग कंपनी नासिक यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा रक्कम रु.६५८.०० प्रति नग (शेट) दराची निविदा प्राप्त झालेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलनिःसारण वाहिनीवर टाकण्यांत येणाऱ्या एस.एफ.आर.सी.रिंग व ढापे खरेदी करिता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ६५८/- प्रति नग (सेट) या दराच्या मेसर्स के.के.मेनहोल ॲण्ड ग्रिटींग कंपनी नासिक यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. कामाची तातडी लक्षात घेता सदर प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८२/२० :**

मा.कार्यकारी अभियंता जलनिःसारण व पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका हद्दीकरिता विविध प्रकारच्या चौकोनी ढापे पुरविण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१,००,०००/- चे तयार करण्यांत आले असून प्राप्त सरकारी अनुदानातून खरेदी करणेस्तव मा.आयुक्त, महोदयांनी मंजूरी दिलेली आहे. आदेशावरुन विविध प्रकारच्या चौकोनी ढापे पुरविणे बाबत कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र./१६/१३५८/९२, दि.०७.१०.९२ नुसार दैनिक देवगिरी, तरुण भारत, लोकधर्म, व औरंगाबाद टाईम्स दैनिकात जाहिरात देवून डी फॉर्म निविदापत्रके मागविले असता एक निविदापत्रक विकण्यांत आले असून निविदापत्रक के.के.मेनहोल ग्रिटींग्ज ॲण्ड कंपनी यांचे दरपत्रक असून खालीलप्रमाणे दरपत्रक आहे.

१. के.के.मेनहोल ग्रिटींग्ज - ०.३८९% कमी

अंदाजपत्रकीय दरापेक्षा (% रेट पध्दतीने विचार केल्यास) ०.३८९% कमी दराचे के.के.मेनहोल ग्रिटींग्ज ॲण्ड कं. यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकेच्या कामाकरिता आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या चौकोनी ढाप्याचे पुरवठ्यासाठी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.३८९% कमी दराच्या (% रेट पध्दतीने विचार केल्यास) मे.के.के.मेनहोल ग्रिटींग्ज अँण्ड कंपनी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. कामाची तातडी लक्षात घेता सदर प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८३/२१ :**

मा.कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चिंतामणी कॉलनी येथील १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.१,४४,६३५/- चे तयार करण्यांत आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय व स्थायी समितीचा ठराव क्र.१२२/२५, दि.२३.०६.९२ नुसार मंजूरी मिळालेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र./११/९८२/९२, दि.०९.०७.९२ नुसार दैनिक लोकमत टाईम्स व औरंगाबाद टाईम्स दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदापत्रके मागविले असता एकूण पाच निविदापत्रके विकण्यांत आल्या होत्या. त्यापैकी दोनच निविदापत्रके प्राप्त झाली असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहेत.

१. श्री.नरेंद्र एस.शेट्टी - अंदाजपत्रकीय दराने
२. मे.रामेश्वर कन्स्ट्रक्शन - ५% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.नरेंद्र एस.शेट्टी यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिंतामणी कॉलनी येथे १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री.नरेंद्र एस.शेट्टी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *<u>ऐन वेळचे विषय</u>*

**विषय क्र.३८४/२२ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मुलमची बाजार ते घासमंडी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. सन १९९२-९३ च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु.२,२२,०२८/- चे तयार करण्यांत आले असून स्थायी समितीची कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा नोटीस क्र.९/जा.क्र./मनपा/अशअ/४३२/९२, दि.२८.०८.९२ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विकल्या गेल्या त्यापैकी दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक ०१.१०.९२ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारांसमक्ष उघडण्यांत आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

१. मे.रे.कन्स्ट्रक्शन - ३% जास्त
२. श्री.खाजा मोईनोद्दीन - अंदाजपत्रकाच्या दराने

वरीलपैकी श्री.खाजा मोईनोद्दीन यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दराची आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुलमची बाजार ते घासमंडी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराच्या श्री.खाजा मोईनोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८५/२३ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मोहल्ला गणेश कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या

डी.एस.आर.सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार र.रु.१,११,६२०/- चे बनविण्यांत आले असून स्थायी समितीमध्ये अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा नोटीस क्र.९/जा.क्र./मनपा/अशअ/४३२/९२, दि.२८.०८.९२ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण चार निविदा विकल्या गेल्या त्यापैकी चारही निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक ०१.१०.९२ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदरासमक्ष उघडण्यांत आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.डी.एस.जग्गी | - | अंदाजपत्रकाच्या दराने |
| २. | मेसर्स रे.कन्स्ट्रक्शन | - | ११.८०% जास्त |
| ३. | श्री.पी.एम.चोरडीया | - | २% जास्त |
| ४. | श्री.खाजा मोईनुद्दीन | - | ७.८६% कमी |

वरीलपैकी श्री.खाजा मोईनुद्दीन यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ७.८६% कमी दराची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणेश कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ७.८६% कमी दराच्या श्री.खाजा मोईनोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८६/२४ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, दिलरस व बुऱ्हानी कॉलनी येथील रस्त्याची २० मी.मी.जाडीचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. सन १९९२-९३ च्या दराप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु.३,१२,४२५/- चे तयार करण्यांत आले असून स्थायी समितीमध्ये सदरील कामास मान्यता प्राप्त झाली आहे.

सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा नोटीस क्र.९/जा.क्र./मनपा/अशअ/४३२/ ९२, दि.२८.३०८.९२ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण पाच निविदा विकल्या गेल्या. त्यापैकी पाचही निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक ०१.१०.९२ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.पी.एम.चोरडीया | - | २.७% कमी |
| २. | मे.रे.कन्स्ट्रक्शन | - | ८.८८% कमी |
| ३. | श्री.डी.एस.जग्गी | - | ५% कमी |
| ४. | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | २०% जास्त |
| ५. | श्री.खाजा मोईनोद्दीन | - | ७.८६% कमी |

वरीलपैकी मेसर्स रे.कन्स्ट्रक्शन यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ८.८८% कमी दराची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिलरस व बुऱ्हानी कॉलनी येथील रस्त्याचे २० मी.मी.जाडीचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ८.८८% कमी दराच्या मे.रे.कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८७/२५ :**

अग्निशमन दलासाठी अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, किर्लोस्कर के.पी.एफ.-१६०० क्षमतेच्या ट्रेलर पंप खरेदी करावयाचा आहे. सदरील पंप शासकीय अनुदान १९९१-९२ च्या वाहन खरेदी हेड मधून करावयाचा आहे.

किर्लोस्कर के.पी.एफ.-१६०० साठी एकूण खर्च ६,२२,७२०.०० रुपये येणार आहे. त्यामध्ये संपूर्ण टॅक्स धरलेले आहेत. या पुर्वीचा अ.श.दलचा ट्रेलर पंप २२ वर्षाचा जुना असल्यामुळे लिलावात काढला आहे. व अ.श.दलाकडे मोठ्या आगीवर नियंत्रण आणण्यासाठी ट्रेलर पंप आवश्यक आहे. करिता किर्लोस्कर के.पी.एफ.१६०० खरेदी करण्याच्या प्रस्ताव मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन दलाकडे मोठ्या आगीवर नियंत्रण आणण्यांसाठी आवश्यक असलेला किर्लोस्कर के.पी.एफ.-१६०० ट्रेलर पंप खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये ६,२२,७२०/- च्या (संपूर्ण टॅक्सेससह) खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८८/२६ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९२-९३ सालात कार्यालयास लागणारे छपाई खरेदी करण्याकरिता निविदा दुसऱ्यांदा प्रसिध्द करण्यांत आली असता प्राप्त निविदा धारकांनी दाखल केलेल्या कागदाच्या व इतर साहित्याचे नमुने खरेदी समितीत ठेवण्यांत आलेले होते. खरेदी समितीने केलेल्या शिफारशीनुसार व मा.आयुक्तांनी मान्यता दिल्यानुसार खालीलप्रमाणे निविदाधारकांच्या नावासमोर दर्शविण्यांत आलेल्या अनुक्रमांकाच्या दरास मान्यतेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

१. मे.श्री.गणेश मुद्रणालय :
क्र.११-१५-१६-१७-१८-२८-२५-२७-२८-२९-३८-३९-४७-४८-४९-६१-६५-६९-७३-७४-७७-७८-७९-८०-८५-८६-८७-९०

२. मे.लिबर्टी लॉ बुक बाईंडर ॲण्ड प्रिंटर्स :
क्र.१-२-३-४-५-६-७-८-९-१०-११-१२-१३-१४-१९-२०-२१-२२-२३-२६-३०-३१-३२-३३-३४-३५-३७-४२-४३-४४-४५-४६-५०-५१-५३-५४-५५-५६-५७-५८-५९-६०-६२-६३-६४-६६-६७-६८-७०-७१-७२-७५-७६-८१-८२-८३-८४-८८-८९-९१-९३-९४-९५-९६-९८-१०१-१०२-१०३

३. मे.श्रीकृष्ण प्रिंटींग प्रेस :
क्र.३३-३६-४०-९२-९७-१००-१०५.

४. मे.कमर्शियल प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स :
क्र.४१-५२-९९-१०४

अनुक्रमांक ११ चे दर मे.श्री.गणेश मुद्रणालय व मे.लिबर्टी लॉ-बुक बाईंडर ॲण्ड प्रिंटर्स व अनु.३३ चे दर मे.श्रीकृष्ण प्रिंटींग प्रेस व लिबर्टी लॉबुक बाईंडर यांचे सम आहेत व वरीलप्रमाणे अनुक्रमांकाच्या दरास प्रकरण मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९२-९३ या वर्षात कार्यालयास लागणारे छपाईचे कामाकरिता दुसऱ्यांदा निविदानुसार निविदाधारकांचे नावांसमोर दर्शविलेल्या ॲटम करिता सर्वानुमते मान्यता देण्यांत येते.

१. मे.श्री.गणेश मुद्रणालय :
क्र.११-१५-१६-१७-१८-२८-२५-२७-२८-२९-३८-३९-४७-४८-४९-६१-६५-६९-७३-७४-७७-७८-७९-८०-८५-८६-८७-९०

२. मे.लिबर्टी लॉ बुक बाईंडर ॲण्ड प्रिंटर्स :
क्र.१-२-३-४-५-६-७-८-९-१०-११-१२-१३-१४-१९-२०-२१-२२-२३-२६-३०-३१-३२-३३-३४-३५-३७-४२-४३-४४-४५-४६-५०-५१-५३-५४

३. मे.श्रीकृष्ण प्रिंटींग प्रेस :
क्र.३३-३६-४०-९२-९७-१००-१०५.

४. मे.कमर्शियल प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स :
क्र.४१-५२-९९-१०४

एकाच ॲटमकरिता समान दर असलेल्या ॲटमचे काम सम प्रमाणात विभागून देण्यांत यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८९/२७ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९२-९३ सालात सॅनिटेशन साहित्य खरेदी करण्याकरिता निविदापत्रके मागविण्यांत आले होते. प्राप्त निविदाधारकांनी दाखल केलले नमुना साहित्य खरेदी समितीच्या शिफारशीनुसार व अति.शहर अभियंता यांनी तपासून दिलेल्या अहवालानुसार प्राप्त निविदाधारकांनी दिलेल्या तुलनात्मकदृष्ट्या कमी असलेल्या साहित्याच्या दराचे साहित्य खरेदी करण्याबाबत केलेल्या शिफारशीनुसार खालीलप्रमाणे निविदाधारकांच्या नांवासमोर दर्शविण्यांत अनुक्रमांकाच्या दरास मान्यतेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

१. मे.इन्शा हार्डवेअर
क्र.२-१७-१८-२०-२२-२३-२५-२६-३१-३७-३९-४२.

२. महाराष्ट्र राज्य को-ऑप कन्झुमर्स फेड. लि.औरंगाबाद
क्र.१३-२९-३८-४३-४४.

३. मे.मनोज इंटरप्राईजेस :
क्र.१-३-४-५-६-७-८-९-१०-११-१२-१५-१६-१९-२१-२३-२४-२७-२८-३०-३२-३३-३४-३५-३६-३७-३८-३९-४०-४१.

४. मे.न्यु भारत स्टोअर्स :
क्र.१४-२४-२९.

तसेच ज्या निविदाधारकांचे दर एकाच साहित्याचे सम प्रमाणात आहेत. ते साहित्य त्यांच्याकडून सम प्रमाणात घेण्यांत येतील. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९२-९३ सालात कार्यालयास आवश्यक असलेले सफाई साहित्य खरेदी करिता खालील दर्शविलेल्या निविदाधारकांचे नावासमोर दर्शविण्यांत आलेल्या क्रमांकाच्या दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१. मे.इन्शा हार्डवेअर
क्र.२-१७-१८-२०-२२-२३-२५-२६-३१-३७-३९-४० व ४२.

२. महाराष्ट्र राज्य को-ऑप कन्झुमर्स फेड. लि.औरंगाबाद
क्र.१३-२९-३८-४३-४४.

३. मे.मनोज इंटरप्राईजेस :
क्र.१-३-४-५-६-७-८-९-१०-११-१२-१५-१६-१९-२१-२३-२४-२७-२८-३०-३२-३३-३४-३५-३६-३७-३८-३९-४०.

४. मे.न्यु भारत स्टोअर्स :
क्र.१४-२४-२९.
समान दर असलेल्या ॲटमचे काम सम प्रमाणात विभागून द्यावे.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९०/२८ :**

पाणी पुरवठा विभाग सिडको भागातील जलवाहिन्यांच्या स्लुस व्हॉल्वच्या चेंबर साठी एस.एफ.आर.सी.कव्हर व फ्रेमची अत्यंत गरज असते. कारण स्लुस व्हाल्व मुळे रस्त्यात बऱ्याच ठिकाणी खड्डे पडून त्यात माती जाते. त्यामुळे व्हाल्व खोल बंद करण्यास त्रास होतो. तरी सदर कव्हर व फ्रेम एस.एफ.आर.सी.खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.४,८१,२८०/- चे तयार केलेले आहे. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको भागातील पाणी पुरवठा जलवाहिन्या च्या स्लुस व्हॉल्व चेंबरवर एस.एफ.आर.सी.फ्रेम कव्हर टाकणे आवश्यक असल्यामुळे एस.एफ.आर.सी.चे फ्रेम व कव्हर खरेदी करण्यासाठी रक्कम रु.४,८१,२८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९१/२९ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ स्टेशन रोड औरंगाबाद यांनी अर्ज देवून विनंती केली आहे की, उस्मानपुरा चौक येथील कै.विनायकरावजी पाटील यांचा अर्धपुतळा सध्या उस्मानपुरा चौकाच्या अगदी रस्ता लगत आलेला आहे. प्रत्यक्ष पुतळा आणि रस्त्यावरची वाहतुक यामध्ये ३/४ फुटाचे अंतर उरते. तसेच पुतळा इतक्या रस्त्यालगत असल्यामुळे तो तितकासा शोभादायक वाटत नाही. त्याकरिता सध्याच्या जागेवरुन पुतळा स्थलांतरीत करुन उस्मानपुरा चौकाच्या मध्यभागी आणण्यात यावा. व सध्या आहे याच जागेत २० ते ३० फुट मागील बाजूस पुतळा हलविणे बाबत विनंती केलेली आहे. सदरील स्थलांतराचा खर्च संस्था स्वतःच्या निधीमधून करेल.

करिता वरील अर्धपुतळ्याचे स्थलांतराच्या परवानगी बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.मधुकर शिंदे :** उस्मानपुरा चौक येथील कै.विनायकराव पाटील यांचा अर्धपुतळा प्रस्तावित प्रमाणे स्थलांतरीत करण्यास हरकत नाही. परंतू उरलेली सर्व जागा महानगरपालिकेच्या मालकीचीच राहील याची काळजी घेण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या विनंती नुसार उस्मानपुरा चौकाच्या अगदी लगत असलेला आणि प्रत्यक्ष पुतळा व रस्त्यावरची वाहतुक

यातील कमी अंतर लक्षात घेता या चौकात असलेला कै.विनायकरावजी पाटील यांचा अर्ध पुतळा सध्याच्या जागेवरुन उस्मानपुरा चौकाच्या मध्यभागी याच जागेत २० ते ३० फुट मागील बाजुस हलविण्यास सर्वानुमते परवानगी देण्यांत येते. उक्त पुतळा स्थलांतराबाबत येणारा खर्च मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या निधीतून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ३०.११.१९९२ रोजी भरलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक ३०.११.१९९२ रोजी दुपारी ३.४५ वाजता समिती सभागृहात मा.सभापती ॲड.श्री.इकबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेत कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
२. श्री.भगुरे तुळशीराम छगन
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
५. श्री.पालीवाल विजय गोविंदलाल
६. श्री.जावेद हसन खान कसीम हसन खान
७. श्री.मोहंमद इस्माईल अब्दुल करीम
८. श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
९. श्री.पेरकर विठ्ठल कोंडाजी
१०. श्री.शिंदे मधुकर माणिकराव
११. श्री.ओक जयवंत केशवराव

**विषय क्र.३९२/१ :**

दिनांक ०९.११.९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

**श्री.मोहंमद इस्माईल :** सार्वजनिक दिवा बत्तीच्या व्यवस्थेसाठी वार्ड क्र.३२ मधील लावण्यांत येणारे सोडीयम व्हेपरचे पिवळे लाईट गेल्या चार-पाच महिन्यापासून माझे घरी पडून आहे. याबाबत संबंधित विभागाचे कर्मचाऱ्यांना वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. परंतू अद्याप काम झालेले नाही. तेव्हा संबंधित विभागाकडे कर्मचारी वर्ग कमी आहे काय? आणि माझे घरी पडून असलेले लाईट सार्वजनिक ठिकाणी लावण्यासाठी किती वेळ थांबावे लागेल. याबाबत खुलासा व्हावा. तसेच बायजीपुरा डी.पी.रोडवर मोठमोठाले खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे या रस्त्यावर वाहन चालविणे कठीण झाले आहे. हीच परिस्थिती इंदिरानगर भागातील रत्याची आहे. या रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रक व दरपत्रके मंजूर झालेल्या आहेत. तेव्हा ही कामे केव्हा होणार? काम होण्यास विलंब असेल तर किमान पॅचवर्कचे काम तरी हाती घेण्यांत यावेत.

**अतिरिक्त शहर अभियंता :** इंदिरानगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणाऱ्या कामाचे दरपत्रक मंजूर झालेले आहेत. परंतू याच रस्त्यावरील ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर डांबरीकरणाच्या कामास सुरुवात करण्यांत येईल. तसेच बायजीपुरा आणि इंदिरानगर या भागातील पॅचवर्कचे काम करुन घेण्यांत येईल.

**श्री.तुळशीराम भगुरे :** हर्सुल भागातील मनपा चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे निवासाचे वाटप होऊन बराच कालावधी लोटलेला आहे. या ठिकाणी सर्व घरातील नगर परिषद

कर्मचारी वास्तव्य करीत आहेत. परंतू अद्याप त्याठिकाणी लाईटची व्यवस्था करण्यांत आलेली नाही. याबाबत मागील सभेतही चर्चा झालेली आहे. नगर परिषद कर्मचारी राहात असतांनाही या ठिकाणी अद्याप विद्युत पुरवठा होवू नये ही खेदाची बाब आहे. तेव्हा तेथील विद्युत कनेक्शनचे काम केव्हा होणार याचा खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** हर्सुल येथील मनपा चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानास विद्युत कनेक्शन करण्याबाबत आवश्यक ती रक्कम म.रा.वि.मंडळाकडे जमा करण्यांत आली आहे. यानंतर कार्यवाही अभियंता म.रा.वि.मं.याची भेट घेऊन विद्युत कनेक्शनचे काम करण्याबाबत वारंवार मागणी करण्यांत आलेली आहे.

**श्री.नारायण फतेलष्कर :** सार्वजनिक दिवा बत्तीच्या व्यवस्थेसाठी विद्युत पोल बाबतची आवश्यक ती रक्कम म.रा.वि.मं.कडे भरली आहे व त्याबाबत पत्रही दिले आहे. परंतू अद्याप म.रा.वि.मं.तर्फे पोल देण्यांत आलेले नाही.

**श्री.जयंवत ओक :** ज्या ज्या नगरसेवकांनी त्यांचे प्रभागात विद्युत पोल बसविण्याची मागणी केली असून त्याबाबतचे कोटेशन म.रा.वि.मं.कडून आले असल्यास त्याबाबतची रक्कम त्वरीत भरण्यांत यावी. म्हणजे सर्व काम सुरु होईल.

**मा.सभापती :** जिल्हा नियोजन व विकास मंडळ योजनेनुसार पोलासाठी आवश्यक त्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे. याबाबत मा.महापौर यांनी संबंधीतांशी चर्चा केली त्यानुसार जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी सुचनाही दिलेल्या आहेत.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या योजनेनुसार पोल साठी आवश्यक असलेलो पैसा पुढील वर्षी येणार असेल तर महापालिकेच्या अर्थसंकल्पातून याबाबींची पुर्तता करुन काम पूर्ण करुन घ्यावे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** ज्या सं.नगरसेवकांच्या मागणीनुसार पोल बाबतचे कोटेशन आले आहे. परंतू ज्या पोलबाबत मागणी करुनही अद्याप कोटेशन आले नाही. त्याबाबत काय कार्यवाही करण्यांत येईल याचा खुलासा व्हावा.

**अति.शहर अभियंता :** ज्या पोलबाबत मागणी करुनही अद्याप त्याबाबतचे कोटेशन आले नाही. त्याबाबत संबंधित विभागास स्मरणपत्र दिले आहेत.

**श्री.मोहंमद इस्माईल :** मोहल्ला नवाबपुरा येथील मटन मार्केटच्या इमारतीवर वाचनालयाची इमारत बांधणे बाबतचा विषय गेल्या चार/सहा महिन्यापासून प्रलंबित आहे. तेव्हा सदर प्रस्तावास आजच्या सभेत ऐनवेळी मंजूरी देण्यांत यावी.

**मा.सभापती :** हर्सुल येथील मनपा चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या निवासास विद्युत कनेक्शन ची व्यवस्था पुर्ण करुन घेण्याबाबत संबंधित प्रभागाचे नगरसेवक वेळोवेळी अतिरिक्त शहर अभियंता यांचे सोबत म.रा.वि.मंडळास भेट देतील व ते काम पूर्ण करुन घेतील.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** मनपाची न्यायप्रविष्ट प्रकरणे हाताळण्यासाठी जे विधिज्ञ नेमले आहे. त्या विधीज्ञांना प्रत्येक केस बाबत किती फिस दिली जाते याचा खुलासा व्हावा.

**श्री.अजिजुल्ला बेग :** आजच्या स्थायी समिती सभेस प्रशासनाचे काही अधिकारी हजर नसल्याचे दिसते याचे कारण काय?

**मा.उपआयुक्त :** सर्व अधिकारी सभेस उपस्थित राहिल्यामुळे वेळ वाया जावून कामे प्रलंबित होतात. ही बाब लक्षात घेता मा.आयुक्त यांनी पत्राद्वारे वर्ग-२ चे अधिकाऱ्यांना सभेच्या वेळी कार्यालयात हजर राहण्याबाबत सूचना दिली

असून सभागृहास आवश्यकता भासली तर ते सभागृहात हजर होतील. याशिवाय सभासदांच्या प्रश्नांची नोंद इतिवृत्तात घेतली जाते. त्या बाबतचे उत्तर वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांतर्फे पुढील सभेत देण्यांत येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** ज्योतीनगर भागातील कामाचे टेंडर उघडण्यांत आले आहे. परंतू अद्याप काम झालेले नाही. तसेच या भागातील दुरुस्ती व देखभालचे काम योग्य प्रकारे होत नाही. रोड क्रॉसींग वरील पाईप फुटला असून त्याबाबत संबंधित गुत्तेदार श्री.आनंद यांना सूचना दिल्या असता ते काम करत नाही. तेव्हा दुरुस्ती व देखभालचे काम दुसऱ्या गुत्तेदारांकडून करुन घेण्यांत येईल अशी व्यवस्था करावी.

**कार्यकारी अभियंता :** स.सभासदांच्या सुचनेप्रमाणे दुरुस्ती व देखभालचे काम दुसऱ्या गुत्तेदारांकडून करुन घेण्यांची व्यवस्था करता येईल.

**श्री.मधुकर शिंदे :** श्री.भिकन पटेल यांचे अपिल प्रकरणी सभागृहात झालेल्या चर्चेप्रकरणी प्रशासनाने त्यावर काय कार्यवाही केली याचा खुलासा अद्याप झालेला नाही.

**मा.उपआयुक्त :** कर्मचाऱ्यांच्या अपिल प्रकरणी दि.०९.११.९२ रोजी झालेल्या चर्चेच्या प्रसंगी प्रशासनातर्फे खुलासा करण्यांत आलेला आहे. (यावेळी ठराव क्र.३६३/१ मधील खुलासा पुन्हा वाचून दाखविला)

**श्री.मधुकर शिंदे :** श्री.बोराडे यांना हे पद कसे दिले. श्री.बोराडे नियमात बसतात का?

**श्री.अजिजुल्ला बेग :** श्री.बोराडे यांची प्रकल्प विभागात कम्युनिटी ऑर्गनायझर (समुदाय संघटक) म्हणून बदली झाली होती. तेव्हा ते बदलीच्या जागी रुजू झाले नाही काय?

**श्री.गिरजाराम हाळनोर :** स्थायी समितीची सभा चालु असतांना वर्ग-२ चे अधिकारी कार्यालयात हजर असतील असा खुलासा मा.उपआयुक्त यांनी आताच केला असला तरी विधी सल्लागार सध्या कार्यालयात हजर नाहीत.

**सहाय्यक आयुक्त :** श्री.बोराडे हे स्वच्छता निरिक्षक म्हणून काम करीत होते. मलेरिया निरिक्षक पदासाठी आवश्यक असलेली अर्हता श्री.बोराडे यांचेजवळ आहे. आणि याबाबतचे लेखी उत्तरही मा.सभापती यांचेकडे दिले आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.विठ्ठल पेरकर :** विधी सल्लागार कार्यालयात हजर नाही याचे कारण काय? याचा खुलासा व्हावा. असाच प्रकार न्यायालयातील प्रकरणाबाबतही होतो. म्हणून न्यायप्रविष्ट प्रकरणात मनपाविरुध्द निकाल लागतात. न्यायालयातील प्रकरणासाठी आवश्यक ती कागदपत्रे वेळेवर दिली जात नाही.

**मा.उपआयुक्त :** न्यायप्रविष्ट प्रकरणे हाताळण्यासाठी नियुक्त करण्यांत आलेल्या विधीज्ञांना फौजदारी प्रकरणात रु.२००/- दिवाणी प्रकरणात रु.३००/- उच्च न्यायालयातील प्रकरणात रु.८००/- आणि विशेष नागरी दावा प्रकरणी रु.७००/- (अनुक्रमे प्रत्येकी) याप्रमाणे फी अदा करण्यांत येते.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** ज्योतीनगर लेआऊट मधील खुल्या जागेच्या प्रकरणात आवश्यक असलेली कागदपत्रे दिली जात नाही. सदर प्रकरण न्यायालयात दाखल करुन बराच वेळ झालेला आहे. तेव्हा या प्रकरणाचे विधिज्ञांना प्रकरणाची फी वाढवून देण्यांत यावी म्हणून सदर प्रकरणी काळजीपुर्वक काम केले जाईल.

**श्री.अजिजुल्ला बेग :** ले-आऊट मधील ओपन स्पेसच्या जागा मनपाच्या नांवे केल्यानंतर अशा जागा नगरभूमापन कार्यालयाच्या रेकॉर्डवरही मनपाच्या नावे नोंद करुन घेण्याबाबत संबंधित कार्यालयास कळविणे आवश्यक आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** सोसायटीच्या लेआऊट मधील मोकळ्या जागेची रजिस्ट्री करुन ती जागा मनपाच्या नांवे करुन घेण्याबाबत काही कायदेशीर आधार आहे काय? याचा खुलासा व्हावा.

**सहाय्यक संचालक, नगर रचना :** एखाद्या सोसायटीतील ओपन स्पेसची जागा मनपाच्या नवि हस्तांतर केल्यानंतर त्यासंबंधीची प्रत नगर भूमापन कार्यालयाकडे पाठवून त्याबाबतची आवश्यक ती नोंद घेण्याबाबत कळविण्यांत येते. यानंतर शासनाकडील दिनांक १५.१०.९२ च्या अधिसूचना पत्रकाद्वारे भुमि अभिन्यासातील रस्ते आणि मोकळ्या जागेबाबतचे (ओपन स्पेस) नोंदणीकृत दस्तऐवज करतांना संबंधित संस्थेस रुपये १/- किंमत अदा केली जाते.

**श्री.जावेद हसन खान :** नंदनवन कॉलनी येथील ओपन स्पेसच्या जागेचे प्लॉट पाडून विक्री चालू आहे. तेव्हा सदर ओपन स्पेसची जागा मनपा मालकीची असल्यामुळे त्यास ताबडतोब तारफेसिंग करणे जरुरीचे आहे. अन्यथा सर्व जागेची विक्री होईल.

**मालमत्ता अधिकारी :** नंदनवन कॉलनी येथील ओपन स्पेसवरुन नुकतेच सामान जप्त करुन आणण्यात आले आहे. या जागेस तारफेसिंग करणे जरुरीचे आहे.

**मा.उपआयुक्त :** नगररचना विभागातर्फे सोसायटीच्या ओपन स्पेसची जागा मनपा मालकीची असल्याबाबतचा खुलासा स्थानिक वृत्तपत्रातून दिलेला आहे. त्यानंतरही अशा मनपा मालकीच्या जागेबाबत काही व्यवहार घडल्यास ती बेकादेशीर होईल. स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे अशा मोकळ्या जागेस तार फेन्सींग करुन घेण्याबाबत मंजूरी घेतली जाईल.

**श्री.मधुकर शिंदे :** शहरात मनपा मालकीच्या किती ओपन स्पेस आहेत. या बाबत सविस्तर माहिती देण्यांत यावी.

**मा.उपआयुक्त :** सहाय्यक संचालक, नगररचना यांचेतर्फे ०९.१२.८७ ला प्रसिध्द करण्यांत आलेली जाहिर सूचनेची प्रत आणि मनपाने सोसायटीकडून ताब्यात घेतलेल्या जागेचे खरेदीखत या दोन्हीची प्रत नगरभूमापन कार्यालय आणि दुय्यम निबंधक (नोंदणी) यांचे कार्यालयास वरील दोन्ही कागदपत्राच्या प्रति पाठवून सदर जागेचे नामांतर किंवा खरेदी विक्री व्यवहार करु नये. अशा आशयाचे पत्र नगर रचना विभागाने संबंधित विभागांना पाठवावे.

**श्री.मधुकर शिंदे :** शहरात मनपा मालकीच्या किती ओपन स्पेस आहेत. या बाबत सविस्तर माहिती देण्यांत यावी.

**मा.उपआयुक्त :** सहाय्यक संचालक, नगररचना यांचेतर्फे दि.०९.१२.८७ ला प्रसिध्द करण्यांत आलेली जाहिर सूचनेची प्रत आणि मनपाने सोसायटीकडून ताब्यात घेतलेल्या जागेचे खरेदीखत या दोन्हीची प्रत नगरभूमापन कार्यालय आणि दुय्यम निबंधक (नोंदणी) यांचे कार्यालयास वरील दोन्ही कागदपत्राच्या प्रति पाठवून सदर जागेचे नामांतर किंवा खरेदी विक्री व्यवहार करु नये. अशा आशयाचे पत्र नगर रचना विभागाने संबंधित विभागांना पाठवावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** ता.उपआयुक्त यांनी खुलासा केल्याप्रमाणे आवश्यक ते पत्र प्रशासनातर्फे यापुर्वीचे देण्यांत आले आहेत. त्या नंतरही मनपा मालकीची एक जागा दुसऱ्या व्यक्तीच्या नावे नामांतर कशी करण्यांत आली याबाबत

नगर भूमापन कार्यालयाकडे चौकशी केली असता करण्यांत आलेले नामांतर बरोबर असल्याचा खुलासा संबंधित कार्यालयाने केला आहे. तेव्हा सोसायटी अंतर्गत असलेल्या ओपन स्पेस मनपाच्या नांवे हस्तांतर करुन घेतल्यानंतर अशा जागांना ताबडतोब तार फेन्सींग करुन सदर जागा मनपा मालकीची आहे अशा आशयाचा फलक लावणे आवश्यक आहे. तसेच मकबरा ते बुध्द लेणी पर्यंतच्या रस्त्यावरील लाईटची आजची परिस्थिती काय आहे. आणि त्याबाबतची गॅरंटी किती दिवसाची आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** सार्वजनिक दिवा बत्तीच्या व्यवस्थेसाठी प्रशासनातर्फे ५०० सोडीयम व्हेपरचे दिवे खरेदी बाबतच्या प्रस्तावास स्थायी समितीने ५००+१५०=६५० असे सोडीयम व्हेपर दिवे खरेदी करण्यास मंजूरी दिलेली आहे. तेव्हा स्थायी समितीच्या मंजूरीनुसार सर्व सोडीयम व्हेपरचे दिवे प्राप्त झाले आहेत काय याचा खुलासा व्हावा.

**अति.शहर अभियंता :** स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे ५५० नग सोडीयम व्हेपरचे दिवे प्राप्त झालेले आहेत. उर्वरित १०० सोडीयम व्हेपरचे दिवे येणे बाकी आहेत. उर्वरित सोडीयमचे दिवे प्राप्त झाल्यानंतर औद्योगिक परिक्षेत्रात लावण्यांत येतील.

**श्री.अजिजुल्ला बेग, श्री.तुळशीराम भगुरे, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.विठ्ठल पेरकर :** स्थायी समितीच्या मंजूरीनुसार खरेदी करण्यांत आलेले जादा १५० सोडीयम व्हेपरचे दिवे सर्व स.नगरसेवकांना त्याचे प्रभागात दिवा बत्तीसाठी वाटप करण्यास मंजूरी देण्यांत आलेली आहे.

**मा.सभापती :** विद्युत साहित्य खरेदी बाबत च्या कामाचे पंधरा लाखाचे टेंडर रद्द करण्यांत आले होते. त्याबाबत पुढे काय कार्यवाही झाली याची माहिती देण्यांत यावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** स्थायी समितीतर्फे मंजूरी देण्यांत आलेल्या अंदाजपत्रकाचे प्रस्तावाच्या वेळी संबंधित संचिके सोबत बजेट फॉर्म जोडलेला असतो. त्यानंतर सदर कामासाठी प्राप्त झालेल्या कमी दराच्या दरपत्रकासही स्थायी समितीतर्फे मंजूरी दिली जाते. परंतू त्यानंतर सदर काम पुढील आर्थिक वर्षात हाती घेतले जाईल, असा शेरा मा.आयुक्त तर्फे दिला जातो. तर काही प्रकरणात खुलासा मागविला जातो. याचा अर्थ काय? ६० फुट डी.पी.रोडचे कामाच्या अंदाजपत्रकास आणि याच कामासाठी पुन्हा मागविण्यात आलेल्या दरपत्रकास स्थायी समितीने मंजूरी दिल्यानंतर सदर संचिका नगररचना विभागाकडे कोणत्या कारणासाठी पाठविण्यांत आली याबाबतचा खुलासा व्हावा याशिवाय दि.०९.११.९२ च्या सभेतील निर्णयानुसार ए-१ आणि रेटलिस्टच्या कामाची माहिती दोन दिवसाचे आत सभासदांना देण्याबाबत सभागृहाने मंजूरी दिलेली असतांना आवश्यक ती माहिती अद्याप का देण्यांत आली नाही. याचा खुलासा व्हावा. या शिवाय वरीलप्रमाणे दाखल करण्यांत आलेल्या ए-१ व रेटलिस्टच्या कामाच्या खर्चाचा लेखा विभागातील नोंदीप्रमाणे ताळमेळ लावणे आवश्यक आहे.

**मुख्य लेखापरिक्षक :** सध्या कार्यालयात महालेखापाल नागपूर यांच्यातर्फे लेखा परिक्षणाचे काम चालु आहे. तसेच मनपाच्या लेखा परिक्षण विभागात कर्मचारी वर्ग अपुरा आहे. त्यामुळे सं.सदस्यांच्या सुचनेप्रमाणे तुर्त ताळमेळ घालणे शक्य होणार नाही.

**श्री.अजिजुल्ला बेग :** कर्मचारी वर्ग अपुरा आहे. ही बाब योग्य वाटत नाही. लेखा परिक्षणासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग नेमण्याचे अधिकार मुख्य लेखा परिक्षक यांना आहे. तेव्हा आवश्यक तो प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यांत यावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.अजिजुल्ला बेग :** मनपाची न्यायप्रविष्ट प्रकरणे हाताळणे बाबत एकूण किती विधिज्ञ काम करतात या सर्व विधिज्ञांकडे एकूण किती प्रकरणे आहेत. ती कोणत्या प्रकारची आहेत. याबाबत प्रकरणाचा क्रमांक, पार्टीचे नांव इत्यादी सविस्तर माहिती सभागृहास देण्यांत यावी.

**विधी सल्लागार :** स.सभासदांनी विचारलेली माहिती एक महिन्यात पुरविली जाईल.

**मा.सभापती :** ठराव क्र.३७१/९, दि.०९.११.९२ बाबत सभागृहाने घेतलेल्या निर्णयासंबंधी मा.आयुक्त यांचे कडून पत्र प्राप्त झाले आहे. (मा.आयुक्त यांचे संबंधित पत्र वाचून दाखविले)

**श्री.अजिजुल्ला बेग, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.विठ्ठल पेरकर, श्री.अलिम बेग :** नगर परिषद चतुर्थश्रेणी स्त्री कामगारांना वाटप करावयाच्या गणवेशासाठी किती दर पत्रक आले होते. किंवा सभागृहासमोर ठेवलेल्या प्रस्तावाप्रमाणे एकच दरपत्रक आले आहे काय? याचा खुलासा व्हावा. याशिवाय चतुर्थश्रेणी स्त्री कर्मचाऱ्यांना वाटप करण्यांत येणाऱ्या गणवेशाबाबत प्रशासन सभागृहास शिफारस करु शकते. त्यावर समिती विचार करुन आवश्यक ती मंजूरी देते. शासनाने दिलेले सर्व आदेश पाळणे मनपावर बंधनकारक नाही. तसेच प्रस्तावात खुलासा केल्याप्रमाणे जर कर्मचाऱ्यांना हॅन्डलुमच्या साड्या वाटप करावयाच्या होत्या तर या कामासाठी दरपत्रके का मागविण्यांत आली. गणवेशासाठी दरपत्रक भरणारा दुकानदार महापालिकेला मालमत्ता व जकात कराचा भरणा करतो. तेव्हा स्थानिक व्यवहारात त्यांचा फायदा होवू नये काय? तेव्हा सभागृहाने मंजूर केलेल्या ठरावाप्रमाणे गणवेश वाटपाबाबत अंमलबजावणी करण्यांत यावी. नसता उद्‌भवलेल्या प्रकारास प्रशासन जबाबदार राहील.

**मा.सभापती :** ठराव क्र.३७१/बाबत स.सभासदांनी मांडलेल्या विचाराशी मी सहमत आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग, श्री.मधुकर शिंदे, श्री.जयवंत ओक, श्री.नारायण फत्तेलष्कर :** दिनांक ०९.११.९२ च्या सभेतील चर्चेनुसार नेहरु रोजगार योजने बाबतची माहिती सभासदांना मिळालेली नाही. तेव्हा या योजनेसाठी सभासदांना फॉर्म कशासाठी दिले होते. याचा अर्थ सभासदांमार्फत भरुन दिलेले फॉर्म पाठविण्यांत आले नाही. आणि संबंधित विभागातर्फे या योजने अंतर्गत जे शिफारस फॉर्म पाठविले आहेत. त्यात मनपा कर्मचारी किंवा त्यांची पत्नी किंवा त्यांचे नोतवाईक अशा नावांचे फॉर्म बाबत शिफारस केलेली आहे. उदा.द्यावयाचे झाल्यास रुपाबाई चंद्रसिंग चव्हाण यांचे देता येईल. याशिवाय संबंधित विभागाने शिफारस करुन मागविलेल्या यादीत आणखी नगरसेवक कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांच्या नावांचा समावेश असल्याचे दिसून येईल. तेव्हा सभासदांमार्फत भरुन आलेले फॉर्म शिफारस करुन पाठविले किंवा नाही याबाबत माहिती देण्यांत यावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** ठराव क्र.३६३ च्या संवादात नेहरु भुवन इमारतीचे स्थिती बाबत स.सदस्य श्री.अलिम बेग यांनी चर्चा केल्याचा उल्लेख आलेला आहे.

प्रत्यक्षात सदर चर्चा अजिजुल्ला बेग या नांवे असणे आवश्यक आहे. आवश्यक ती दुरुस्ती करण्यांत यावी.

**मा.सभापती :** आवश्यक ती दुरुस्ती करावी.

**ठराव :**

ठराव क्र.३६३ मधील नेहरु भवन इमारतीच्या चर्चे संदर्भात स.सदस्य श्री. अलिम बेग याऐवजी स.सदस्य श्री.अजिजुल्ला बेग यांच्या नावांची दुरुस्ती करण्यासह दि.०९.११.९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.३९३/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, फिल्टर बेड हर्सुल येथे भांडारगृह बांधणे आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रुपये २,३७,३००/- एव्हढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे.

ती रक्कम रु.२,३७,३००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.जावेद हसन खान :** कामासाठी पैसा उपलब्ध नाही अशी सबब प्रशासनातर्फे सांगितली जाते. तेव्हा अंदाजपत्रकास मंजूरी देऊनही काय उपयोग तसेच फिल्टरबेड येथे मनपाची इमारत उपलब्ध आहे. त्या ठिकाणी अशी व्यवस्था करण्यांत यावी. त्या इमारतीचा उपयोग काय?

**कार्यकारी अभियंता :** पाणी पुरवठ्याचा कामात उपयोगात येणाऱ्या टी.सी.एल.च्या बॅगचा साठा करण्यासाठी भांडाराची आवश्यकता आहे. या ठिकाणी असलेली इमारत फिल्टरबेड येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेसाठी आहे. या इमारतीचे दुरुस्तीचे कामाचा ठराव पास झाला आहे. फिल्टरबेडवर काम करणारे कर्मचारी राहावयास तयार आहेत.

**श्री.विठ्ठल पेरकर :** भांडारगृह बांधण्याच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाचे दराने अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. तेव्हा हा ठराव चुकीचा आहे. बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे विभागाचे दर वापरणे आवश्यक आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** सभागृहाच्या मंजूरीनुसार बोअर वेलचे कामाचे काय झाले?

**कार्यकारी अभियंता :** सभागृहाच्या मंजूरीनुसार चार बोअर वेलचे काम झाले असून उर्वरित कामाबाबत संबंधित विभागाकडे मागणी केली असता नियमाप्रमाणे ग्रामीण भागास प्राधान्य द्यावयाचे असल्यामुळे लिस्टप्रमाणे काम करुन देवू असे सांगण्यांत आले आहे.

**मा.सभापती :** प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक दुरुस्त करण्यांत यावे.

**ठराव :**

फिल्टबेड येथे भांडारगृह बांधण्याच्या कामासाठी दुरुस्ती करुन अंदाजपत्रक दाखल करावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.३९४/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गारखेडा येथील स.न.१९/१ व ५२/१ मधील मेहेरनगर येथील (मनपाच्या) मंजूर रेखांकनातील खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु.२,६०,८००/- ला स्थायी समितीने दिनांक १२.०८.९२ चे विषय क्र.१८८/२ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. या अनुषंगाने बी-१ नमुन्यात निविदापत्रके मागविण्यांस्तव शहरातील दै.मराठवाडा, दै.सकाळ, दै.रहेबर उर्दू इत्यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यांत आले. विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण कोरे निविदा-९ (नऊ) विकण्यांत आले व स्विकारण्याच्या तारखेस दर भरुन ऐकूण तीन प्राप्त झाले. सदरील दरपत्रके उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले. त्यात दर्शविलेले दर खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | एजन्सी | | दिलेले दर |
|---|---|---|---|
| १. | एल.एम.पडघन | - | ९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| २. | एस.एच.असोशिएटस | - | १२% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| ३. | सुखबीर सिंग | - | १५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |

सदरील दरपत्रकात सर्वात कमी दर तुलनात्मकदृष्ट्या श्री.एल.एम.पडघन गुत्तेदार यांचे ९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराचे दर आहे.

मा.आयुक्त साहेब यांच्या समक्ष गुत्तेदारासोबत जास्तीचे दराबाबत वाटाघाटी झाल्या. त्यात गुत्तेदार यांनी सदरील काम ६% जास्त दराने करण्यास संमती दिली आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

<u>**संवाद :**</u>

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.मधुकर शिंदे :** संरक्षित भिंत बांधण्यांत येणाऱ्या जागेचे क्षेत्रफळ किती याचा खुलासा व्हावा आणि त्या ठिकाणी मनपा फलक लावावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील सर्वे नं.१९/१ व ५२/१ मधील मेहेरनगर येथील मंजूर रेखांकनातील खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी गुत्तेदार श्री.एल.एम.पडघन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ६% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९५/४ :**

मो.खाराकुंआ येथील अप्पा हलवाई ते अंगुरीबाग पर्यंत मी.मी.व्यासाची आर.सी.सी.गटार टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.३,०२,०००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून प्राप्त सरकारी अनुदानातून सदर काम करणेस्तव मा.आयुक्त महोदयांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१५/११९९/९२ दिनांक २२.०९.९२ नुसार दैनिक नवा मराठा व रहेबर दैनिकात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदापत्रके मागविले असता एकच निविदापत्रके विकण्यांत आली असून सदर निविदापत्रक प्राप्त झाली. त्याचा तक्ता दर खालीलप्रमाणे आहेत.

१. श्री.कैसर खान - १०% जास्त

अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराचे श्री.कैसर खान यांचे दरपत्रक आहे.

मा.आयुक्त महोदयांच्या आदेशावरुन संबंधितास दर वाटाघाटी च्या अनुषंगाने बोलावले असता मा.आयुक्त महोदय, लेखा परिक्षक व मा.कार्यकारी अभियंता यांच्या उपस्थितीत वाटाघाटी घेऊन संबंधितास अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% जास्त दराने काम देण्यांस मंजूरी देण्यांत आली असून संबंधित गुत्तेदाराने संमती दिलेली आहे.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.खाराकुंवाँ येथील अप्पा हलवाई ते अंगुरीबाग पर्यंत ६०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.गटार टाकण्याच्या कामासाठी गुत्तेदार श्री.कैसरखान यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधितांकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०६% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**विषय क्र.६९६/५ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, गुलशन महल ते चंपा मस्जिद १०० फुट डी.पी.रस्ता तयार करणेबाबतच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.२७, दि.०८.०६.८९ नुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये ३४,२५,३६०/- ला मंजूरी मिळाली आहे. एकूण रकमेपैकी १४,०४,६१०/- खडीरस्ता रुंदीकरणाच्या निविदेस दिनांक २५.०८.८९ रोजीच्या स्थायी समितीने मंजूरी दिली. परंतू शहाबाजार झोपडपट्टीतील २०० झोपड्या स्थलांतरीत न झाल्यामुळे काम पुर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे संबंधित गुत्तेदाराने लेखी दिले की, हे काम करु शकत नाही. त्या अनुषंगाने सदरील कामाचे अंदाजपत्रक सुधारित करुन निविदा मागविल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.ए.नवाब | - | ०.०३% कमी |
| २. | मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन | - | १% जास्त |
| ३. | श्री.डी.अजितसिंग | - | २% जास्त |
| ४. | श्री.कुलवंतसिंग | - | अंदाजपत्रकाचे दराने |

वरीलपैकी तुलनात्मक श्री.एस.ए.नवाब यांची निविदा ०.०३% कमीने सर्वात कमी आहे. तरी सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.१७,१३,०९०/- व श्री.एस.ए.नवाब यांच्या दरास मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलशन महल ते चंपा मस्जिद पर्यंत १०० फुटी डी.पी.रोड तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०३% कमी दराच्या श्री.एस.ए.नवाब यांचे दरपत्रकास आणि उक्त कामासाठी तयार केलेल्या रक्कम रु.१७,१३,०९०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.३९७/६ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.उस्मानपुरा महानगरपालिकेच्या जागेत मनपा वर्ग-२ अधिकाऱ्यांसाठी निवासस्थान बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती दि.३०.०९.९२ अन्वये रक्कम रु.२,८१,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी प्राप्त

झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/शअ/६८८/९२, दि.१९.१०.९२ अन्वये बी-१ नमुन्यात जाहिरातीद्वारे निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण - ५ निविदा विक्री झाल्या पैकी निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण - ३ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्या दिनांक १२.११.९२ ला उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद तौफिक अहेमद | - | १५.२५% |
| २. | श्री.एस.एच.असोशिएटस | - | १२.५०% जास्त दराने |
| ३. | श्री.मौला अलियार खान | - | ९.७८६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७८६% जास्त दराची श्री.मौला अलियारखान यांचे निविदा दर आहेत. दर जास्त वाटत असल्याने दराचे वाटाघाटी झाल्यानंतर ५% जास्त दराचे श्री.मौला अलियार खान यांचे निविदा दरास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

सबब अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री.मौला अली यार खान यांची निविदा दर मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा येथील मनपाच्या जागेत मनपा वर्ग-२ अधिकाऱ्यांसाठी निवासस्थान बांधण्याच्या कामाकरिता गुत्तेदार श्री.मौला अलियारखान यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदारामार्फत अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९८/७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.३९ मो.कैलासनगर येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.१,४०,०००/- चे तयार करण्यांत आलेले असून मा.आयुक्त यांनी सदरील अंदाजपत्रकास मंजूरी दिलेली आहे. व सदर कामाचा समावेश शासकीय अनुदान सन १९९१-९२ मध्ये करण्यांत आलेला आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१३/१२८३/९२, दि.१८.०९.९२ ला दैनिक देवगिरी तरुण भारत, आलमगिर टाईम्स व लोकधर्म या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण अकरा निविदा विकण्यांत आलेल्या होत्या. यापैकी केवळ चार निविदा प्राप्त झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एम.जी.महेबुब अली | - | ६% जास्त |
| २. | श्री.शेख समद शेख निजामोद्दीन | - | १०% जास्त |
| ३. | श्री.मिर्झा आर.बी. | - | अंदाजपत्रकीय दराने |
| ४. | श्री.सय्यद सिराजुद्दीन | - | ३% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.मिर्झा आर.बी.यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३९ मो.कैलासनगर येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी आणि अंदाजपत्रकीय दराच्या श्री.मिर्झा आर.बी.यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९९/८ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.महात्मा फुले नगर येथे असलेल्या सार्वजनिक शौचालयास एकंदरित तीस बैठकी शौचालयाची वाढ करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.१७.१०.९२ विषय क्र.११ अन्वये रु.२,७७,५००/- चे अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/शअ/६८८/९२, दि.१९.१०.९२ अन्वये बी-१ नमुन्यात वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (४) निविदा विक्री झाल्यापैकी निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दिनांक १२.११.९२ ला उघडण्यांत आल्या. त्यामध्ये श्री.आर.एस.भाटीया गुत्तेदार यांनी १% इसारा रक्कम न भरल्यामुळे रद्द झाली. उर्वरित निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एल.एम.पडघन | - | १% जास्त दराने |
| २. | श्री.जाधव कन्स्ट्रक्शन | - | ३% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची मे.जाधव कन्स्ट्रक्शन यांची निविदास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. सबब अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची मे.जाधव कन्स्ट्रक्शन यांची निविदा दर मंजूरीसाठी प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.महात्मा फुलेनगर येथे ३० बैठकीच्या सार्वजनिक शौचालयात वाढ करण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराच्या मे.जाधव कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४००/९ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.नवाबपुरा वार्ड क्र.३२ येथील मटन मार्केटवर वाचनालयासाठी पहिल्या मजल्याचे बांधकाम कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.३८४/७, दि.१०.०३.९२ अन्वये र.रु.२,०१,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/शअ/६४९/दि.०६.१०.९२ अन्व्ये बी-१ नमुन्यात (दुसरी वेळ) जाहिरातीद्वारे निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (६) निविदा विक्री झाल्या. पैकी निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (४) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दिनांक २०.१०.९२ ला उघडण्यांत आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मिर्झा आर.बी. | - | २४.९०% जास्त दराने |
| २. | श्री.मोहमंद अब्दुल अजिज | - | २३% जास्त दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री.कैसर खान | - | २७% जास्त दराने |
| ४. | श्री.सैय्यद रफिकोद्दीन | - | २९% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% जास्त दराची श्री.मोहमंद अब्दुल अजिज यांची निविदा आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे मा.आयुक्त यांचे दालनात दि.३०.११.९२ ला प्रत्यक्ष वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराने मा.आयुक्तांनी मान्य केले.

तरी सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराची श्री.मोहमंद अब्दुल अजिज यांचे निविदा दर मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

वार्ड क्र.३२ येथील नवाबपुरा मटन मार्केटच्य इमारतीवर वाचनालयासाठी पहिल्या मजल्याचे बांधकाम करण्या करिता गुत्तेदार श्री.म.अब्दुल अजिज यांचेशी दिनांक ३०.११.९२ रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदारामार्फत अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०१/१० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.मो.बिसमिल्ला कॉलनी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.१,९५,०००/- चे तयार करण्यांत आलेले असून सदरील अंदाजपत्रकास स्थायी समितीचा ठराव क्र.१४८/२१, दि.०४.०७.९२ नुसार मंजूरी मिळालेली आहे. तसेच मा.आयुक्त यांनी सुध्दा मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.११/११३३/९२, दि.१९.०८.९२ ला आलमगीर टाईम्स, अजिंठा, लोकमत या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण वीस विकण्यांत आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ आठ निविदा प्राप्त झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद रफिकउद्दीन | - | १८.७% कमी |
| २. | श्री.मझरुल हक्क | - | १६% कमी |
| ३. | श्री.स.सिराजुद्दीन | - | १७% कमी |
| ४. | श्री.पी.जे.तमखाने | - | १७.७७% कमी |
| ५. | श्री.मिर्झा आर.बी. | - | १२.८६% कमी |
| ६. | श्री.कैसर खान | - | १०.७८६% कमी |
| ७. | श्री.बी.आर.आनंद | - | १८.१९% कमी |
| ८. | श्री.एस.एच.मिनाजुद्दीन | - | १४% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.७% कमी दराचे श्री.सय्यद रफिकउद्दीन यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बिसमिल्ला कॉलनी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे श्री.सय्यद रफिकउद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**विषय क्र.४०२/११ :**

कैसरसिंगपुरा येथे नाल्यातील मुख्य जलनि:सारण वाहिनी स्थलांतरीत करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.२,८७,०००/- प्रगती पथावर आहे.

काम करत असतांना लाईनची खोली वाढली, मेनहोलची खोली वाढली खोदकामात पाणी लागल्याने त्याचा उपसा करावा लागत असल्यामुळे अंदाजपत्रकीय रकमेत सुमारे १,९३,७५०/- ची वाढ होत आहे. त्यात एकस्ट्रॉ ॲटम रक्कम रु.१,६९,६००/- चा आहे. व क्वॉन्टीटी व्हेरियेशन रु.२४,१५०.०० चे आहे.

सदरील जास्तीचा येणारा खर्च हा ड्रेनेज विभागातील भावसिंगपुरा येथील "डी" सिव्हरच्य रु.२३.०० लक्ष रुपयाच्या कामात होणाऱ्या ७.५०% बचतीमधून करण्यांत येईल. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसरसिंगपुरा येथे नाल्यातील मुख्य जलवाहिनी स्थलांतरीत करण्याच्या मुळ कामात लाईनची खोली वाढणे मेन होलची खोली वाढणे, खोदकामात लागलेल्या पाण्याचा उपसा करावा लागत असल्यामुळे अंदाजपत्रकीय रकमेत झालेले रु.१,९३,७५०/- च्या वाढीव एकस्ट्रॉ ॲटमची रक्कम रु.१,६९,६००/- आणि क्वॉन्टीटी व्हेरिअेशन रु.२४,१५०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

सदर कामाचा खर्च भावसिंगपुरा येथील २३ लाखाच्या "डी" सिव्हरच्या कामात होणाऱ्या ७.५०% बचतीतून करण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०३/१२ :**

दिनांक १७.१०.९२ रोजी झालेल्या स्थायी समितीत प्रस्ताव क्र.३५२/६२ प्रमाणे आरोग्य वैद्यकीय अधिकारी हयांचेसाठी एक ॲम्बॅसेडर कार खरेदी करण्यांस मंजूरी मिळाली होती.

त्यानुसार औरंगाबाद येथील हिंदुस्थान मोटर्स कंपनीचे दोन्ही डिलर्सकडून दरपत्रके मागविण्यांत आली असता फक्त मे.भारत इंजिनियरिंग कंपनी औरंगाबाद हयांचे दरपत्रक वसुल झाले असून ॲम्बॅसेडर नोवा डिलक्स हया पेट्रोल कारची किंमत रु.२,००,१९९.०० आहे. त्यानंतर टपालामधून मे.कैलास मोटर्स, औरंगाबाद हयांचेपण दरपत्रक आले असून त्यांनी हया कारचे दरपत्रक रु.२,०१,१५०.०० असे दिलेले आहेत. मे.भारत इंजिनियरिंग कंपनी, औरंगाबाद हयांचे दर कमी दराचे असून ही कार खरेदी करण्यास मंजूरी मिळाली तसेच कार साठीचा अक्सेसरीज धरुन होणारा रु.२,२२५,०००/- चा खर्च "कुटूंब कल्याण" कार्यक्रमांतर्गत असलेल्या तदतूदीतून करण्यास मंजूरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेसाठी हिंदुस्थान मोटार कंपनीची नोवा डिलक्स ॲम्बेसेडर पेट्रोल कार रक्कम रुपये रु.२,००,१९९/- या किंमतीमध्ये मे.भारत इंजिनिअरींग कंपनी यांचेकडून खरेदी करण्यास आणि या कारसाठी ॲक्सेसरिज धरुन होणारा एकूण रक्कम रु.२,२५,०००/- चा खर्च कुटूंब कल्याण कार्यक्रमांतर्गत तरतूदीतून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०४/१३ :**

औरंगाबाद महानगरपालिका कार्यालयात शहराच्या विविध भागातील नागरिक त्यांच्या विविध कामासाठी नेहमीच स्वत:च्या वाहनावर येतात. अशा प्रकारे महापालिका

कार्यालयात कामासाठी आलेल्या नागरिकांची वाहने चोरीला गेल्याच्या बऱ्याचा घटना घडलेल्या आहेत.

तेव्हा आपणास विनंती की, विविध कामानिमित्त मनपा कार्यालयात आलेल्या नागरिकांच्या वाहनांची व्यवस्था लागणे आणि वाहने एकाच विशिष्ट ठिकाणी ठेवून वाहन चोरीला जाणार नाही. या दृष्टीने मुख्य कार्यालयाच्या दोन्ही भागात (मुख्य कार्यालय/टाऊन हॉल) या ठिकाणी लिलाव पध्दतीने गुत्ता देवून वाहनांसाठी स्वतंत्र स्टँड सुरु करण्याची व्यवस्था करावी. अशा प्रकारे स्वतंत्र स्टँड सुरु केला असला तरी कार्यालयाचे कर्मचारी आणि नगरसेवक हयांच्या वाहनांकरिता स्वतंत्र स्टँडची व्यवस्था करावी किंवा लिलावाद्वारे हर्रास झालेल्या वाहन स्टँडवर कार्यालयाचे कर्मचारी किंवा नगरसेवक हयांनी वाहन उभे केल्यास त्यावर टॅक्स आकारु नये. सबब या बाबीवर येत्या स्थायी समिती सभेमध्ये निर्णय घेण्यांत यावा. नेहरु बाल उद्यान येथे देखील सायकल स्टँड टाकणे बाबत.

१. श्री.तुळशीराम भगुरे -
२. श्री.अजिजुल्ला बेग -
दिनांक २३.११.९२

**संवाद :**

**मा.उपआयुक्त :** दुचाकी व चारचाकी वाहनांच्या स्टँडसाठी प्रथम शेड व जागेची व्यवस्था व निश्चिती करावी लागेल.

**ठराव :**

महापालिका कार्यालय आणि नेहरु बाल उद्यान येथे स्वत:च्य वाहनांवर येणाऱ्या नागरीकांच्या वाहनांची व्यवस्था लावणे व आलेली वाहने एकाच विशिष्ट ठिकाणी ठेवण्यासाठी मुख्य कार्यालयाच्या दोन्ही भागात (मुख्य कार्यालय व टाऊन हॉल) आणि नेहरु बालोद्दान येथे लिलाव पध्दतीने गुत्ता देऊन स्वतंत्र वाहन स्टँडची व्यवस्था करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. अशा प्रकारे स्वतंत्र स्टँडची व्यवस्था केली असली तरी कार्यालयाचे कर्मचारी आणि नगरसेवक यांच्या करिता स्वतंत्र स्टँडची व्यवस्था करावी किंवा लिलावाद्वारे हर्रास वाहनांचे स्टँडवर कार्यालयाचे कर्मचारी किंवा नगरसेवक यांनी वाहन उभे केल्यास त्यावर टॅक्स आकारु नये असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.४०५/१४ :**

महानगरपालिका औरंगाबाद येथील काही कर्मचाऱ्यांना जनगणना-१९९१ मध्ये उत्कृष्ट काम केल्याबद्दल भारताचे मा.राष्ट्रपती यांनी रौप्य पदक व कास्यपदक प्रमाणपत्र देवून अभिनंदन केले आहे. अशा कर्मचाऱ्यांना महानगरपालिका कोणतेही आगाऊ वेतनवाढ देण्यांत आली नाही. त्या व्यतिरिक्त इतर ऑफिस मधील कर्मचाऱ्यांना जनगणना-१९९१ मध्ये चांगले काम केल्याबद्दल प्रमाणपत्र व त्या ऑफिसला त्यांना आगाऊ वेतनवाढ देण्यांत यावी अशी शिफारस करण्यांत आली आहे. असे कळविले व अद्याप महानगरपालिका औरंगाबादच्या कर्मचारी ज्यांना की, भारताचे मा.राष्ट्रपती यांनी पदक दिले त्यांना दिलेले नाही.

तरी मे.सभापती साहेबांनी रौप्य पदक मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोन तर कास्य पदक मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोन तर कास्य पदक मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांना एक वेतनवाढ जनगणनेचे काम पूर्ण झाल्याच्या तारखेपासून देण्यांची कार्यवाही करावी.

विठ्ठल कोंडाजी पेरकर
सदस्य, स्थायी समिती,

महानगरपालिका, औरंगाबाद.
दिनांक :-०३.११.९२.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१ च्या जनगणना कार्यात ज्या नगरपरिषद कर्मचाऱ्यांना भारताचे मा.राष्ट्रपती यांनी रौप्य पदक व कास्यपदक प्रमाणपत्र देवून अभिनंदन केले आहे. अशा कर्मचाऱ्यांपैकी रौप्य पदक मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोन तर कास्यपदक मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांना एक आगाऊ वेतनवाढ जनगणनेच्या काम पुर्ण झाल्याच्य तारखेपासून देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## नेहरु रोजगार योजने बाबत पुन्हा चर्चा

**संवाद :-**

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** प्रकल्प विभागातर्फे जी यादी देण्यांत आलेली आहे. त्यात मनपा कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांची किती नाले आहेत. असे एकूण किती लोक आहेत. नगर सेवकांमार्फत दिलेल्या दहा फॉर्मचे काय झाले. तेव्हा देण्यांत आलेल्या यादीऐवजी सभासदांना प्रभागवार यादी देण्यांत यावी.

**प्रकल्प अधिकारी :** नेहरु रोजगार योजनेसाठी प्राप्त झालेले फॉर्म बँकेकडे एव्ढेच काम या विभागाचे आहे. या योजनेसाठी आलेले अनुदान बँकेत जमा आहे. नेहरु रोजगार योजनेसाठी ३/३ फॉर्म पाठविण्यांत यावे असा खुलासा बँकेमार्फत करण्यांत आला. यावर प्रशासनाने असा निर्णय घेतला की, नेहरु रोजगार योजने अंतर्गत ज्या नागरिकांनी फॉर्म भरले आहे. त्यापैकी जे नागरिक ॲप्रोच होतात त्यांचेच फॉर्म पाठविण्यांत यावे. अशाच प्रकारे एकूण ३००० फॉर्म पाठविण्यांत आले आहे. याशिवाय आणखी बरेच फॉर्म कार्यालयाकडे बाकी आहेत. यापैकी एक संचिका बँकेकडून परत आली ही बाब खरी आहे. यानंतर मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात झालेल्या बैठकीत कोणती बँक कोणत्या प्रभागाला संलग्न आहे. याचा आराखडा ठरविण्यांत आला. यानंतर मात्र असा प्रकार झाला नाही. कार्यालयातर्फे पाठविण्यांत आलेल्या फॉर्म बाबत बँकेने नामंजूरी दिल्यास अशा फॉर्मबाबत काहीही करता येत नाही. नेहरु रोजगार योजनेसाठी रुपये पांच लाख मंजूर झाल्याबाबतचे शासनाचे पत्र प्राप्त झाले आहे.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २३.१२.१९९२ रोजी दुपारी ३.४० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. बुधवार दिनांक २३.१२.१९९२ रोजी दुपारी ३.४० वाजता समिती सभागृहात मा.सभापती ॲड.श्री.इकबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेत कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
२. श्री.भगुरे तुळशीराम छगन
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
५. श्री.पालीवाल विजय गोविंदलाल
६. श्री.जावेद हसन खान कसीम हसन खान
७. श्री.मोहंमद इस्माईल अब्दुल करीम
८. श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
९. श्री.शिंदे मधुकर माणिकराव
१०. श्री.ओक जयवंत केशवराव

**विषय क्र.४०६/१ :**
दिनांक ३०.११.९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :-**

**श्री.अजिजुल्ला बेग :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त यांनी रुपये ५,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त किमतीची कामे करुन घेतल्या नंतर अशी कामे करुन घेतल्या नंतर अशी कामे स्थायी समिती च्या मंजूरीसाठी ठेवणे आवश्यक आहे. सर्वसाधारण सभेने एक लाख रुपया पर्यंतची कामे करुन घेण्याबाबत मा.आयुक्त यांना अधिकार देण्यास मंजूरी दिली आहे. कलम ७३ (ड) प्रमाणे मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात केलेल्या कामाचा १५ (पंधरा) दिवसाचे आत सभेस खुलासा करावा असा नियम आहे. परंतू उक्त नियमाप्रमाणे अद्याप पर्यंत अशी प्रकरणे सभागृहापुढे ठेवण्यांत आलेली नाही. तेव्हा या प्रकरणी प्रशासनाने खुलासा करावा.

**श्री.अलिम बेग :** लोकप्रतिनिधीची नियुक्ती झाल्यापासून आतापर्यंत अशा प्रकारचा खुलासा झाला नाही. त्यामुळे तीच पध्दत चालू राहावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** पंधरा दिवसाचे आत स्थायी समिती/सर्वसाधारण सभेस खुलासा करावा असा नियम आहे. परंतू अद्यापपर्यंत कलम ७३ व ६७ (३) (क) प्रमाणे खुलासा झालेला नाही.

**मा.उपआयुक्त (प्रभारी) :** उक्त कालमाप्रमाणे असा खुलासा होणे आवश्यक होते. तेव्हा यापुढे या कलमाप्रमाणे खुलासा केला जाईल.

**श्री.अजिजुल्ला बेग :** प्रशासनाकडून दिरंगाई झाली म्हणून नियमाप्रमाणे प्रशासनास कारणे दाखवा नोटीस देण्यांत यावी.

**मा.सभापती :** सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे कायद्याचे अधिन राहून प्रशासनास कारणे दाखवा नोटीस देण्यांत यावी.

**श्री.मधुकर शिंदे :** कर्मचाऱ्यांचे अपिलप्रकरणी सभागृहाने मंजूरी दिली असली तरी प्रशासनातर्फे श्री.भिकन पटेल यांचे पदोन्नती प्रकरणात कार्यवाही झालेली नाही. तेव्हा या बाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** कर्मचाऱ्यांचे अपिल प्रकरणी सभागृहाने दिलेल्या मंजूरी नुसार प्रशासन कार्यवाही करत नाही. म्हणून मा.सचिवांनी शासनाकडे अहवाल पाठवावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** चालू महिन्यात झालेल्या दंगल प्रकरणी दंगलग्रस्थांना शासनातर्फे मदत करण्यांत येत आहे. तेव्हा अशा परिस्थितीत महापालिकेतर्फे नुकसान झालेल्या सर्व धार्मिक स्थळांची दुरुस्ती करुन दंगलग्रस्थांना मदत करण्यांत यावी आणि आपण निधर्मिपणे काम करतो हे दाखवून द्यावे.

**मा.सभापती :** नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून संबंधित प्रभागाचे नगरसेवक दंगलग्रस्तांना मदत करावी.

**श्री.अजिजुल्ला बेग :** कलम -६६ प्रमाणे महापालिका अशा प्रसंगी मदत करु शकते.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** पोलिस पंचनाम्यामध्ये ज्या धार्मिक स्थळांची नोंद झाली असेल अशाच धार्मिक स्थळांची दुरुस्ती मनपातर्फे करण्यांत यावी.

**मा.सभापती :** चालू महिन्यात झालेल्या दंगली मध्ये नुकसान झालेल्या ज्या टपरीचा विमा उतरविलेला नसेल अशा टपरीधारकांनाकरिता रु.२०००/- आणि नुकसान पोहचलेल्या सर्व प्रकारच्या पोलिस पंचनामा झालेल्या धार्मिक स्थळांची दुरुस्ती महापालिकेतर्फे करण्यांत यावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** महापालिकेची कामे करणाऱ्या गुत्तेदरांची बिले रोखने आणि बिले अदा करणे याची तारिख काय आहे. याची माहिती नाही परंतू अशा प्रकारचे बील रोखून धरणे यास कोणत्याही नियमाचा आधार नाही. यावरुन गुत्तेदरांची बिले देणे हे कर्मचाऱ्यांच्या मनावर चालू आहे. असे दिसते. तेव्हा याबाबत योग्य तो खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त (प्रभारी) :** मनपा कर्मचाऱ्यांचे वेतन सुरळीतप्रमाणे वाटप व्हावे यादृष्टीने प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत पासून पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत गुत्तेदरांची देयके स्विकारणे बंद ठेवण्यांत येते. हे बंधन शासकीय अनुदानातून हाती घेतलेल्या कामांना लागू नाही.

**श्री.अजिजुल्ला बेग :** महापालिकेची आर्थिक परिस्थिती काय आहे. आणि परिस्थिती सुधारण्यासाठी काय तरतूद केली याचा खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त (प्रभारी) :** चालु वर्षाच्या अर्थसंकल्पात जादा उत्पन्न होईल अशी अपेक्षा होती. परंतू प्रत्यक्षात तरतूदीपेक्षा कमी उत्पन्न होत आहे आणि खर्च मात्र जास्त होत आहे. याशिवाय जकात करापासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाहतुक ठेकेदारांचा संप आणि नुकतीच झालेली दंगल यामुळे महापालिकेस जकात कराच्या उत्पन्नात बराच फटका बसलेला आहे. म्हणून आहे त्या उत्पन्नात व्यवस्था करुन काम चालविले जाते.

**श्री.अजिजुल्ला बेग :** चालु वर्षाच्या अर्थसंकल्पात जलनि:सारणाच्या कामासाठी पन्नास लाखाची तरतूद करण्यांत आली आहे. तेव्हा या तरतूदीतून आतापर्यंत किती खर्च झाला आणि किती शिल्लक आहे. या बाबतची माहिती का दिली जात नाही.

**श्री.मधुकर शिंदे :** महापालिकेच्या कामासाठी लागणाऱ्या सिमेंटचे वाटप कोणत्या अधिकाऱ्यातर्फे केले जाते आणि सध्या महापालिकेकडे सिमेंटचा साठा किती आहे. तसेच यापुर्वी सिमेंट वाटप कोण करीत होते.

**शहर अभियंता :** महापालिकेकडे सध्या दीड हजार गोणी सिमेंट शिल्लक आहे. पुर्वी शहर अभियंता विभागातर्फे गुत्तेदरांना मनपा कामासाठी सिमेंट वाटप करण्यांत येत होते. परंतू गेल्या काहीपासून मनपा कामासाठी आवश्यक असलेल्या सिमेंट वाटपाचे काम मा.आयुक्त यांनी स्वतःकडे घेतले आहे.

**श्री.जावेद हसन खान, श्री.अलिम बेग, श्री.मधुकर शिंदे, श्री.नारायण फत्तेलष्कर :** प्रभागात चालू असलेल्या कामासाठी आवश्यक असलेले सिमेंट उपलब्ध करुन देण्यांसाठी संबंधित गुत्तेदारांबरोबर नगरसेवकांना स्वतः जावे लागते. मा.आयुक्त यांनी सर्मिट वाटपाचे काम स्वतःकडे घेतले याचा अर्थ शहर अभियंता यांचे सिमेंट वाटपावर विश्वास नाही काय? ही कोणती पध्दत आहे? तेव्हा प्रभागातील कामात होणारी दिरंगाई लक्षात घेता सिमेंट वाटपाचे काम पुर्वी प्रमाणेच शहर अभियंता यांचे कडे देण्यांत यावे किंवा २५ ते १०० पर्यंतच्या सिमेंट बॅग गुत्तेदारांना वाटप करण्याचे अधिकार शहर अभियंता यांना देण्यांत यावे.

**मा.सभापती :** सिमेंट वाटप प्रकरणी चर्चा करण्यांत येईल.

**श्री.मधुकर शिंदे, श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.गिरजाराम हाळनोर :** जकात विभागाचे काम करणारे कर्मचारी गेल्या अनेक वर्षापासून एकाच विभागात काम करतात शासकीय नियमाप्रमाणे एका विभागात सतत तीन वर्ष काम केल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांची बदली करावी, असे असतांनाही सात/आठ वर्षाचा कालावधी झाला तरी अनेक कर्मचारी एकाच ठिकाणी काम करतांना दिसतात आणि काही कर्मचाऱ्यांच्या मात्र एका वर्षाच्या आत बदल्या केल्या जातात.

**मा.सभापती :** कर्मचाऱ्यांचा बदली बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात येत आहेत.

**सहा.आयुक्त-१ :** कर्मचाऱ्यांच्या ज्या बदल्या झाल्या आहेत त्या बदल्या प्रशासनाच्या आवश्यकतेनुसार झालेल्या आहेत.

**मा.सभापती :** सतत तीन वर्षे एकाच ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नियमाप्रमाणे बदल्या करण्यांत याव्यात.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** मा.महापौर यांचे अधिकारात वाढ झाल्याचे शासकीय परिपत्रक आले आहे काय?

**श्री.जावेद हसन खान :** नंदनवन कॉलनी येथील मनपा मालकीच्या ओपन स्पेसला तार फेन्सींग करण्याबाबत गत सभेमध्ये चर्चा झाली. परंतू अद्याप काम झाले नाही. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**शहर अभियंता :** गत स्थायी समितीतील चर्चेनुसार नंदनवन कॉलनी येथील मनपा मालकीच्या मोकळ्या जागेस तार कुंपन करण्याचे काम सुरु करण्यांत आले असता कॅन्टोन्मेंट बोर्डाचे कर्मचाऱ्यांना काम बंद केले आहे. सदर प्रकरणाबाबत सहाय्यक संचालक नगर रचना या विभागाचे कर्मचाऱ्यांसह तार कुंपणाचे काम हाती घेण्यांत येणार आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** ठराव क्र.४०५ मध्ये जनगणना कर्मचाऱ्यांप्रमाणेच निवडणूक काळात उत्कृष्ट काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्यांस मंजूरी देण्यांत येते. अशी वाढ करण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे ठराव क्र.४०५ मध्ये जनगणना कर्मचाऱ्यांप्रमाणेच निवडणूक काळात उत्कृष्ट काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देणे बाबत वाढ करण्यांत यावी.

**ठराव :**

दिनांक ३०.११.९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेतील ठराव क्र.४०५ मध्ये जनगणना कर्मचाऱ्यांप्रमाणेच निवडणूक काळात उत्कृष्ट काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. अशी वाढ करण्यासह दिनांक ३०.११.९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र.४०७/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालय मध्ये माकडाचे, कोल्ह्याचे राम करण्याचे व फिरण्याचे शेड बांधकाम करणे बाबत कामासाठी सा.बा.खात्याचे सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार र.रु.३,४३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले.

सदरचा खर्च प्राणी संग्रहालयाच्या तरतूदीमधून करण्यांत येईल. प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालयामध्ये माकड व कोल्हा यांचे करिता आराम व फिरण्यासाठी शेडचे बांधकाम करण्याकरिता रक्कम रु.३,४३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०८/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दलालवाडी ते फकीरवाडी (पैठणगेट जवळ) रस्त्यावर पुल बांधणे बाबतच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,१०,७६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

करिता वरील कामाचे रक्कम रु.२,१०,७६०/- चे अंदाजपत्रक मंजूर करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दलालवाडी ते फकीरवाडी रस्त्यावर पुल बांधण्याच्या कामाकरिता रक्कम रु.२,१०,७६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०९/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालय येथे सिंहाचे आराम करण्याचे घर बांधणे बाबत कामासाठी सा.बां.खात्याचे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार र.रु.२,८३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले.

सदरचा खर्च प्राणी संग्रहालयाच्या तरतूदीमधून करण्यांत येईल. प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालयामध्ये सिंहा करिता आराम करण्याचे घर बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु.२,८३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१०/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.३४ कबाडीपुरा रेंगटीपुरा येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.१,०८,०००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यांत आलेले असून सदरचा खर्च सन १९९२-९३ या वर्षाच्या भांडवली तरतूदीतून करण्यात येईल. तसेच मा.आयुक्त यांनी सदर अंदाजपत्रकास मंजूरी दिलेली आहे.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३४ कबाडीपुरा, रेंगटीपुरा येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता र.रु.१,०८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४११/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.५७ येथील मंजूरा रेखांकनातील मनपाच्या खुल्या जागेवर तार फेन्सींग करणे ठिकाणाचे नांव अनुक्रमांक १) एकनाथनगर, २) स.नं.२ शहानुरवाडी, ३) भरतनगर, शहानूरवाडी, ४) न्यु स्टेट बँक कॉलनी स.नं.६/ए, ५) संजय को.ऑ.सो.टी.एस.नं.१६३२५ उस्मानपुरा, ६) महावीर नगर कॉलनी सी.एस.नं.५-४-६७ उस्मानपुरा, ७) जयनगर इत्यादी ठिकाणी कामाचे अंदाजपत्रक रु.३,४०,२७५/- ला स्थायी समिती विषय क्र.२२९/४, दि.२९.०८.९२ मंजूरी अन्वये सदरील कामाचे "बी-१" नमुन्यात निविदा सूचना मागविण्याकरिता दै.लोकमत टाईम्स, दै.सिटीजन्स, दै.रहेबर, वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यांत आले. त्या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा फॉर्म - ९ (नऊ) विकण्यांत आले व स्विकारण्याच्या तारखेस - ५ (पाच) निविदा फॉर्म दर भरुन प्राप्त झाले. सदरील निविदा फॉर्म उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले त्यात दर्शविलेले दर खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दिलेले दर |
|---|---|---|
| १. | एस.एच.असोशिएटस | ११.११% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दर |
| २. | श्री.सय्यद सिराजोद्दीन | ११% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दर |
| ३. | कैसर खान | २% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दर |
| ४. | एल.एम.पडघन | ५% जास्त दराने |
| ५. | एस.ए.नवाब | १४% जास्त दराने |

सदरील दर पत्रकात तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी श्री.एस.एच.असोशिएटस गुत्तेदार यांचे ११.११% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराचे दर आहे.

प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

स.सभासद श्री.गिरजाराम हाळनोर आणि श्री.अजिजुल्ला बेग यांचे मार्फत प्रस्तावित कामाची पाहणी करण्यांत यावी. तोपर्यंत सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.४१२/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सर्वे नं.३२ मधील इंदिरानगर (बायजीपुरा) स्लम भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी अंदाजपत्रक रु.१,२४,०००/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.१२१/२४, दि.२३.०६.९२ द्वारे मंजूरी दिल्यानंतर सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सूचना दिनांक १८.०९.९२ द्वारे स्थानिक वृत्तपत्रात दैनिक मराठवाडा, दैनिक सकाळ व दैनिक रहेबर मध्ये विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखेपर्यंत फक्त एकच निविदा विकण्यांत आली असून मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजित तारखेस फक्त एकच निविदा प्राप्त झाली व प्राप्त झालेली निविदा उघडली असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

१. श्री.खाजा मोईनुद्दीन - अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११.८६% जास्त

सदरील कामासाठी प्राप्त झालेली निविदा एकच असून निविदेतील दर अंदाजपत्रकामुळे मा.आयुक्त साहेबांनी ठेकेदारास त्यांचे दालनात समक्ष बोलावून ठेकेदरांनी दिलेल्या दराबाबत वाटाघाटी केली असता ठेकेदार निविदेत दिलेल्या दर-११.८६% जास्त ऐवजी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०९% जास्त दराने काम करणेस तयार असल्यामुळे श्री.खाजा मोईनुद्दीन यांची निविदा अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९% अधिक दराने मंजूर करण्याचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

सर्वे नं.३२ मधील इंदिरानगर (बायजीपुरा) स्लम भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी गुत्तेदार श्री.खाजा मोईनुद्दीन यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधित गुत्तेदारामार्फत अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०९% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१३/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संजयनगर बायजीपुरा स्लम परिसरातील प्रमुख रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी स्थायी समितीचा ठराव क्र.१२०/२९ दिनांक २७.०७.९२ द्वारे अंदाजपत्रक रु.४,९९,९००/- ला मंजूरी दिल्यानंतर कार्यालयाची निविदा सूचना दिनांक १८.०९.९२ स्थानिक वृत्तपत्र दै.मराठवाडा दै.सकाळ व दै.रहेबर मध्ये विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखेपर्यंत फक्त एकच निविदा विकण्यांत आली व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे

नियोजित तारखेस एकच मोहरबंद निविदा प्राप्त झाली. प्राप्त झालेल्या निविदाधारकांने निविदेत दिलेले दर खालीलप्रमाणे -

१. श्री.खाजा मोईनुद्दीन - अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११.८६% जास्त

सदरील कामासाठी प्राप्त झालेली निविदा फक्त एकच असून निविदेतील दर अंदाजपत्रकामुळे ठेकेदारास मा.आयुक्त साहेबांचे दालनात वाटाघाटीसाठी बोलावले असता ठेकेदार निविदेत दिलेले दर-११.८६% जास्त ऐवजी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०९% जास्त दराने काम करणेस तयार असल्यामुळे वाटाघाटी ठरल्याप्रमाणे श्री.खाजा मोईनुद्दीन यांची निविदा अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९% अधिक दराने मंजूर करण्याचे विचारार्थ सादर.

<u>संवाद :-</u>

**श्री.गिरजाराम हाळनोर :** ज्योतीनगर भागातील काम गुत्तेदाराने अर्धवट सोडलेले आहे. तेव्हा सदर काम पूर्ण होईपर्यंत गुत्तेदारास बील देण्यांत येऊ नये.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर, बायजीपुरा स्लम परिसरातील प्रमुख रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी गुत्तेदार श्री.खाजा मोईनोद्दीन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधितांकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०९% अधिक दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१४/९ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा स्लम भागात ७५० मिटर दगडी गटार बांधण्याचे कामासाठी स्थायी समितीचा ठराव क्र.५/२ दि.०१.०६.९२ द्वारे रु.३,०६,८४२/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी दिल्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सूचना दि.१८.०९.९२ ला दै.मराठवाडा, दै.सकाळ व दै.रहेबर मध्ये विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (६) निविदा विकण्यांत आल्या असून मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजित तारखेस फक्त चार निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१. श्री.सय्यद रफिकुद्दीन - अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त
२. श्री.बी.आर.आनंद - अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५% जास्त
३. श्री.सय्यद सिराजुद्दीन - अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ६% जास्त
४. श्री.एस.पी.सरोदे - अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ००.०१% कमी

तुलनात्मकदृष्ट्या श्री.एस.पी.सरोदे यांची निविदा कमी असून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ००.०१% कमी आहे. करिता श्री.एस.पी.सरोदे यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ००.०१% कमी दराची निविदा मंजूरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा स्लम भागात ७.५० मीटर दगडी गटार बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ००.०१% कमी दराच्या श्री.एस.पी.सरोदे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१५/१० :**

शहर अभियंता यांनी सादर केला की, इंदिरानगर स्लम भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी स्थायी समितीचा ठराव क्र.१२०/२३, दिनांक २३.०६.९२ द्वारे अंदाजपत्रक रु.४,९४,०००/- ला मंजूरी दिल्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सूचना दिनांक १८.०९.९२ द्वारे स्थानिक वृत्तपत्र दै.मराठवाडा दै.सकाळ व दै.रहेबर मध्ये विस्तृत प्रसिध्दी देऊन प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखेपर्यंत फक्त एकच निविदा विकण्यांत आली व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजित तारखेला एकच मोहरबंद निविदा प्राप्त झाली व प्राप्त झालेल्या ठेकेदारांची निविदा उघडली असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

१. श्री.खाजा मोईनुद्दीन - अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११.८६% जास्त

सदरील कामासाठी प्राप्त झालेली निविदा फक्त एकच असून ठेकेदारांनी दिलेले दर अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११.८६% जास्त असल्यामुळे ठेकेदारास मा.आयुक्त साहेबांचे दालनात समक्ष वाटाघाटीसाठी बोलावले असता ठेकेदाराने निविदेत दिलेले दर-११.८६% जास्त ऐवजी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०९% जास्त दराप्रमाणे काम करणेस तयारी दर्शविल्यानुसार श्री.खाजा मोईनुद्दीन यांची निविदा अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९% जास्त दराने मंजूर करण्याचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर स्लम भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी गुत्तेदार श्री.खाजा मोईनुद्दीन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदारांकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१६/११ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, आरिफ कॉलनी येथील रस्त्यावर रिमेटॅलींग करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु.५,९०,४७६/- ला स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा नोटीस क्रमांक-१४/जा.क्र./मनपा/बां-१/५३५/९२, दि.०२.११.९२ अन्वये दुसऱ्या वेळेस निदि मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण दहा निविदा विकल्या गेल्या त्यापैकी चार निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक २३.११.९२ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

१. श्री.बी.एम.कटारिया - ०.०१% कमी
२. श्री.कुलवंतसिंग - ३% जास्त
३. मे.पॉल कन्स्ट्रक्शन - ५% जास्त
४. मे.एस.एच.असोशिएटस - ५% जास्त

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरिफ कॉलनी येथील रस्त्यावर रिमेटलिंग करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०१% कमी दरच्या श्री.बी.एम.कटारिया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१७/१२ :**

म.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, रशिदमामू कॉलनी येथे तसेच स्विमींग पुलाचे रस्त्याचे रुंदीकरण करुन खडीकरण करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१,०६,२००/- च्या रकमेस स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१४/जा.क्र./मनपा/बां-१/५३५/९२, दि.०२.११.९२ अन्वये दुसऱ्या वेळेस निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण सहा निविदा विकल्या गेल्या त्यापैकी तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक २३.११.९२ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.पाल कन्स्ट्रक्शन | - | ५% जास्त |
| २. | म.एस.एच.असोशिएटस | - | ५% जास्त |
| ३. | कुलवंतसिंग | - | ०.३०% कमी |

वरीलपैकी श्री.कुलवंतसिंग यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.३०% कमी दराची आहे. विचारार्थ सादर.

**संवाद :-**

**श्री.जावेद खान :** प्रस्तावित मोहल्याचे मुळ नांव गरमपाणी असे असल्यामुळे रशिद मामू कॉलनी ऐवजी मोहल्ला गरमपाणी अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

**सभापती :** आवश्यक ती दुरुस्ती करण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला गरमपाणी येथे तसेच स्विमींग पुलाच्या रस्त्याचे रुंदीकरण करुन खडीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.३०% कमी दराच्या श्री.कुलवंतसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१८/१३ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, बायजीपुरा येथील सरदार अवतारसिंग यांचे ले-आऊट अंतर्गत खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१,७५,३४०/- च्या रकमेस स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१४ जा.क्र./मनपा/बां-१/५३५/९२, दि.०२.११.९२ अन्वये दुसऱ्या वेळेस निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण अकरा निविदा विकल्या गेल्या त्यापैकी पांच निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक २३.११.९२ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सलीम पटेल | - | ०.०५% कमी |
| २. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ५% जास्त |
| ३. | मे.पाल कन्स्ट्रक्शन | - | १५% जास्त |
| ४. | श्री.एस.ए.नवाब | - | ४% जास्त |
| ५. | श्री.कुलवंतसिंग | - | ३% जास्त |

वरीलपैकी श्री.सलीम पटेल यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बायजीपुरा येथील सरदार अवतारसिंग याचे ले-आऊट अंतर्गत खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री.सलीम पटेल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१९/१४ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, बिसमिल्ला कॉलनी येथे खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये २,१२,०८९.०० ला स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१४, जा.क्र./मनपा/बांध-१/५३५/९२, दि.०२.११.९२ अन्वये दुसऱ्या वेळेस निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण दहा निविदा विकल्या गेल्या त्यापैकी तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक २३.११.९२ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कुलवंतसिंग | - | ५% जास्त |
| २. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ४% जास्त |
| ३. | श्री.सलीम अहेमद | - | ०.१०% कमी |

वरीलपैकी श्री.सलीम अहेमद यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.१०% कमी दराची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बिसमिल्ला कॉलनी येथे खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१०% कमी दराच्या श्री.सलीम पटेल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२०/१५ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, हर्सुल ते कृष्णपुरवाडी या खडी रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,६८,९२५/- च्या रकमेस स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१४/जा.क्र./मनपा/बां-१/५३५/९२, दि.०२.११.९२ अन्वये दुसऱ्या वेळेस निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण आठ निविदा विकल्या गेल्या त्यापैकी तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक २३.११.९२ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मिर्झा आर.बी. | - | ४% जास्त |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ५% जास्त |
| ३. | श्री.व्ही.आर.पाटील | - | ०.५% कमी |

वरीलपैकी श्री.व्ही.आर.पाटील यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.५% कमी दराची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल ते कृष्णपुरवाडी या खडी रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.५% कमी दराच्या श्री.व्ही.आर.पाटील यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२१/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जालना रोड ते सुतगिरणी या १०० फुट डी.पी.रोडचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१९,६२,२००/- चे अंदाजपत्रकास दि.२६.०९.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरचा खर्च शासकीय अनुदान १९९०-९१ चे अनुदानातून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५७०८/९२, दिनांक ०८.१०.९२ चे निविदा सुचनेद्वारे दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण (१४) निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला एकुण आठ (८) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कुलवंतसिंग | - | १९.१०% कमी दराने |
| २. | श्री.डी.अजितसिंग | - | १८% कमी दराने |
| ३. | श्री.डी.एस.जग्गी | - | १५% कमी दराने |
| ४. | श्री.जी.एम.कटारिया | - | ११.११% कमी दराने |
| ५. | श्री.पी.एम.चोरडीया | - | ५.७७% कमी दराने |
| ६. | श्री.मे.रे.कन्स्ट्रक्शन कंपनी | - | २% कमी दराने |
| ७. | श्री.मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | २% कमी दराने |
| ८. | श्री.एस.एस.चावला | - | दर दिलेले नाहीत. |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.१०% कमी दराने श्री.कुलवंतसिंग यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोड ते सुतगिरणी या १०० फुट डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १९.१०% कमी दराच्या श्री.कुलवंतसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२२/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सुतगिरणी ते पिरबाजार व्हाया शहानुरमियाँ दर्गा या ८० फुट डी.पी.रोडचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी सन

१९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने र.रु.१२,८९,३४०/- चे अंदाजपत्रकास दि.२६.०९.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरचा खर्च सन १९९०-९१ च्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५७०८/९२, दिनांक ०८.१०.९२ चे निविदा सुचनेद्वारे दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण (१८) अठरा निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला एकूण तेरा (१३) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कुलवंतसिंग | - | २१.४३% कमी दराने |
| २. | श्री.डी.अजितसिंग | - | १८% कमी दराने |
| ३. | श्री.अब्दुल सलाम | - | १६.८६% कमी दराने |
| ४. | मे.पाल कन्स्ट्रक्शन | - | १५.१५% कमी दराने |
| ५. | श्री.डी.एस.जग्गी | - | १५% कमी दराने |
| ६. | श्री.पी.जे.तमखाने | - | १५.५५% कमी दराने |
| ७. | श्री.जी.एम.कटारिया | - | १३.१३% कमी दराने |
| ८. | श्री.मौला अलियारखान | - | ९.०२% कमी दराने |
| ९. | श्री.एस.एस.चावला | - | ११.६१% कमी दराने |
| १०. | श्री.कैसर खान | - | ७.८६% कमी दराने |
| ११. | श्री.मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | २% कमी दराने |
| १२. | श्री.मे.रे.कन्स्ट्रक्शन कंपनी | - | ४% कमी दराने |
| १३. | श्री.पी.एम.चोरडीया | - | ५.७७% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.४३% कमी दराने श्री.कुलवंतसिंग यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुतगिरणी ते पिरबाजार व्हाया शहानुरमियाँ दर्गा या ८० फुट डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २१.४३% कमी दराच्या श्री.कुलवंतसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२३/१८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.३६ टाकळकर हाऊसिंग सोसायटी पासून ते बारी कॉलनी पर्यंत गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ७,०६,०००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यांत आलेले असून सदर काम शासकीय अनुदान सन १९९१-९२ च्या तरतूदीतून करण्यांत येईल. तसेच सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१३/१२८३/९२, दि.१८.०९.९२ नुसार दैनिक औरंगाबाद टाईम्स, लोकधर्म, व देवगिरी तरुण भारत या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण अकरा निविदा

विकण्यांत आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ आठ निविदा प्राप्त झालेल्या असून त्याचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बी.आर.आनंद | - | १९.१९% कमी |
| २. | श्री.एस.ए.नवाब | - | १५.५३% कमी |
| ३. | श्री.एल.एम.पडघन | - | १०% कमी |
| ४. | श्री.मे.जि.एम.कन्स्ट्रक्शन | - | १७.८६% कमी |
| ५. | श्री.एस.एम.मंडोरे | - | ७% कमी |
| ६. | श्री.अ.सलाम | - | १६.८६% कमी |
| ७. | श्री.एम.एम.अजिज | - | ७.२५% कमी |
| ८. | श्री.कैसर खान | - | २०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी दराचे श्री.कैसर खान यांचे दरपत्रक आहे. व सदरील दरास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३६ टाकळकर हाऊसिंग सोसायटी पासून ते बारी कॉलनी पर्यंत गटार बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी दराच्या श्री.कैसर खान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२४/१९ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९०-९१ च्या शासकीय विशेष विकास अनुदान अंतर्गत रुपये १००.०० लाख किंमतीचे नाला ट्रेनिंगचे काम प्रस्तावित आहेत. सदर कामासाठी कामाच्या सोयीच्या दृष्टीने सात भाग करुन ती कामे प्रगती पथावर आहेत.

सदर कामाच्या निविदा भरतांना काही निविदा अंदाजपत्रकापेक्षा कमी दराच्य प्राप्त झालेल्या होत्या. त्यामुळे त्या कामाच्या बचतीमधून किराडपुरा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन १९९०-९१ च्या दरपत्रकानुसार रु.३,८६,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी दिनांक ०७.१०.९२ रोजी मंजूरी दिली.

त्यानुसार रु.३,६७,३४५/- च्या कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.४/९२-९३ ही प्रसिध्दीस देण्यासाठी जनसंपर्क अधिकारी यांचेकडे पाठविण्यांत आली असता त्यांचे मार्फत दै.अजिंठा, दै.नवा मराठा, दै.औरंगाबाद टाईम्स व दै.आलमगिर टाईम्स मध्ये प्रसिध्दीस देण्यांत आली व त्यानुसार कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारिख २३.१०.९२ पर्यंत १२ कोऱ्या निविदा विक्री झाल्या. व निविदा स्विकृतीच्या नियोजित तारिख ३०.१०.९२ रोजी फक्त चार मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या असल्याचे दिनांक ३०.१०.९२ रोजीच निविदापेटी उघडल्यानंतर दिसून आले. चार मोहरबंद निविदा उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एन.जी.गुनवाणी | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९% जास्त |
| २. | श्री.कैसर खान | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त |
| ३. | श्री.मौला अलियारखान | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त |
| ४. | श्री.रफिकद्दीन | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची निविदा श्री.कैसर खान यांची अंदाजपत्रकापेक्षा १०% जास्त दराची होती. तथापि, मा.आयुक्त यांचे दिनांक ०७.११.९२ च्या आदेशाप्रमाणे ठेकेदारास आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.मनपा/विका/३५०/९२, दि.१२.११.९२ नुसार दर वाटाघाटीसाठी दिनांक १३.११.९२ रोजी मा.आयुक्तांच्या दालनात उपस्थित राहण्यासाठी कळविण्यांत आले त्यानुसार ठेकेदार श्री.कैसर खान हे समक्ष उपस्थित राहीले व मा.आयुक्त तथा मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे उपस्थितीत ठेकेदाराने १०% जास्त ऐवजी ७% जास्त दराने काम करण्याचे मान्य केले असून तसे ठेकेदाराने लेखीपत्र सुध्दा दिले आहे.

त्यानुसार किराडपुरा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी श्री.कैसर खान यांनी दर वाटाघाटीत मान्य केल्याप्रमाणे व त्यांचे लेखी पत्रानुसार अंदाजपत्रकापेक्षा ७% जास्त दराची निविदा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९०-९१ च्या शासकीय विशेष अनुदानाच्या प्रस्तावित नाला ट्रेनिंगच्या कामातील बचतीतून किराडपुरा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधण्यासाठी कामाकरिता गुत्तेदार श्री.कैसर खान यांचेशी दिनांक १३.१२.९२ रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२५/२० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गायमुख पाणी पुरवठा केंद्रास संरक्षित भिंत बांधावयाची आहे. स्थायी समितीचा ठराव क्रमांक - २६९/९, दिनांक ३०.०९.९२ नुसार या कार्यालयाची निविदा सूचना क्र.४१/९२-९३ (पुनर्निविदा) ही दैनिक अजिंठा, आलमगीर टाईम्स, औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत व वेळेपर्यंत एकूण १४ निविदा विक्री झाल्या सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण-४ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा हया दिनांक २४.११.९२ रोजी उघडण्यांत आल्या ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एल.एम.पडघन | - | ११.००% जास्त |
| २. | श्री.सय्यद तौफिक अहेमद | - | ४.९९% जास्त |
| ३. | श्री.मौला अलीयारखान | - | १५.००% जास्त |
| ४. | श्री.कैसर खान | - | १०.००% जास्त |

वरीलप्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री.सय्यद तौफिक अहेमद यांचा आहे. परंतू त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्र.१३०७/९२, दि.०४.१२.९२ नुसार मा.आयुक्त यांच्या दालनात दिनांक ०५.१२.९२ रोजी ठेकेदार श्री.सय्यद तौफिक अहेमद यांचे सोबत दराबाबत वाटाघाटी करण्यांत आली असता सदरचे काम हे ४.००% जास्त दराने करण्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली असून ठेकेदारांनी सम्मती दिली आहे.

करिता वाटाघाटीच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.००% जास्त दराची श्री.सय्यद तौफिक अहेमद यांची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** प्रस्तावित कामाचे गुत्तेदार श्री.सय्यद तौफिक अहेमद यांनी दिनांक २२.१२.९२ च्या अर्जाद्वारे खाजगी कारणानिमित्त विहीत मुदतीत उक्त काम पूर्ण करण्यांस लेखी असमर्थता दर्शविली आहे. तसेच गुत्तेदार श्री.कैसर खान यांनी दिनांक २२.१२.९२ च्या अर्जाद्वारे प्रस्तावित काम पाहिल्या गुत्तेदाराचे दरात म्हणजे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने विहीत मुदतीत पुर्ण करण्याची तयारी दर्शविली आहे. तेव्हा प्रस्तावित काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने श्री.कैसर खान यांचेकडून करुन घेणे बाबत आवश्यक त्या दुरुस्तीसह ठरावास मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावित कामाचे गुत्तेदार श्री.सय्यद तौफिक अहेमद यांनी दिनांक २२.१२.९२ च्या अर्जाद्वारे प्रस्तावित काम विहीत मुदतीत पुर्ण करण्यांस असमर्थता दर्शविल्यामुळे आणि दिनांक २२.१२.९२ च्या अर्जाद्वारे गुत्तेदार श्री.कैसर खान यांनी उक्त काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने (पहिल्या गुत्तेदाराचे दरात) तयारी दर्शविल्यामुळे गायमुख पाणी पुरवठा केंद्रास संरक्षित भिंत बांधण्याचे काम दिनांक २२.१२.९२ च्या अर्जाप्रमाणे गुत्तेदार श्री.कैसर खान यांचेमार्फत अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२६/२१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.१२ जयवंतपुरा वैशाली नगर येथे १५० मी.मी.व्यासाची व २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु.२,५०,०००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यांत आलेले असून सदर काम सन १९९१-९२ च्या शासकीय अनुदानातून करण्यांस्तव मंजूरी मिळालेली आहे. तसेच सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१३/१२८३/९२, दि.१८.०९.९२ नुसार दैनिक देवगिरी तरुण भारत आलमगीर टाईम्स व लोकधर्म, या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यांत आलेल्या होत्या त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एल.एम.पडघन | - | ७.८०% जास्त |
| २. | श्री.सय्यद रफिकउद्दीन | - | ११% जास्त |
| ३. | मे.जाधव कन्स्ट्रक्शन | - | ८.५०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.८०% जास्त दराचे श्री.एल.एम.पडघन यांचे दरपत्रक आहे. परंतू सदर निविदेतील दर योग्य वाटत नसल्यामुळे मा.आयुक्त यांनी संबंधितास वाटाघाटी करिता पाचारण करण्यांत आले होते. मा.आयुक्त यांच्या दालनात दर वाटाघाटी झाली. ७.८०% जास्त ऐवजी ४% जास्त दराने काम करण्यास मंजूरी मिळालेली आहे. करिता श्री.एल.एम.पडघन यांची ४% जास्त दराची निविदा मंजूर करण्यांस्तव प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१२ जसवंतपुरा, वैशालीनगर येथे १५० व २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी गुत्तेदार श्री.एल.एम.पडघन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार संबंधित गुत्तेदाराशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२७/२२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा विभागासाठी खरेदी करण्यांत येणाऱ्या अे.सी.प्रेशर पाईप्स व सी.आय.डी.जॉईन्टसच्या रक्कम रु.४,९९,९५०/- च्या अंदाजपत्रकास दिनांक २४.०७.९२ च्या स्थायी समितीत ठराव क्र.१७६/२५ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र लघु उद्योग विकास मंडळ मर्यादित हयांनी (रेट कॉन्ट्रॅक्ट) ची दरसुची क्र. दिनांक २० ऑगस्ट, १९९२ व दिनांक १९ ऑगस्ट १९९२ अन्वये दिलेली आहे. ए.सी.पाईप्स व सी.आय.डी.जाईन्टसचे दर खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | १०० मी.मी.व्यासाचे | - | रुपये १०५.१७ प्रति |
| | ए.सी.प्रेशर पाईप क्लास-१० | - | र.मिटर |
| २. | १५० मी.मी.व्यासाचे | - | रुपये १६४.०३ प्रति |
| | ए.सी.प्रेशर पाईप क्लास-१० | - | र.मिटर |
| ३. | १०० मी.मी.व्यासाचे सी. | - | रुपये ७३.०० |
| | आय.डी.जॉईन्टस क्लास-१० | - | प्रति संघ |
| ४. | १५० मी.मी.व्यासाचे सी. | - | रुपये ११०.०० |
| | आय.डी.जॉईन्टस क्लास-१० | - | प्रति संघ |

तर वरीलप्रमाणे दिलेल्या महाराष्ट्र लघु उद्योग विकास मंडळ मर्यादित हयांच्या (रेट कॉन्ट्रॅक्ट) च्या दरास मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावित विषयी पुढील सभेत विचार करण्यांत येईल. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.४२८/२३ :**

उपअयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, सन्माननिय नगरसेवकांच्या निधीमधून त्यांनी वेळोवेळी मागणी केलेल्या क्रिडा साहित्य खरेदीसाठी दै.लोकविजय, व दै.मुफस्सीर या वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण पाच निविदा विक्री झाल्या व सदरील पांचही निविदा कार्यालयास प्राप्त झाल्या. सदरील निविदाचे तुलनात्मक तक्ता तयार केला असता मे.इंटरनॅशनल स्पोर्टस, निराला बाजार यांचे दर आयटम क्र.१ ते ६, ११ व १२ चे दर सर्वात कमी आहेत. तर मे.इंटरनॅशनल स्पोर्टस व मे.जे.जे.इंटरप्राईजेस यांचे दर आयटम क्र.९ व १३ चे समान आहेत. तसेच मे.सचिन स्पोटर्स चे दर आयटम क्र.७ व ८ तसेच मे.ऑलिंपिक स्पोटर्स चे आयटम क्र.१० चे दर सर्वात कमी आहेत.

निविदांच्या अटी शर्तीनुसार मे.इंटरनॅशनल स्पोर्टस यांनी क्रिडा साहित्याचे नमुने कार्यालयात दाखल केले होते. तरी मे.इंटरनॅशनल स्पोटर्स यांची निविदा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावित विषयी पुढील सभेत विचार करण्यांत येईल असे सर्वानुमते ठरले.

## ऐनवेळचे विषय

**विषय ४२९/२४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरातील पाणी पुरवठ्यांची देयके ही कॉम्प्युटरने तयार करुन घ्यावयाची आहेत. सिडको येथील पाणी पुरवठ्याची देयके ही मे.युनिक स्टिमस औरंगाबाद यांचेतर्फे रु.२.०८ प्र.नग या दराने करुन घेण्यासाठी स्थायी समितीचा ठराव क्र.२५८/३३, दि.२९.०८.९२ अन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे. शहरातील पाणी पुरवठ्याची देयके ही कॉम्प्युटरने तयार करुन घेतल्यास वेळेत बचत होईल.

करिता मे.युनिक स्टिमस औरंगाबाद यांच्या मंजूर दरानुसार म्हणजेच रु.२.०८ प्र.नग या दराने त्यांचे तर्फे तयार करुन घेण्यासाठीचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको विभागाप्रमाणे शहरातील पाणी पुरवठ्याची देयके कॉम्प्युटरने तयार करुन घेण्यासाठी प्रति नग रुपये २.०८ पैसे या दराने म.युनिक सिस्टीम्स यांचे कडून मार्च-१९९३ अखेर पर्यंतची बिले तयार करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३०/२५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यानाच्या बस स्टँड कडील बाजुस कंपाऊंड वॉल बांधणे बाबत कामाचे अंदाजपत्रकीय १,६६,२१०/- रकमेस स्थायी समिती विषय क्र.२२७/२, दि.२९.०८.९२ च्या मंजूरी अन्वये सदरील कामाचे बी-१ नमुन्यात निविदा सूचना शहरातील दै.लोकविजय, दै.मुफस्सीर, औरंगाबाद टाईम्स मराठवाडा इ.वर्तमान पत्राद्वारे प्रसिध्द करण्यांत आले. त्या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण-१५ (पंधरा) कोरे निविदा फॉर्म विकण्यांत आले व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत एकूण ४ (चार) निविदा फॉर्म दर भरुन प्राप्त झाले. सदरील निविदा पत्रके उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले. त्यात दर्शविलेले दर खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | एजन्सीचे संपूर्ण नांव | दिलेले दर |
|---|---|---|
| १ | आर.अे.शेख | ९.८६% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| २ | सय्यद सिराजोद्दीन | १५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| ३ | किशोर शेलार | १७% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| ४ | आनंद बिल्डर्स | २०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |

सदरील दरात सर्वात कमी दर श्री.आर.अे.शेख, गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.८६% जास्त दर आहे. त्या अनुषंगाने मा.आयुक्तांनी सदरील कामाचे दिलेले दर जास्त वाटत असल्याने ६% जास्त दर काम करण्यास मान्यता दिली याबाबत संबंधित गुत्तेदार यांनीही ९.८६% ऐवजी ६% जास्त दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानाच्या बस स्टँड कडील बाजुस कंपाऊंड वॉल बांधण्याचे काम गुत्तेदार श्री.आर.अे.शेख यांचे कडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ६% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३१/२६ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.काचीवाडा येथे फाईल फाऊंडेशन करुन त्यावर शौचालय बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.०१.०६.९२ ठराव क्र.२८/२५ अन्वये रक्कम रु.१,२७,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन बी-१ निविदा सूचना क्र.मनपा/शअ/४७०/९२, दि.०८.०७.९२ अन्वये निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (४) निविदा विक्री झाल्या पैकी निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन (३) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दिनांक ०१.०८.९२ ला उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एल.एम.पडघन | - | १५% जास्त दराने |
| २. | श्री.सय्यद सिराजोद्दीन | - | ११% जास्त दराने |
| ३. | श्री.एम.ए.सिद्दीकी | - | ५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री.एम.ए.सिद्दीकी यांचे निविदा दर आहे. दर जास्त वाटत असल्याने मा.आयुक्तां समवेत दि.२२.१२.९२ ला दराचे वाटाघाटी घेऊन सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त ऐवजी ४% जास्त दराने मा.आयुक्तांनी मान्य केले.

तरी सदरच्या कामासाठी श्री.एम.ए.सिद्दीकी यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची निविदा मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला काचीवाडा येथे फाईल फांऊडेशन करुन त्यावर शौचालय बांधण्याच्या कामासाठी गुत्तेदार श्री.एम.ए.सिद्दीकी यांचेशी दिनांक २२.१२.९२ रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३२/२७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विषय क्र.३६०/७०, दि.१७.१०.९२ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये एकूण ५०,००० गोणी सिमेंट मागणी पैकी २०००० सिमेंट गोणी खरेदीस सी.सी.आय.कंपनीचे सिमेंट व्ही.अे.ट्रेडींग पुरवठा धारकाकडून प्रति टन रुपये २०३०/- प्रमाणे एकूण २०,००० गोणी सिमेंट खरेदी करण्यांत आल्या.

तरी आता विभागाची मागणी व शासनाच्या अनुदानातील कामे प्रगतीपथावर असल्यामुळे कामे अडून पडू नये म्हणून तुर्त २०,००० गोणी सिमेंट खरेदी करणे आवश्यक आहे. याबाबत संबंधित पुरवठाधारक व्ही.अे.ट्रेडींग कंपनी यांना सिमेंटच्या दर कमी करण्या बाबत विचारणा केली असता त्यांनी दिनांक २२.१२.९२ रोजी पत्रक देऊन सिमेंट दर कमी करण्याबाबत नकार दिला आहे. अशा परिस्थितीत नवीन निविदा मागविल्यास बराच अवधी लागेल. व शासकीय अनुदानातील कामे पूर्ण होणार नाहीत. त्यादृष्टीने वरील दराने म्हणजे प्रति टन रक्कम रु.२०३०/- (रुपये दोन हजार तीस) या दराने तुर्त १००० टन सिमेंट

व्ही.अे.ट्रेडींग कंपनी कडून खरेदीस्तव तसेच एकूण रक्कम रुपये २०,३०,०००/- (रुपये वीस लाख तीस हजार) रुपयास मान्यतेस्तव सादर.

तसेच पुढील चौथ्या तिमाही साठी विभागाची मागणी पाहता एकूण- १,०८,३१० सिमेंट गोणीची आवश्यकता आहे. तरी चौथ्या तिमाही साठी निविदा मागविण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विविध विभागाकडील मागणी व शासनाच्या अनुदानातील प्रगतीपथावर असलेली कामे अडून पडू नये म्हणून दि.१७.१०.९२ च्या मंजूरीनुसार प्रति टन रु.२०३०/- या दराने तुर्त १००० टन सिमेंट मे.व्ही.अे.ट्रेडर्स कंपनी यांचेकडून खरेदी करण्यास आणि त्यासाठीच्या एकूण रक्कम रु.२०,३०,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत

तसेच पुढील चौथ्या तिमाही साठी विविध विभागांकरिता लागणारे १,०८,३१० गोणी सिमेंट खरेदी करिता दराबाबत मे.व्ही.अे.ट्रेडींग कंपनी यांचेशी वाटाघाटी करण्यांत याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.४३३/२८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथे खडीरस्ता व डांबरीकरण करणे बाबत कामासाठी सा.बां.खात्याचे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.३,५०,७६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. परंतू सदरील अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजूरी नजर चुकीने घेण्यांत आलेली नाही.

सदरील कामाचे बी-१ नमुन्यात निविदापत्रके मागविण्या करिता शहरातील, दै.लोकविजय, मुफस्सीर, औरंगाबाद टाईम्स, मराठवाडा, ई.वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यांत आले त्या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा फॉर्म एकूण पाच (०५) विकण्यांत आले. व स्विकारण्याच्या तारखेस एकूण दोन निविदा फॉर्म दर भरुन प्राप्त झाले. त्या दर्शविलेले दर खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | खाजा मोईनुद्दीन | - | ११.८६% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराचे |
| २. | मेसर्स राय कन्स्ट्रक्शन | - | १२% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराचे |

सदरील दर पत्रकात सर्वात कमी दर तुलनात्मकदृष्टीने श्री.खाजा मोईनोद्दीन गुत्तेदार यांचे ११.८६% जास्त दराचे दर आहे.

मा.आयुक्त साहेब यांनी दिलेल्या दराबाबत संबंधित गुत्तेदारांशी वाटाघाटीसाठी बोलवावे त्या अनुषंगाने गुत्तेदार यांचाशी अंतिम असे ठरले की, सदरील काम ९% जास्त दराने करावे तेही संबंधित गुत्तेदार यांनी ११.८६% ऐवजी ९% जास्त दराने करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

करिता रक्कम रु.३,५०,७६०/- अंदाजपत्रकास व वाटाघाटीनुसार ९% जास्त दराने खाजा मोईनोद्दीन यांचे कडून काम करुन घेण्यास मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे खडी रस्ता व डांबरीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रु.३,५०,७६०/- च्या अंदाजपत्रकास आणि प्रस्तावित कामासाठी गुत्तेदार श्री.खाजा मोईनोद्दीन यांच्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम

संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३४/२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, अग्नीशमन दलासाठी फायर टेंडरसाठी १२१० चेसीस खरेदी करण्यांत आल्या आहेत. त्यावर फायर टेंडर फॅब्रीकेशन साठी मे.कन्सेप्ट इंजिनिअर्स यांचे दर सर्वात कमी रुपये ३,२०,५७६/- इतके आहेत. यामध्ये महानगरपालिकेला पंप पुरवठा करावयाचा आहे.

फायर एक्स पंपसाठी एकूण अंदाजित खर्च रुपये ७०,०००/- येणार आहे. सदरील खर्च शासकीय अनुदान १९९१-९२ मधून करण्यांत येणार आहे.

करिता कन्सेप्ट इंजिनिअर्स यांच्याकडून फायर टेंडर फॅब्रीकेशन करणे व फायर एक्स कंपनीकडून पंप खरेदी करणेच्या प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

**मा.सभापती :** अग्निशमन अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** अग्निशमन अधिकारी कार्यालयात हजर नाही. ते काही निमित्त बाहेर गेले आहेत. प्रस्तावित कामासाठी अंतरराष्ट्रीय दर्जाचे मे.ब्रिजवाशी उद्योग कंपनी मथफरा यांचेकडून काम करुन घेण्यांत यावेत.

**श्री.अजिजुल्ला बेग, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.जावेद हसन खान, श्री.जयंत ओक :** अंतरराष्ट्रीय दर्जाच्या फायर बॉडी बिल्डींगची कंपनी मे.ब्रिजवाशी उद्योग मथुरा ही असून त्यांच्याकडून काम करुन घेण्यांत यावेत.

**मा.सभापती :** सर्व स.सभासदांच्या सूचना लक्षात घेता मे.ब्रिजवाडी उद्योग मथुरा यांच्याकडून काम करुन घेण्यांत येते. तसेच त्यांच्या टेंडर मध्ये नमूद केलेले इतर साहित्य ही मंजूर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन दलासाठी खरेदी करण्यांत आलेली १२१० चेसीस वर फायर टेंडर फॅब्रीकेशन करण्यांचे काम व इतर साहित्य या करिता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मे.ब्रिजवाशी उद्योग मथुरा यांचे रुपये ५,०८,७१०/- चे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १३.०१.१९९३ रोजी दुपारी ३.३० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. बुधवार दिनांक १३.०१.१९९३ रोजी दुपारी ३.३० वाजता समिती सभागृहात मा.सभापती ॲड.श्री.इकबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
२. श्री.भगुरे तुळशीराम छगन
३. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
५. श्री.जावेद हसन खान कसीम हसन खान
६. श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
७. श्री.पेरकर विठ्ठल कोंडाजी
८. श्री.शिंदे मधुकर माणिकराव
९. श्री.ओक जयवंत केशवराव

**विषय क्र.४३५/१ :**

दिनांक २३.१२.९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :-</u>**

**श्री.गिरजाराम हाळनोर :** महापालिका प्रशासनातर्फे ध्वनी चित्रफितीचा जो कार्यक्रम आयोजित करण्यांत आला होता त्या कार्यक्रमांतर्गत ज्या ज्या प्रभागातील कामाचे चित्रीकरण करण्यांत आले त्यावेळी संबंधित विभागाचे नगरसेवक यांना विश्वासात का घेण्यांत आले नाही. या चित्रीकरणाचे वेळी सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालय रिटेनिंग वॉल इत्यादी कामाचे चित्रीकरण करण्यांत आले याच उद्यानात असलेल्या पोहण्याच्या तलावाचे मात्र चित्रीकरण करण्यांत आले नाही. तेव्हा ध्वनीफित चित्रीकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यामागे प्रशासनाचा उद्देश काय होता? याचा खुलासा करावा. तसेच चित्रीकरण करतांना नगरसेवक आणि काही अधिकारी यांना का डावलण्यात आले. याचा खुलासा व्हावा. तसेच या कामासाठी रु.१.५० लाख खर्च का करण्यांत आला तसेच प्रशासनातर्फे करण्यात आलेल्या ध्वनीफित चित्रीकरणाचा कार्यक्रम दुरदर्शनवर दाखविण्यांत येणार आहे काय? या चित्रीकरणाच्या फितीचे डबींग करण्यांत येणार आहे काय? यासाठी ३/४ हजार खर्च होतात.

**मा.उपआयुक्त :** सभासदांच्या सुचनेप्रमाणे ध्वनीफित चित्रीकरणासाठी रु.१.५० लाख खर्च झालेला नाही. या कामासाठी साधारणतः ९९,७००/- रुपये खर्च झालेला आहे. महापालिकेच्या कामकाजाविषयी नागरिकांकडून सतत होणारी ओरड वृत्तपत्रात छापून येणाऱ्या विविध बातम्या या बाबींचा विचार करुन महापालिकेतर्फे करण्यांत आलेल्या अनेक कामांचा आढावा जनतेसमोर ठेवण्याच्या दृष्टीने चित्रीकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यांत आला. शहरात

करण्यांत आलेल्या चित्रीकरणात मा.महापौर, मा.सभापती व इतर पांच पदाधिकारी यांचा समावेश करण्यांत आलेला आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.जयवंत ओक, श्री.अजिजुल्ला बेग :** एकनाथ नगर भागातील कनव्हरशनच्या कामी प्रत्येक नागरिकांकडून रु.५००/- जमा करुन कनव्हरशनचे काम पुर्ण करण्यास संबंधित वार्डाचा नगरसेवक या नात्याने सहकार्य करण्यांत आले आहे. परंतू या कामाचे चित्रीकरण करतांना नगरसेवक म्हणून विश्वासात घेण्यांत आले नाही किंवा तशा प्रकारची साधी कल्पनाही देण्यांत आली नाही. सिध्दार्थ उद्यान येथील चित्रीकरणामध्ये पोहण्याच्या तलावाच्या कामाचा समावेश का करण्यांत आला नाही. या कामावर बराच खर्च करण्यांत आला आहे. तसेच चित्रीकरणाचा कार्यक्रम ही धोरणात्मक बाब (पॉलीशी मॅटर) आहे. तेव्हा त्यास रितसर कार्यवाही होणे आवश्यक होते. तेव्हा याबाबत आम्हाला सविस्तर खुलासा करण्यांत यावा.

**प्रकल्प अधिकारी :** महापालिका स्थापनेनंतर शहर विकासाची कामे याशिवाय छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी पुतळ्याचे अनावरण प्रसंगी पुर्वी घेतलेल्या कॅसेट या सर्वांचे एकत्रित चित्रीकरण करणे आणि बांधकाम परवानगी नळ कनेक्शन, इत्यादी मनपाच्या दैनंदिन कामाचे चित्रीकरण करुन त्याविषयी नागरिकांना माहिती देता यावी म्हणून १/१ तासाच्या दोन फिल्म घेण्याचे ठरविण्यांत आले. त्यानुसार मराठवाडा आणि सकाळ या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द केली असता एकूण तीन (३) दरपत्रके (अटीसहचे) वसुल झाले. त्यापैकी व्हिजन ग्राफर्स यांचे दोन तासासाठी रुपये ९९,७००/- सर्वात कमी दराचे दरपत्रक आहे. अशा प्रकारे युमॅटीक चित्रीकरण केल्यास ते बरेच वर्षे टिकते आणि त्यावर अनेक व्ही.एच.एफ.कॅसेट बनविता येतील. अशा दोन कॅसेटस एजन्सी अधिक आकार न घेता देणार आहे. आणि अशा प्रकारे तयार करण्यांत आलेल्या कॅसेट नागरिकांना विविध भागात दाखविण्यासाठी एक व्हिसीआर व दुरदर्शन संच खरेदी करण्याचा प्रस्तावित आहे.

**श्री.जयवंत ओक, श्री.नारायण फत्तेलष्कर :** प्रशासनाने तयार केलेल्या ध्वनीचित्रफित चित्रीकरणात काही ठराविक अधिकारी दिसणार असून याचा अर्थ शहरात आतापर्यंत जो विकास झाला त्यात नगरसेवक किंवा बाकीचे अधिकारी यांचा कोणताही सहभाग नव्हता असे चित्र जनतेसमोर येणार आहे. यावरुन चित्रीकरणाच्या कार्यक्रमात नगरसेवकांचा समावेश नसल्याबाबत प्रशासनास आपली चुक झाली आहे. असे वाटते काय? त्याबाबत प्रशासनातर्फे खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त :** काही नगरसेवक व तसेच माजी महापौर यांचा समावेश केलेला आहे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** ध्वनीफित चित्रीकरणाबाबत आतापर्यंत झालेल्या चर्चेबाबत मा.सभापती काहीही निर्णय देत नाही याचा निषेध म्हणून आम्ही २.०० मिनीट सभात्याग करीत आहोत.

(स.सभासद श्री.नारायण फत्तेलष्कर यांच्या सुचनेप्रमाणे स.सभासद श्री.नारायण फत्तेलष्कर, तुळशीराम भगुरे, श्री.अलीम बेग, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.जावेद हसन खान, श्री.अजिजुल्ला बेग, श्री.विठ्ठल पेरकर, श्री.मधुकर शिंदे, श्री.जयवंत ओक या सभासदांनी ४.०० वाजता सभात्याग केला.) यानंतर ४.०२ मिनीटांनी सर्व सभासद पुन्हा सभागृहात स्थानापन्न झाले.

**श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.अजिजुल्ला बेग :** दुपारी ४.०० नंतर कोणतेही अधिकारी कार्यालयात हजर नसतात. त्यामुळे कामानिमित्त कार्यालयात येणाऱ्या नागरिक आणि नगरसेवक यांची कुंचबणा होते.

**मा.उपआयुक्त :** कार्यालया बाहेर कामानिमित्त जाणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांनी दररोज प्रथम १०.०० वाजता कार्यालयात येऊन ते कोणत्या कामावर जाणार आहेत. याची नोंद मोव्हमेंन्ट रजिस्टरवर घेतल्या नंतरच कार्यालयानी कामानिमित्त बाहेर जावे आणि दुपारी ३.०० नंतर परत कार्यालयात हजर व्हावे. ३.०० नंतरही ज्या अधिकात्यांना कार्यालयीन कामासाठी बाहेर जावे आणि दुपारी ३.०० नंतर परत कार्यालयात हजर व्हावे. ३.०० नंतरही ज्या अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामासाठी बाहेर जाणे आवश्यक असेल किंवा सकाळी कार्यालयीन कामानिमित्त बाहेर पडलेल्या अधिकाऱ्यांना ३.०० नंतर कार्यालयात हजर रहाणे शक्य नसेल तर अशा अधिकाऱ्यांनी त्याबाबतची पुर्व सूचना संबंधित वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे द्यावी. अशा प्रकारचे स्पष्ट आदेश देण्यांत आल आहेत. या आदेशाचा भंग करुन जो कोणी अधिकारी अथवा कर्मचारी दुपारी ३.०० नंतर कार्यालयात हजर नसतील अशा वरीष्ठ अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती बाबतची बाब सं.नगरसेवकांनी नजरेस आणून दिल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.अजिजुल्ला बेग, श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.अलीम बेग :** आता सभा चालू असतांना जरी पाहणी केली तरी विशेषतः नगररचना विभाग, विद्युत विभाग, या विभागामध्ये अधिकारी किंवा कर्मचारी कार्यालयात हजर नसल्याचे दिसून येईल. तेव्हा आताच या विभागाची पाहणी करण्यांत यावी. तसेच प्रशासनातर्फे विविध विभागांना अचानकपणे भेट देण्यांत येत नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. अधिकारी अथवा कर्मचारी यांचे उपस्थिती बाबतची जबाबदारी प्रशासनाची आहे.

**मा.सभापती :** स.सभासदांच्या सुचनेप्रमाणे संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या उपस्थिती बाबत पाहणी करण्यांत यावी.

**मा.सभापती :** यांचे वरील रुलींग प्रमाणे सभागृहातील उपस्थित सर्व सभासद व अधिकाऱ्यांसह विभागातील कर्मचारी व अधिकारी यांचे उपस्थितीबाबत पाहणी करण्यासाठी स.सभासद व अधिकारी यांनी ४.५० वाजता सभागृह सोडल. पाहणी नंतर ठीक ४.५५ वाजता सर्व सभासद व मा.सभापती पुन्हा सभागृहात उपस्थित झाले.

**श्री.विठ्ठल पेरकर, श्री.अजिजुल्ला बेग :** महापालिकेत काम करणाऱ्या एम.पी.डब्ल्यु. कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत सभागृहाने मंजूरी दिली आहे. परंतू त्याबाबत प्रशासनातर्फे काहीही कार्यवाही झाली नाही. अशी माहिती मिळाली तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**सहा.आयुक्त :** सभागृहाच्या मंजूरीनुसार एम.पी.डब्ल्यु यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबतच प्रकरण शासनाकडे मंजूरीसाठी पाठविले आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** कार्यालयातील एम.पी.डब्ल्यु कर्मचाऱ्यांनी वेतनश्रेणीची मागणी करतांना ज्या शासकीय परिपत्रकाचा त्यांचा अर्जात हवाला दिला आहे. ते परिपत्रक मनपा कर्मचाऱ्यांना लागू नाही. एम.पी.डब्ल्यु.कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्जात ज्या शासकीय परिपत्रकाचा उल्लेख केला आहे. त्या जी.आर.प्रमाणे

जिल्हा परिषदेत काम करणाऱ्या जुन्या कर्मचाऱ्यांना तो जी.आर.लागू आहे. (उदा.पटकी, लस टोचक इत्यादी जुने कर्मचारी)

**श्री.अलिम बेग :** सभागृहाने एखाद्या विषयाची तातडी लक्षात घेऊन त्याच सभेत मंजूरी आणि स्विकृती दिल्यानंतर याबाबतची माहिती संबंधित उप अभियंतांना केव्हा मिळावी या बाबतचा खुलासा व्हावा. सभागृहाने मंजूरी आणि स्विकृती दिल्यानंतर त्या सभेचे इतिवृत्त संबंधित विभागाकडे गेल्यानंतर त्या कामास स्विकृतीही देण्यांत आली आहे. ही बाब संबंधित उप अभियंता यांच्या लक्षात येते. त्यामुळे स्विकृती देऊनही कामास विलंब होतो. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर ज्या विषयांना त्याच सभेत स्विकृती देण्यांत आली आहे. अशा विषयाबाबतची माहिती मा.सचिव यांनी संबंधित विभागास कळवावी.

**मा.सचिव :** सभागृहात विभाग प्रमुख उपस्थित असतात. ज्या विषयांना स्विकृती देण्यांत आली आहे. त्याबाबतची माहिती संबंधित विभाग प्रमुखाने संबंधित शाखा प्रमुख यांना कळवावी. खुलासा करणे योग्य होणार नाही.

**मा.उपआयुक्त :** सभागृहाने स्विकृती दिलेल्या विषयाबाबत सचिव विभागाकडून लेखी खुलासा झाल्यानंतरच संबंधित विभाग प्रमुख त्याबाबत वरीष्ठांकडे कार्यवाही करु शकतील. तेव्हा अशा प्रकारचा खुलासा सचिव विभागातर्फेच करण्यांत यावा.

**श्री.मधुकर शिंदे :** स्थायी समितीने मंजूरी दिलेल्या ठरावांची अंमलबजावणी होते काय? सभागृहाने मंजूरी दिली तरी अर्थसंकल्पात तरतूद शिल्लक नाही असे सांगण्यांत येते. मग सभागृहासमोर ठेवण्यांत आलेल्या विषयासाठी निधी कोठून उपलब्ध झालेला आहे. तांबे गल्लीतील खडीकरण केव्हा होणार. सार्वजनिक दिव्यांच्या पोलबाबत दिड महिन्यांपासून मंजूरी मिळाली आहे. परंतू अद्याप काम झाले नाही. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** स.सभासदरांनी विचारलेल्या कामाबाबत माहिती घेऊन खुलासा करता येईल.

**श्री.अजिजुल्ला बेग, श्री.विट्ठल पेरकर :** उप अभियंता यांना सभागृहात हजर राहण्याबाबत मा.आयुक्त यांनी जो निर्बंध (          ) लावला आहे. तो उठविण्यांबाबत मा.सभापती यांनी मा.आयुक्त यांना पत्र द्यावे म्हणजे चालु कामाबाबत संबंधित उप अभियंता सभागृहास आवश्यक ती माहिती देऊ शकतील. सर्वच कामांची माहिती विभागप्रमुखांना असते असतेच असे नाही.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** निवडणूक काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**श्री.मधुकर शिंदे :** सभागृहाने मंजूरी देऊनही निवडणूक काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्यांत आली नाही. परंतू प्रशासनाने काही कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ दिली आहे. तेव्हा याचा अर्थ प्रशासन भेदभाव (पार्सलिटी) करत आहे.

**मा.उपआयुक्त :** आगाऊ वेतनवाढ बाबत यापुर्वी सभागृहात आवश्यक तो खुलासा केला आहे. आगाऊ वेतनवाढ ही उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचे गोपनिय अहवाल पाहून दिली जाते. यासाठी एक कमीटी नियुक्त करण्यांत आली आहे. तेव्हा आगाऊ वेतनवाढ देतांना भेदभाव (पार्सलिटी) केला जातो

हे म्हणणे योग्य आहे काय? आगाऊ वेतनवाढ देतांना सर्वच कर्मचाऱ्यांचा विचार केला जातो. निवडणूक काळातील कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र विचार केला जाणार नाही. आगाऊ वेतनवाढ ही एकूण कर्मचाऱ्यांच्या फक्त २% कर्मचाऱ्यांनाच मिळते.

**श्री.मधुकर शिंदे :** भिकन पटेल यांना डावलुन अन्य कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली आहे. याबाबत सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार काय कार्यवाही झाली. याबाबत खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त :** सदर प्रकरणी यापुर्वीच्या सभेत खुलासा करण्यांत आला आहे. आवश्यकता भासल्यास स.सदस्य संचिका पाहु शकतात.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** माजी आयुक्त यांचे काळात खरेदी करण्यांत आलेल्या सिमेंट प्रकरणाबाबत सभागृहाच्या मंजूरीनुसार काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा.सचिव :** सभागृहाच्या मंजूरीनुसार सदर प्रकरणी कार्यवाही करण्यांत आली आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये रुपये ३०००/- हजार पर्यंत भाडे असलेली जागा एक वर्षाच्या कालावधीपर्यंत भाड्याने देण्याचे अधिकार मा.आयुक्तांना आहेत. अशी जागा भाड्याने दिल्यानंतर त्याबाबत १५ दिवसाच्या आत स्थायी समितीस कळविणे आवश्यक आहे. तेव्हा अशाप्रकारे भाडेपट्टा झालेल्या जागेबाबत खुलासा करण्यांत यावा.

**मा.उपआयुक्त :** भाडेपट्ट्याने देण्याचे दोन प्रकार आहेत. १) हंगामी भाडे पट्टा, २) कायम भाडेपट्टा महापालिका स्थावर जंगम भाडे पट्टयाने देतांना ११ महिन्याच्या कालावधी साठी हंगामी भाडेपट्टा करुन घेते. सदर मुदत संपल्यानंतर पुन्हा अशाप्रकारे भाडे पट्ट्याचे ११ महिन्या करिता नुतनीकरण करण्यांत येते.

**श्री.अजिजुल्ला बेग, श्री.मधुकर शिंदे :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे टपरीधारकांचा हंगामी भाडे पट्टा झाल्यानंतर त्या भाडेपट्ट्याचे पुन्हा नुतनीकरण करतांना तोच मालक तेव्हा सुरवातीचे ११ महिन्यासाठी टपरीधारका बरोबर प्रशासनाने ११ महिन्याच्या हंगामी भाडेपट्टा केल्यानंतर त्या भाडेपट्ट्याचे वेळोवेळी नुतनीकरण करण्याऐवजी १०/१५ वर्षासाठी टपरी भाडेपट्टयाने देणे बाबतचा ठराव स्थायी समिती समोर ठेवण्यांत यावा. प्रशासनातर्फे हंगामी भाडे तत्वावर ज्या टपऱ्या भाडे पट्ट्याने दिलेल्या आहेत. त्याच टपऱ्या मुळ मालकाने २० हजार रुपये जादा रक्कम वसुल करुन घेऊन पोट भाडे करुंना भाड्याने दिले आहेत. या बाबत प्रशासनातर्फे काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** चेलीपुरा फाजलपुरा पुलाजवळ एक मनपा कर्मचारी बांधकाम करीत आहे. त्या बांधकामास परवानगीही देण्यांत आली आहे. परंतू सदर कर्मचारी परवानगी व्यतिरिक्त जादा बांधकाम करीत आहे. हे जादा बांधकाम नियोजित विकास रस्त्यात बाधित होत आहे. तेव्हा या बांधकामाची पाहणी करण्यांत यावी.

**श्री.अलिम बेग, श्री.नारायण फत्तेलष्कर :** स.सभासद श्री.मोहसीन अहेमद यांना सभागृहास एक पत्र दिले आहे. त्या पत्रानुसार त्यांचे प्रभागात अतिक्रमण होत असून गेल्या ३ वर्षापासून सदर अतिक्रमण काढून टाकण्यांत येत नाही.

**विधी सल्लागार :** स.सभासद श्री.मोहसीन अहेमद यांच्या पत्रकानुसार सदर प्रकरणी मालकी हक्कांबाबत वाद चालू आहे. या प्रकरणावर न्यायालयाचा मनाई हुकूम आहे. सदर प्रकरण जाब जवाब घेण्यासाठी ठेवण्यांत आले आहे. या प्रकरणी लवकर निर्णय व्हावा असा प्रयत्न होत आहे.

**श्री.मधुकर शिंदे :** श्री.रघुनाथ जाधव हे सन १९८४ पासून महापालिका निवास मिळणे बाबत मागणी करता आहे. परंतू आजपर्यंत त्यावर कार्यवाही झाली नाही.

**मा.सभापती :** सदर प्रकरण आजच सभागृहापुढे आले आहे. त्यानुसार लवकर काम होईल.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** शहरातील नाल्याच्या कडेला नागरिक घरे बांधतात त्यामुळे नाला ट्रेडींगच्या कामात अडथळा निर्माण होत आहे. तेव्हा मनपाचे इमारत निरिक्षक काय काम करतात. धोबीघाट तयार करण्यास अडचण निर्माण होत आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** महापालिकेच्या नाहरकत प्रमाणपत्राशिवाय नगर भुमापन कार्यालयाने जमिनीच्या नामांतराची नोंद करु नये. अशा प्रकारचा ठराव सभागृहात मंजूर करुन जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यांत यावा.

**मा.सभापती :** सदर प्रकरणी सभागृहात यापुर्वी चर्चा झाली आहे. आवश्यक ते पत्र संबंधित विभागास पाठविण्यांत आले आहे. त्यानुसार पुन्हा स्मरणपत्र देण्यांत यावे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.अजिजुल्ला बेग :** मागील सभेमध्ये नळ कनेक्शन संचिका प्लंबर मार्फत स्विकारण्यात येऊ नये. अशा प्रकारचे रुलींग मा.सभापती यांनी दिले आहे. पण प्रत्यक्षात मात्र आजही नळ नकेक्शन संचिका प्लंबर मार्फतच स्विकारल्या जातात. त्यामुळे नागरिकांचे व मनपाचे आर्थिक नुकसान होत असून विनापरवाना नळ कनेक्शन वाढत आहे. पाणी पुरवठा बाबत नगर परिषद काळातीलच उपविधी उपलब्ध आहे. या उपविधी प्रमाणे नळ कनेक्शनचे काम चालते. तेव्हा या उपविधीनुसार पाणी पुरवठा समितीस नळ कनेक्शन मंजूर करण्याचे अधिकार आहेत. सध्या पाणी पुरवठा समिती अस्तित्वात नाही. त्याचप्रमाणे नळ कनेक्शन मंजूर करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना सुध्दा नाहीत. तेव्हा पाणी पुरवठा समिती अस्तित्वात नसल्यामुळे नळ कनेक्शन संचिका मंजूरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवणे आवश्यक आहे. याशिवाय नळ कनेक्शन मंजूर करतांना मालमत्ता कर नकाशे नाहरकत प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्र असल्याशिवाय नळ कनेक्शन मंजूर केले जात नाही. यामुळेही विनापरवाना नळ कनेक्शनची प्रकरणे वाढत आहेत. तेव्हा याबाबत योग्य तो खुलासा व्हावा.

**श्री.केशव सोनवणे, माजी सभासद :** (मा.सभापती यांच्या परवानगीने) सिडको येथील १० व्या योजनेतील नागरिकांनी नळ कनेक्शनसाठी प्रत्येकी रु.४००/- एक वर्षाची पाणी पट्टी आणि रु.१००/- (प्रत्येकी) रोड रिपेअर चार्जेस अशा प्रकारच्या रकमेचा भरणा केला असून त्यांना अद्याप पर्यंत नळ कनेक्शन देण्यांत आलेले नाही. नागरी जिवनात पाणी हे नित्याची बाब असल्यामुळे या नागरिकांना त्वरीत नळ कनेक्शन देण्यांत यावे. याबाबत चौकशी केली असता सिडको प्रशासनाने काही रक्कम मनपाकडे जमा केल्याचे कळाले. बाकी रक्कम सिडको प्रशासन भरत राहील तो मनपा आणि सिडको प्रशासनाचा प्रश्न आहे.

**श्री.विठ्ठल पेरकर, श्री.अलिम बेग, श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.मधुकर शिंदे :** १० व्या योजनेतील नागरिकांनी नळ कनेक्शनासाठी

आवश्यक ती रक्कम भरली आहे. सिडको/मनपा प्रशासनाचा आर्थिक वाद आहे. तो त्यांनी प्रशासकीय स्थरावर मिटवावा आणि नागरिकांना त्वरीत नळ कनेक्शन द्यावे.

**मा.सभापती :** सदर प्रकरणी मी स्वतः लक्ष घालते. तत्पुर्वी व्यवस्था म्हणून १० व्या योजने करिता टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यांत यावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** मकबरा ते बुध्दलेण्या पर्यंतच्या रस्त्यावर लाईटची व्यवस्था करण्यांत आली असून सदर लाईट अद्याप चालु झालेली नाही. गुत्तेदाराने दिलेल्या वॉरंटी पिरियेड मध्ये सदर लाईटची तपासणी केली नाही तर मनपाचे आर्थिक नुकसान होईल तेव्हा त्याबाबत खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** मकबरा ते बुध्दलेणी या रस्त्यावरचे लाईट चालु करण्यात आले. या भागातील एक नागरिक सदर कामामध्ये अडथळा आणत होता. त्याबाबत संबंधिताशी बराच वाद झाला. चालु केलेल्या लाईटपैकी फक्त ३ लाईट बंद आहे. सदर लाईट बदलून देण्याचे गुत्तेदाराने मान्य केले.

**श्री.अजिजुल्ला बेग :** चिकलठाणा आरोग्य केंद्र येथे ३ कर्मचारी काम करतात. त्यापैकी मिश्रक म्हणून काम करणारे श्री.अब्दुल समी अब्दुल रशिद यांना दिनांक ०१.०६.९१ च्या आदेशानुसार ११ महिन्याच्या कालावधीसाठी मुलाखत घेऊन नेमणूकीचे आदेश देण्यांत आले होते. त्यानुसार दिनांक २८.०१.९२ रोजी संबंधित कामावर रुजू झाले. यानंतर ११ महिन्याचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर श्री.समी यांना कामावरुन कमी करण्यांत आले. श्री.समी, याचे बरोरब रुजू झालेले संजय अडके यांचीही मिश्रक म्हणून नेमणूक झाली होती. पण त्यांना पुढे कंटीन्यु करण्यांत आले. यानंतर १२.०८.९२ च्या आदेशाप्रमाणे शैलेश लोहाड, सुभाष जायभाये, विष्णु रगडे, यांना मिश्रक म्हणून कामावर घेतले. तसेच ०५.०६.९० च्या आदेशाने श्रीमती वैष्णव यांची नेमणूक केली. या वरुन श्री.समी यांच्या आदेशात ११ महिन्याच्या कालावधी करिता आणि बाकी उमेदवारांच्या बाबतीत प्रोबेशन कालावधी साठी नेमणूक करण्यांत येते. असा फरक का आहे. यावरुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी जाणून बुजून श्री.समी यांचे काम समाधानकारक नाही असे दाखवून त्यांना कामावरुन कमी केले आहे. श्री.समी यांचे विरुध्द कोणतेही गंभीर आरोप नाहीत. म्हणून या प्रकरणाची चौकशी व्हावी आणि समी यांना ताबडतोब कामावर घ्यावे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** चिकलठाणा आरोग्य केंद्रात काम करणारे मिश्रक यांना ११ महिन्याचा आदेश दिला होता. त्याची मदत २८.१२.९२ रोजी संपली आहे. त्याबाबतची संचिका मा.आयुक्त यांचेकडे पाठविली आहे. मिश्रक या पदाचे ३ जागेकरिता जाहिरात दिली हा भाग वेगळा आहे. ती कायम पदे आहेत. यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी अर्ज केलेला नाही.

**श्री.अजिजुल्ला बेग :** मिश्रक या पदाचे ३ जागेसाठी जी जाहिरात केली आहे. त्या पदाची मंजूरी घेतलेली नाही. (कलम क्र.५१ सभागृहात वाचून दाखविले.)

**मा.उपआयुक्त :** सभागृहाने एखाद्या पदाची मंजूरी दिली म्हणजेच त्या पदासाठी आवश्यक तो पगार देण्याचे अधिकारही दिले असा त्याचा अर्थ होतो. त्यानुसार प्रत्येक वेळी पद करतांना त्यापदाचे पगाराविषयी मंजूरीची आवश्यकता भासत नाही.

**श्री.अजिजुल्ला बेग, श्री.जावेद हसन खान, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.जयवंत ओक :** दिनांक २३.१२.९२ च्या सभेतील ठराव क्र.४११,४२७ आणि ४२८ ला या

सभेत मंजूरी देण्यांत यावी. ठराव क्र.४२८ प्रमाणे नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून खरेदी करावयाच्या क्रिडा साहित्यासाठी साहित्याचे नमुने बघुन चांगले साहित्य खरेदी करण्यांत यावे.

**मा.सभापती :** नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून खरेदी करावयाच्या क्रिडा साहित्यासाठी दरपत्रक धारकांकडील क्रिडा साहित्याचे नमुन्याची स.सभासदांसोबत पाहणी करण्यात आली. मे.आर.बी.इंटरप्राईजेस यांनी क्र.६-७-८-९-१० व ११ करिता दिलेले नमून मंजूर करण्यांत तसेच मे.आर.बी.इंटरप्राईजेस यांनी वरील नमुन्याचे साहित्य अनुक्रमे रुपये १८, रुपये २२, रुपये २४ रुपये, रुपये ३६७० आणि रुपये १४००.०० या दराने पुरविण्याची लेखी तयारी दर्शविला आहे. तेव्हा वरील साहित्य मे.आर.बी.इंटरप्राईजेस यांच्याकडून व उरलेले साहित्य कमी दराच्या दरपत्रक धारकांकडून तसेच ठराव क्र.४११ व ४२७ ला मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

दिनांक २३.१२.९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या इतिवृत्तातील

१. ठराव क्र.४११ अन्वये प्रस्तावित कामाची पाहणी करण्यांत आली असून प्रभाग क्र.५७ येथील १) एकनाथनगर, २) स.न.२ शहानुरवाडी, ३) भरतनगर, शहानुरवाडी, ४) सर्वे नं.६/१ न्यु स्टेट बँक कॉलनी, ५) संजयनगर को.ऑपरेटिव्ह सोसायटी सी.टी.एस.नं.१६३२५ उस्मानपुरा, ६) महावीरनगर कॉलनी सी.टी.एस.नं.५-४-६७ उस्मानपुरा आणि ७) जयनगर या ठिकाणच्या मंजूरा रेखांकनातील प्रभागाच्या खुल्या जागेवर तार फेन्सींग करण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ११.११% कमी दराच्या मे.एस.एच.असोशिएटस यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

२. ठराव क्र.४२७ नुसार पाणी पुरवठा विभागासाठी आवश्यक असलेले ए.सी.प्रेशरपाईप व सी.आय.डी.जाईन्टस मे.महाराष्ट्र लघुउद्योग विकास मंडळ मर्यादित यांच्याकडून दाखल केलेल्या दरसुचीच्या दराप्रमाणे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१) १०० मी.मी.-रु.१०५-१७ प्र.र.व्यासाचे ए.सी.-मिटर प्रेशरपाईप्स क्लास-१०

२) १५० मी.मी.व्यासाचे - रु.१६४-०२ प्र.ए.सी.प्रेशर पाईप्स-र.मिटर.क्लास-१०

३) १०० मी.मी.व्यासाचे - रु.११०-०० प्रति सी.आय.डी.जॉईन्टस-संघ क्लास-१०

३. ठराव क्र.४२८ अन्वये स.नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून खरेदी करावयाच्या क्रिडा साहित्यांच्या नमुन्याची स.सभासदांसोबत पाहणी करण्यांत आल्यानुसार मे.आर.बी.इंटरप्राईजेस यांनी दिनांक १२.०१.९३ च्या लेखी सम्मतीनुसार दिलेल्या दराप्रमाणे ॲटम क्र.६-७-८-९-१० व ११ चे साहित्य आणि मे.इंटरनॅशनल स्पोटर्स, निराला बाजार यांचेकडून ॲटम क्र.१-२-३-४-५-१२ व १३ ॲटमचे साहित्य दरपत्रकातील दराप्रमाणे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वरीलप्रमाणे अनुक्रमांक १ ते ३ दर्शविलेल्या दुरुस्तीसह दिनांक २३.१२.९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यांत आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३६/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.१३ औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता सन

१९९०-९१ दरसुचीप्रमाणे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,१८,५००/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. सदर काम सन १९९१-९२ च्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१३/१२८३/९२, दि.१८.०९.९२ अन्वये दै.देवगिरी तरुण भारत आलमगीर टाईम्स, लोकधर्म, या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता दहा निविदा विकण्यांत आल्यापैकी पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मझरुल हक्क | - | २५% जास्त |
| २. | मे.जी.एम.कन्स्ट्रक्शन | - | २०% जास्त |
| ३. | श्री.सलीम अहेमद | - | १५% जास्त |
| ४. | स.रफिकउद्दीन | - | २२% जास्त |
| ५. | श्री.कैसर खान | - | २०.५०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराचे श्री.सलीम अहेमद यांचे दरपत्रक आहे. परंतू मा.आयुक्त यांना दर योग्य वाटत नसल्यामुळे संबंधित गुत्तेदार यांना दर वाटाघाटी करिता बोलावण्यात आले. सदर कामाची मा.आयुक्त मा.कार्यकारी अभियंता यांच्या समक्ष दर वाटाघाटी झाली. १५% जास्त दराऐवजी १२% जास्त दराने श्री.सलीम अहेमद यांच्या दरास मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१३- औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी गुततेदार श्री.सलीम अहेमद यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधितांकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १२% जास्त दराने करुन घेण्यास आणि सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३७/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.३७ इंदिरानगर, बायजीपुरा येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची व २५० मी.मी.व्यासाची व ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.३,८३,९०० ला स्थायी समितीचा ठराव क्र.२३३/८, दिनांक २८.०८.९२ नुसार मंजूरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१७/१३८१/९२, दिनांक १३.१०.९२ ला दैनिक नवा मराठा, औरंगाबाद डॉन, रहेबर या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पंधरा निविदा विकण्यांत आलेल्या होत्या त्यापैकी केवळ आठ निविदा प्राप्त झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.स.सिराजउद्दीन | - | ११% कमी |
| २. | श्री.एस.ए.नवाब | - | १२% जास्त |
| ३. | श्री.कैसर खान | - | १०% कमी |
| ४. | श्री.एम.ए.सिद्दीकी | - | १.५% कमी |
| ५. | श्री.एल.एम.पडघन | - | १२% कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | श्री.मेसर्स उदय इंजिनियरिंग के.- | | ११% कमी |
| ७. | श्री.मझरुल हक्क | - | १५% कमी |
| ८. | श्री.सय्यद रफिकउद्दीन | - | १४.१२% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराने श्री. मझरुल हक्क यांचे दरपत्रक आहे. तसेच सदरील निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३७ इंदिरानगर, बायजीपुरा येथे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची आणि २५० मी.मी. व ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १५% कमी दराच्या श्री.मझरुल हक्क यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३८/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, अंजली टॉकीज ते वरद गणेश मंदिरापर्यंत १२०० मी.मी.व्यासाची मुख्य जलनिःसारण वाहिनी टाकावयाची आहे. सदर काम हे शासकीय अनुदान सन १९९१-९२ मधून करण्यांत येणार आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रुपये २२,६८,७९८/- एव्हढ्याचे तयार करण्यांत येवून त्यास प्रशासकीय मान्यता दिनांक २९.०४.९२ रोजी घेण्यांत आलेली आहे.

या कामासाठी या कार्यालयाची निविदा सूचना क्र.५/९२-९३ (तिसरी वेळ) जी की, दैनिक लोकमत, इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच (५) निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा विक्री झाल्या असल्याचे दिनांक १९.०६.९२ रोजी निविदा पेटी उघडण्यांत आली असता दिसून आले. प्राप्त निविदा उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.रे.कन्स्ट्रक्शन | - | ३८.६५% जास्त |
| २. | मे.योग सिमेंट प्रॉडक्टस | - | २१.०८% जास्त |
| ३. | श्री.आर.एल.बारवाल | - | ४०.००% जास्त |

पुरवठ्याचा दर दिलेला आहे. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा ही मे.योग सिमेंट, प्रॉडक्टस मॅन्युफॅक्चरिंग अँण्ड कन्स्ट्रक्शन प्रा.लि.यांची आहे. परंतू त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा.आयुक्त यांच्या दालनात दराबाबत दिनांक २३.१२.९२ रोजी वाटाघाटी झाली असता मे.योग सिमेंट प्रॉडक्टस मॅन्युफॅक्चरिंग अँड कन्स्ट्रक्शन प्रा.लि.यांची अंदाजपत्रकापेक्षा २०% जास्त या दराने काम करण्यास लेखी सम्मती दिली. हे काम बारामाही वाहणाऱ्या नाल्यामध्ये असून नाल्याच्या दोन्ही काठावर घरे आहेत. पाईप जास्त वजनदार आहेत. या अडचणीचा विचार करुन मा.आयुक्त यांनी सदर निविदा मंजूरीची शिफारस केली आहे.

करिता मे.योग्य सिमेंट प्रॉडक्टस मॅन्युफॅक्चरिंग ॲण्ड कन्स्ट्रक्शन प्रा.लि.यांनी वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अंजली टॉकीज ते वरद गणेश मंदिर पर्यंत १२०० मी.मी.व्यासाची मुख्य जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता गुत्तेदार मेसर्स योग सिमेंट प्रॉडक्टस मॅन्युफॅक्चरींग अँड कन्स्ट्रक्शन प्रा.लि.यांच्याशी २३.१२.९२ रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित संस्थेकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २०% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३९/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन नं.३ मधील विविध ठिकाणची दुरुस्ती व देखभालीचे कामे करणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ५,६०,०००/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.६०७/८८ दि.२९.०४.९२ नुसार मंजूरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयामार्फत निविदा मागविण्यांत आल्या होत्या व सदर काम गुत्तेदार मेसर्स पाल कन्स्ट्रक्शन यांना ४% जास्त दराने देण्यांत आलेले आहे. सदरील तरतूदी अंतर्गत सदर काम ड्रेनेज लाईन व गटार दुरुस्ती ही फक्त शहरापुरती अभिप्रेत धरुन तरतूद करण्यांत आलेली होती. गलिच्छ वस्तीतील भाग विचारात घेतलेला नव्हता म्हणून रक्कम रु.५,६०,०००/- ला फक्त प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेली होती. नंतर जलनिःसारण विभागाकडे गलिच्छ वस्ती भागातील ड्रेनेज लाईन दुरुस्तीची कामे वर्ग करण्यांत आलेली आहे व विभाग क्र.३ मधील स्लम विभागातील ड्रेनेज दुरुस्तीची कामे करावी लागत आहे. या सदर कामाकरिता ( ) अंदाजपत्रक रक्कम रु.२,१२,०८०/- चे तयार करण्यांत आलेले असून सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली असून सदर काम मेसर्स पाल कन्स्ट्रक्शन यांच्या मार्फत ४% जास्त दराने करण्यांत येईल व पहिली मंजूरी मिळालेली अंदाजपत्रकीय रक्कम रु.५,६०,०००/- ( ) अंदाजपत्रक रक्कम रुपये २,१२,०८०/- अशी एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ७,७२,०८०/- अशी एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,१२,०८०/- अशी एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ७,७२,०८०/- एव्हढी होते. करिता प्रस्ताव योग्य त्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलनिःसारण विभागाकडे ड्रेनेज लाईन दुरुस्तीचे कामे वर्ग करण्यांत आल्यामुळे झोन क्र.३ मधील विविध ठिकाणची जलनिःसारण वाहिनी दुरुस्ती व देखभालीचे मुळे कामात स्लम विभागातील ड्रेनेज दुरुस्तीच्या वाढ झाल्यामुळे तयार करण्यांत आलेल्या मुळ अंदाजपत्रक रक्कम रु.५,६०,०००/- अधिक वाढीव अंदाजपत्रक रु.२,१२,०८०/- रक्कम रु.७,७२,०८०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

रक्कम रु.२,१२,०८०/- च्या वाढीव अंदाजपत्रकाकरिता स्वतंत्र दरपत्रके मागविण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४०/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.३७ महेशनगर येथे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये १,८९,४००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यांत आलेले असून सदर काम शासकीय अनुदान १९९१-९२ च्या तरतूदीतून करण्यांत येईल. तसेच सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.१३/१२८३/९२, दि.१८.०९.९२ ला दैनिक देवगिरी तरुण भारत, लोकधर्म व आलमगिर आईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा विकण्यांत आलेल्या होत्या त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सईद खान | - | ५% जास्त |
| २. | श्री.सईद खान | - | १२% जास्त |
| ३. | श्री.मिर्झा आर.बी. | - | ९% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराचे श्री.सईद खान यांचे दरपत्रक आहे. परंतू मा.आयुक्त यांना दर योग्य वाटत नसल्यामुळे संबंधित गुत्तेदार यांना दर वाटाघाटी करिता बोलावण्यांत आले दर वाटाघाटीत ४% जास्त दराने काम करावयास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३७ महेशनगर येथे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता गुत्तेदार श्री.सईद खान यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४१/७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ज्युब्लीपार्क पंप हाऊस भोवती संरक्षित भिंत बांधावयाची आहे. स्थायी समितीचा ठराव क्र.६०/३० दिनांक ०८.०६.९२ नुसार सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.२,४८,९४२/- हे सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार तयार करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे. सदर कामासाठी या कार्यालयाची निविदि सुचना क्रमांक ४०/९२-९३ जी की, दैनिक लोकविजय, मुफस्सीर या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिल बंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस व वेळेपर्यंत एकूण चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. निविदाधारकांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.जी.एम.कटारिया | - | २०% जास्त |
| २. | श्री.कैसर खान | - | १०% जास्त |
| ३. | मे.आनंद बिल्डर्स | - | १८% जास्त |
| ४. | श्री.मो.अब्दुल लतीफ | - | ४.९८% जास्त |

वरीलप्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री.मो.अब्दुल लतीफ यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९८% जास्त असा दर दिलेला आहे. परंतू ठेकेदाराने दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा.आयुक्त यांच्या दालनात दि.१६.१२.९२ रोजी ठेकेदार श्री.मो.अब्दुल लतीफ यांचे बरोबर दरामध्ये वाटाघाटी करण्यांत आली. असता सदरचे काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करण्यांस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असून त्यास ठेकेदारांनी लेखी सम्मती दिलेली आहे.

करिता वाटाघाटी अंतीचा दर म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्युब्लीपार्क पंप हाऊस भोवती संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता गुत्तेदार श्री.मो.अब्दुल लतीफ यांचेशी दिनांक १६.१२.९२ रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदारांकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४२/८ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, आकाशवाणी समोरिल मनजितनगर अंतर्गत खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ च्या डी.एस.आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु.१,२२,८५०/- चे बनविण्यांत आले असून सदरील कामाचा समावेश सन १९९१-९२ च्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल. सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१४/जा.क्र./मनपा/बांध-१/५३५/९२, दि.०२.११.९२ अन्वये दुसऱ्या वेळेस निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण पाच निविदा विकल्या गेल्या.

त्यापैकी एकूण तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि.२३.११.९२ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.एस.एच.असोशिएटस | - | २% जास्त |
| २. | श्री.राजासिंग | - | ०.३०% कमी |
| ३. | मे.पाल कन्स्ट्रक्शन | - | १०% जास्त |

वरीलपैकी श्री.राजासिंग यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.३०% कमी दराची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आकाशवाणी समोरिल मंजित नगर अंतर्गत खडी रस्ता तयार करण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.३०% कमी दराच्या श्री.राजासिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४३/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगर परिषदेच्या प्रशासकीय इमारतीस जिपसम बोर्ड पार्टीशन करणेच्या कामासाठी र.रु.४,५८,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास दिनांक ३१.०८.९२ रोजी प्रशासकीय मान्यता

मिळालेली असून सदरचा खर्च "इतर इमारती व उर्वरित कामे" या सदरातून करण्यांत येईल. सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बां-२/५६८२/९२, दि.२१.०९.९२ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.सुरेश इंटरप्राईजेस | - | ४.५% जास्त दराने |
| २. | मे.उर्जा सेल्स | - | दर बरोबर दिलेले नाहीत |
| ३. | मे.सिमा फर्निचर डिझाईनर | - | दर बरोबर दिलेले नाहीत |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५% जास्त दराने मे.सुरेश इंटरप्राईजेस यांची निविदा प्राप्त झालेली आहे. ठेकेदाराने दर जास्त दिल्यामुळे त्यांना वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी ४.५% जास्त दराऐवजी ३.५% जास्त दराने काम करण्याची तयारी दर्शवून तसे लेखी सम्मती पत्र कार्यालयास सादर केलेले असून तसे त्यांचे निविदेस दि.१९.११.९२ रोजी मान्यता मिळालेली आहे.

करिता वाटाघाटीद्वारे मे.सुरेश इंटरप्राईजेस यांची ३.५% जास्त दराची निविदा मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीस जिपसप बोर्ड पार्टीशन करण्याच्या कामाकरिता गुत्तेदार मेसर्स सुरेश इ्ंटरप्राईजेस यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित संस्थेमार्फत ३.५% जास्त करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४४/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नाथ नगर, अरिहंत नगर येथील रोडचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास दिनांक १९.१०.१९९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरचा खर्च "जिल्हा नियोजन व विकास मंडळ फंडातून करण्यांत येईल."

सदरच्या कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५८०७/दिनांक २१.११.१९९२ द्वारे दैनिक मराठवाडा व दैनिक रहेबर या पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण अकरा निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला एकूण पाच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ०.०५% कमी दराने |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | ४% जास्त दराने |
| ३. | मे.पाल कन्स्ट्रक्शन | - | ५% जास्त दराने |
| ४. | श्री.पी.जे.तमखाने | - | ७% जास्त दराने |
| ५. | श्री.एस.ए.नवाब | - | ८% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०५% कमी दराने मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नाथनगर, अरिहंत नगर येथे रस्त्याचे खडीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या मेसर्स एस.एच.असोशिएटस यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४५/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, अरिहंत नगर अंतर्गत खडी रस्त्याचे काम करण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.३,००,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदरच खर्च सन १९९१-९२ चे शासकीय अनुदानातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास दिनांक ०७.०४.१९९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५८०७/दिनांक २१.११.१९९२ द्वारे दैनिक मराठवाडा व दैनिक रहेबर या पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण दहा निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला एकूण चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ०.५०% कमी दराने |
| २. | मे.पाल कन्स्ट्रक्शन कं. | - | ३% जास्त दराने |
| ३. | श्री.एस.ए.नवाब | - | ४% जास्त दराने |
| ४. | श्री.कुलवंतसिंग | - | ६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.५०% कमी दराने मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नाथनगर, अरिहंत नगर येथे रस्त्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या मेसर्स एस.एच.असोशिएटस यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४६/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, उल्का नगरीतील ८० फुट रुंद रस्त्यावरील ले-आऊट अंतर्गत मोकळी जागा विकसीत करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.३,९२,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास दिनांक १४.०४.१९९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५८०७/दिनांक २१.११.१९९२ द्वारे दैनिक मराठवाडा व दैनिक रहेबर या पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण सहा निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेस एकूण तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ०.०५% कमी दराने |
| २. | श्री.एस.ए.नवाब | - | २% जास्त दराने |
| ३. | श्री.कुलवंतसिंग | - | ४% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०५% कमी दराने मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उल्कानगर येथील ८० फुट रस्त्यावरील ले-आऊट अंतर्गत मोकळी जागा विकसीत करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या मेसर्स एस.एच.असोशिएटस यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४७/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गांधीनगर ते रेल्वेस्टेशन या ४०' डी.पी.रोडचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.२,३५,०००/- चे अंदाजपत्रकास दिनांक १९.१०.१९९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरचा खर्च जिल्हा नियोजन व विकास मंडळ फंडातून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५८०७/दिनांक २१.११.१९९२ द्वारे दैनिक मराठवाडा व दैनिक रहेबर या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण अकरा निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला एकूण तीनच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.पि.जे.तमखाने | - | ०.०१% कमी दराने |
| २. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ६% जास्त दराने |
| ३. | श्री.कुलवंतसिंग | - | ५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०१% कमी दराने श्री.पि.जे.तमखाने यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गांधीनगर ते रेल्वेस्टेशन या ४० फुट डी.पी. रस्त्याचे खडीकरण करणेच्या करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या श्री.पि.जे.तमखाने यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४८/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, न्यु शांती निकेतन कॉलनी येथील अंतर्गत रोडचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.१,९१,३७०.०० चे अंदाजपत्रकास दिनांक १४.१०.१९९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरचा खर्च शासकीय अनुदान सन १९९१-९२ मधून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५७६१/९२, दिनांक ०२.११.१९९२ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण चार निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला एकूण चारच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.फारुकी ए.एम. | - | ०.०४% कमी दराने |
| २. | श्री.सय्यद अथर अली | - | अंदाजपत्रकीय दराने |
| ३. | श्री.राजासिंग | - | ०२% जास्त दराने |
| ४. | श्री.सलीम पटेल | - | ०५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०४% कमी दराने श्री.फारुकी ए.एम.यांची निविदा असून मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु शांती निकेतन कॉलनी अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०४% कमी दराच्या श्री.फारुकी ए.एम. हयांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४९/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्लेखाना येथील स्मशान भुमीस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.१,५१,१३०.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून त्यास दिनांक १९.१०.१९९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च महानगरपालिकेच्या फंडा अंतर्गत या शिर्षा अंतर्गत असलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५७६१/९२, दिनांक ०२.११.१९९२ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला तीनच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.राजासिंग | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.इकबालसिंग अहेमद | - | १०% जास्त दराने |
| ३. | श्री.सलीम पटेल | - | ०४% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दराने श्री.राजासिंग यांची निविदा असून मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्लेखाना येथील स्मशान भुमीस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराच्या श्री.राजासिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५०/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नुतन कॉलनी, सिल्लेखाना, सन्मित्र कॉलनी अंतर्गत रोडचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.१,०९,४३०.०० चे तयार

करण्यांत आलेले असून सदरचा खर्च शासकीय अनुदान १९९१-९२ या सदराखाली करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५७६१/९२, दिनांक ०२.११.१९९२ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या असून त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला तीनच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.जाधव कंन्स्ट्रक्शन | - | ०.१५% कमी दराने |
| २. | श्री.मिर हिदायत अली | - | ०२% जास्त दराने |
| २. | श्री.इकबाल अहेमद | - | ०५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५% कमी दराने मे.जाधव कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नुतन कॉलनी, सिल्लेखाना, सन्मित्र कॉलनी अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१५% कमी दराच्या मेसर्स जाधव कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५१/१७ :**

वार्ड क्र.४९ मो.सिंधी कॉलनी ते रविंद्रनगर पर्यंत ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.१,६६,०००/- चे सन १९९०-९१ च्या दर सुचीनुसार तयार करण्यांत आले असून प्राप्त सरकारी अनुदानातून सदर काम करणेस्तव मा.आयुक्त महोदय यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.२०/१५५०/९२, दि.२७.११.९२ नुसार दै.स्वरगंगा, व रहेबर दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात तिसरी वेळेस निविदापत्रके मागविले असता एकूण तीन निविदापत्रके विकण्यांत आल्या होत्या. त्या तिनही निविदा पत्रके प्राप्त झाली असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एच.एस.मिनाहजोद्दीन | - | २५% जास्त |
| २. | श्री.कैसर खान | - | ३०% जास्त |
| ३. | श्री.कुलवंतसिंग | - | ३३% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% जास्त दराचे श्री.एच.एस.मिनाहजोद्दीन यांचे दरपत्रक आहे. दरपत्रकाच्या अनुषंगाने वाटाघाटी होऊन मा.आयुक्त महोदयांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% जास्त दराने काम देण्यांस मंजूरी दिलेली आहे. करिता स्थायी समितीच्या मंजूरीकरिता प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिंधी कॉलनी ते रविंद्रनगर पर्यंत ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता गुत्तेदार श्री.एच.एस.मिनाहजोद्दीन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १६% जास्त दराने काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५२/१८ :**

वार्ड क्र. मोहल्ला बन्सीलालनगर येथील चेतना को.ऑप.हौसिंग सोसायटी ते आर.टी.ओ.ऑफिस पर्यंत यु.सी.आर.एस.गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.३,९३,३००/- चे सन १९९०-९१ च्या दर सुचीनुसार तयार करण्यांत आले असून प्राप्त सरकारी अनुदानातून सदर काम करणेस्तव मा.आयुक्त महोदय यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.६/७८३/९२, दि.२२.०५.९२ नुसार दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदापत्रक मागविण्यात आल्या. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा.१८.१०% कमी दराचे श्री.स.रफिकोद्दीन यांचे दरपत्रक आहे. दरपत्रक फारच कमी असून सदर काम सरकारी अनुदानातील असल्याने मा.आयुक्त महोदयांनी फेरनिविदा मागविण्यांस आदेश दिले.

आदेशावरुन सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/११३७/९२, दि.२०.०८.९२ नुसार दै.लोकमत व औरंगाबाद टाईम्स दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात दुसरी वेळ निविदापत्रके मागविले असता एकूण तेरा निविदापत्रके विकण्यांत आल्या होत्या. त्यापैकी फक्त चार निविदा पत्रके प्राप्त झाली असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.स.सिराजोद्दीन | - | २५% जास्त |
| २. | श्री.पि.जे.तमखाने | - | २६% जास्त |
| ३. | श्री.स.रफिकोद्दीन | - | २७% जास्त |
| ४. | श्री.कैसर खान | - | ३०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% जास्त दराचे श्री.स.सिरोजोद्दीन यांचे दरपत्रक आहे. सन १९९०-९१ दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून १९९१-९२ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५८% कमी दराचे दरपत्रक मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर येथील चेतना को.ऑप.हौसिंग सोसायटी ते आर.टी.ओ.ऑफिस पर्यंत यु.सी.आर.एस.गटार बांधण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% जास्त दराच्या (सन १९९०-९१ च्या दरसुची नुसार) श्री.सय्यद सिराजुद्दीन यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५३/१९ :**

मोहल्ला पदमपुरा पासून इंजिनिअरींग कॉलेज पर्यंतची अस्तित्वात असलेली १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन बदलून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.४,९३,१००/- चे सन १९९१-९२ च्या दर सुचीनुसार तयार करण्यांत आले असून प्राप्त सरकारी अनुदानातून सदर काम करण्यांस मा.आयुक्त महोदय यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१२/११३७/९२, दि.२०.०८.९२ नुसार बी-१ निविदेत निविदापत्रके मागविले असता सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.२१% कमी दराचे श्री.पि.जे.तमखाने या गुत्तेदाराचे होते.

दरपत्रक फारच कमी असल्याने मा.आयुक्त महोदयांनी फेरनिविदा मागविणे बाबत आदेश दिले.

आदेशावरुन सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१८/१४७२/९२, दि.०९.१२.९२ नुसार दै.देवगिरी तरुण भारत व रहेबर दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात दुसरी वेळ निविदापत्रके मागविले असता एकूण पाच निविदापत्रके विकण्यांत आले होत्या. त्यापैकी तीन निविदा पत्रके प्राप्त झाली असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एल.एम.पडघन | - | ९.९०% जास्त |
| २. | मे.पाल कन्स्ट्रक्शन | - | १२% जास्त |
| ३. | श्री.एस.ए.नवाब | - | १४% जास्त |

दरपत्रका बाबत वाटाघाटी होऊन ९.९०% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराने श्री.एल.एम.पडघन यांच्या दरपत्रकास मा.आयुक्त महोदयांनी मंजूरी दिलेली आहे.

करिता ८% जास्त दराच्या दरपत्रकास स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला पदमपुरा ते इंजिनिअरींग कॉलेज पर्यंत अस्तित्वात असलेली १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता गुत्तेदार श्री.एल.एम.पडघन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ८% जास्त दराने करुन घेण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५४/२० :**

वार्ड क्र.५३ मोहल्ला राहुलनगर येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,५१,०००/- सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे. म्हाडा फंडातून सदर काम करणेस्तव मा.आयुक्त महोदयांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदर कामाकरिता कार्यालयीन निविदा सुचना क्र./१५/१२९९/९२, दिनांक २२.०९.९२ नुसार दै.नवामराठा व रहेबर दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविले असता एकूण दोन निविदापत्रके विकण्यांत आल्या होत्या. त्या दोनही निविदापत्रके प्राप्त झाली असून त्यांचा तुलनात्मक तक्ता दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कैसर खान | - | १०% जास्त |
| २. | श्री.शेख सलीम अहेमद | - | अंदाजपत्रकीय दराचे |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.शेख सलीम अहेमद यांचे दरपत्रक आहे. करिता प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५३ राहुलनगर येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व आणि अंदाजपत्रकीय दराच्या श्री.शेख सलीम अहेमद यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

सदर काम मार्च अखेर पुर्ण करावयाचे असल्यामुळे कामाची तातडी लक्षात घेऊन सदर ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५५/२१ :**

कांचनवाडी ऑक्सीडेशन पॉन्ड व बनेवाडी पंप हाऊस येथील दुरुस्ती काम चॅनेल खोदकाम, चेंबर्स दुरुस्ती व्हॉलव्हस व गेटस बसविणे इत्यादी किरकोळ दुरुस्ती काम करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,४५,०००/- चे सन १९९१-९२ च्या दराच्या तरतूदीनुसार हे अंदाजपत्रक बनविलेले आहे.

सदर दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे. या करिता सदर प्रस्ताव योग्य त्या मंजूरीच्या कार्यवाहीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कांचनवाडी ऑक्सीडेशन पॉन्ड व बनेवाडी पंप हाऊस येथील दुरुस्ती काम चॅनेल खोदकाम, चेंबर्स दुरुस्ती, व्हॉलव्हस, व गेटस बसविणे इ. किरकोळ दुरुस्तीचे कामाकरिता रक्कम रु.१,४५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५६/२२ :**

कर आकारणी विभाग १ व २ तर्फे प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासनाचे सन १९९० चे विधानपरिषद विधेयक क्र.१० नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम १२९ मध्ये १२९ अ.अ.व १२९ ब.ब.अशी सुधारणा करण्यांत आली आहे. त्यानुसार महानगरपालिकेस १२९ अ.अ.प्रमाणे पाणी पुरवठा लाभ कर व १२९ ब.ब.प्रमाणे जलनिःसारण लाभ कराची आकारणी करता येते. पुणे, नाशिक, कल्याण महानगरपालिकेत यापुर्वीच सदरील कराची अंमलबजावणी झालेली आहे.

त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतही सदरील कराची अंमलबजावणी होणे जरुरीचे आहे. त्यासाठी प्रशासनातर्फे खालीलप्रमाणे दर प्रस्तावित करण्यांत येत आहेत.

अ) पाणी पुरवठा लाभ कर - करयोग्य मुल्याच्या ४%
ब) जलनिःसारण लाभ कर - करयोग्य मुल्याच्या ३%

मंजूरी झाल्यास वरीलप्रमाणे कर औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील इमारतीवर दिनांक ०१.०४.९३ पासून लागू करता येईल. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे सन १९९० विधान परिषद विधेयक क्रमांक १० नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ चे कलम १२९ मध्ये १२९ अ.अ. व १२९ ब.ब.अशी सुधारणा करण्यांत आल्यामुळे दिनांक ०१.०४.१९९३ पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील इमारती वर खालीलप्रमाणे पाणी पुरवठा लाभ कर व जलनिःसारण लाभ कर लागू करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

अ) पाणी पुरवठा लाभ कर - करयोग्य मुल्याच्या १%
ब) जलनिःसारण लाभ कर - करयोग्य मुल्याच्या १%

वैधानिक कार्यवाही व्हावी. सर्व साधारण सभेस शिफारस करण्यांत येते.

# ऐनवेळचे विषय

**विषय क्र.४५७/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव केला की, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय येथे हत्तीचे घर बांधणेचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.सन १९९१-९२ च्या दराने रक्कम रु.६,७०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

सदरचा खर्च प्राणी संग्रहालय या शिर्षकातून करण्यांत येईल. करिता रक्कम रु.६,७०,०००/- चे अंदाजपत्रकास मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय येथे हत्तीचे घर बांधण्याच्या कामासाठी रक्कम रुपये ६,७०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांत येते.

**विषय क्र.४५८/२४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.१३ मो.गणेश कॉलनी येथे २५० मी.मी.व्यासाची व ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,१९,९००.०० चे सन १९९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यांत आलेले असून सदर काम सन १९९१-९२ या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल. तसेच सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.१३/१२८३/९२, दि.१८.०९.९२ ला दैनिक देवगिरी तरुण भारत, औरंगाबाद टाईम्स, लोकधर्म, या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा विकण्यांत आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ चार निविदा प्राप्त झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद रफिकउद्दीन | - | ५% जास्त |
| २. | श्री.एल.एम.पडघन | - | ६% जास्त |
| ३. | श्री.सय्यद सिराजउद्दीन | - | अंदाजपत्रकीय दराने |
| ४. | मेसर्स जि.एम.कन्स्ट्रक्शन | - | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराचे श्री.सय्यद रफिकउद्दीन यांचे दरपत्रक आहे. परंतू मा.आयुक्त यांच्या तजविजनुसार सदर काम दुसऱ्या क्रमांकावरील लोव्हेस्ट गुत्तेदार यांना सदर काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयार आहात काय याबाबत पत्रक देण्यांत आलेले होते. संबंधित गुत्तेदार श्री.सय्यद रफिकउद्दीन यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास लेखी देऊन सम्मती दिलेली आहे व सदर गुत्तेदाराच्या दरास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१३ मो.गणेश कॉलनी येथे २५० व ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेचे काम दुसऱ्या क्रमांकाचे कमी दराचे गुत्तेदार श्री.सय्यद रफिकउद्दीन यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दराने करुन देण्यास लेखी सम्मती दिल्यामुळे उक्त काम श्री.सय्यद रफिकउद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५९/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बालाजीनगर, शिवशंकर कॉलनी येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रुपये ३६,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून त्यास दिनांक १९.१०.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च "जिल्हा नियोजन व विकास मंडळ" या सदराखाली करण्यांत येईल. सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्रमांक मनपा/बांध-२/५८०७/९२, दिनांक २१.११.९२ द्वारे दै.मराठवाडा व दैनिक रहेबर या वर्तमानपत्रात जाहिरात देवून प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण पाच निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला एकूण एकच निविदा दर भरलेली प्राप्त झाली असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.पी.जे.तमखाने - ४.९९% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.९९% जास्त दराची श्री.पी.जे.तमखाने यांची निविदा कार्यालयास प्राप्त झाली. परंतू ठेकेदाराने दर जास्त दिल्यामुळे त्यांना पत्र देऊन वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी दि.०७.०१.९३ चे पत्राद्वारे उलटटपाली ४.९९% जास्तच्या ऐवजी ४.००% जास्त दराने काम करण्यासाठी सम्मती दर्शविली असून त्यास दि.०८.०१.९३ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

तरी तुलनात्मकदृष्ट्या श्री.पी.जे.तमखाने यांची निविदा वाटाघाटीद्वारे ४% जास्त दराने मंजूर करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बालाजीनगर, शिवशंकर कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी गुत्तेदार श्री.पी.जे.तमखाने झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६०/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, धनगरवाडा रेल्वेस्टेशन खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.३,२४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास दिनांक १४.०९.१९९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च शासकीय अनुदान सन १९९१-९२ या सदरातून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५८०७/९२, दिनांक २१.११.१९९२ द्वारे दै.मराठवाडा व दै.रहेबर या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण दहा निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला एकूण सहा निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१. श्री.अब्दुल सलाम - ४.९०% जास्त दराने
२. श्री.मौला अलियारखान - ६.१०% जास्त दराने
३. मे.पाल कन्स्ट्रक्शन - ७.२०% जास्त दराने
४. मे.एस.एच.असोशिएटस - ७.८०% जास्त दराने

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | श्री.कुलवंतसिंग | - | ८% जास्त दराने |
| ६. | श्री.एस.ए.नवाब | - | १०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.९०% कमी दराने श्री.अब्दुल सलाम यांची निविदा आहे. परंतू सदर ठेकेदाराने दर जास्त दिल्यामुळे त्यांना पत्र देवून वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी दि.०८.०१.९३ चे पत्राद्वारे उलटटपाली ४.९०% जास्तच्या ऐवजी ३.९०% जास्त दराने काम करण्यासाठी संमती दर्शविली असून त्यास दि.११.०१.९३ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

तरी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा श्री.अब्दुल सलाम यांची निविदा वाटाघाटीद्वारे ३.९०% जास्त दराने मंजूर करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे धनगरवाडा रेल्वेस्टेशन येथे खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी गुत्तेदार श्री.अब्दुल सलाम यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३.९०% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६१/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नारेगांव ते प्राथमिक शाळेपर्यंत रोडचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.३,००,६०२.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास दिनांक २०.०९.१९९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन १९९२-९३ भांडवली रस्ते या सदरातून करणेत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/५८०७/९२, दिनांक २१.११.१९९२ द्वारे दै.मराठवाडा व दै.रहेबर या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण अकरा निविदा विक्री झाल्या असून स्विकारणेच्या नियोजित वेळेला एकूण चारच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.कुलवंतसिंग | - | ५% जास्त दराने |
| २. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ०.५% कमी दराने |
| ३. | श्री.एस.ए.नवाब | - | ४% जास्त दराने |
| ४. | श्री.पी.जे.तमखाने | - | १०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.५% कमी दराने मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव प्राथमिक शाळेपर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.५% कमी दराच्या मेसर्स एस.एच.असोशिएटस यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६२/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.बारापुल्ला, कोतवालपुरा भागातील खांडकी पेव्हींगची खास दुरुस्ती करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम

खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,४८,४३०.०० च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१४ मनपा/बांध-१/५३५/९२, दिनांक ०२.११.१९९२ अन्वये दुसऱ्या वेळेस निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण तेरा निविदा विकल्या गेल्या. त्यापैकी चार निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक २३.११.९२ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बी.एम.कटारिया | - | ४.९५% जास्त |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | ८.५% जास्त |
| ३. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ७% जास्त |
| ४. | मे.पाल कन्स्ट्रक्शन | - | ८% जास्त |

वरीलपैकी श्री.बी.एम.कटारिया यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ४.९५% जास्त दराची निविदा आहे. सदरील दर जास्त वाटत असल्याकारणाने संबंधित गुत्तेदारास वाटाघाटी करण्यासाठी मा.आयुक्त यांच्याकडे बोलाविले असता संबंधिताने ४.९५% जास्त ऐवजी ४% जास्त दराने करण्यास संमती दर्शविलेली आहे. करिता निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बारापुल्ला, कोतवालपुरा भागातील खांडकी पेव्हींगची खास दुरुस्ती करण्याच्या कामाकरिता गुत्तेदार श्री.बी.एम.कटारिया यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६३/२९ :**

मा.कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला आर्यनंद हौसिंग सोसायटी येथे ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.१,०५,४००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आले असून प्राप्त सरकारी अनुदानातून सदर काम करण्यास मा.आयुक्त महोदयांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१८/१४९२/९२ दिनांक ०५.११.९२ नुसार दैनिक देवगिरी तरुण भारत व रहेबर दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात दुसरी वेळ निविदापत्रके मागविली असता एकूण चार निविदापत्रके विकण्यांत आल्या होत्या. त्यापैकी तीन निविदापत्रके प्राप्त झाली असून त्याचा तुलनात्मक तक्ता दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.शेख सलीम अहेमद | - | ०.१% कमी |
| २. | श्री.मिर्झा आर.बी. | - | २.०५% जास्त |
| ३. | मे.पाल कन्स्ट्रक्शन | - | ४% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराचे श्री.शेख सलीम अहेमद यांचे दरपत्रक आहे. करिता स्थायी समितीच्या मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आर्यानंद हौसिंग सोसायटी येथे ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१% कमी दराच्या श्री.शेख सलीम अहेमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६४/३० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, राहुलनगर स्लम भागात खडी रस्ते, खांडकी पेव्हींगचे काम करणेसाठी कार्यालयाची निविदा सूचना दिनांक ०४.१२.९२ दै.मराठवाडा, दै.सकाळ व औरंगाबाद टाईम्स (उर्दू) मध्ये विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (१५) निविदा विकण्यांत आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजित तारखेस फक्त (९) निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सै.रफिकउद्दीन | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १९.१८% कमी |
| २. | मे.आनंद बिल्डर्स | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १९.३०% कमी |
| ३. | सै.सिराजुद्दीन | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २०.१०% कमी |
| ४. | मे.एस.एच.असोशिएटस | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १९.३१% कमी |
| ५. | श्री.आर.एल.बारवाल | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०२% कमी |
| ६. | श्री.जि.एम.कटारिया | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १६% कमी |
| ७. | श्री.जि.एम.पवार | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५.५% कमी |
| ८. | श्री.एस.एम.पडघन | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११.५% कमी |
| ९. | श्री.सुखबिर सिंग | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २७.५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्य श्री.सुखबिरसिंग यांची निविदा कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २७.५% कमी आहे. सदरील काम झोपडपट्टी सुधारणा योजनेत अंतर्गत महाडा असल्यामुळे काम ३१ मार्चपुर्वी पुर्ण करुन "महाडा" ने ठरवून दिलेले आर्थिक उद्दिष्ट पुर्ण करणे आवश्यक असल्यामुळे सदरील कामासाठी निविदा मागविण्याची ही दुसरी वेळ असल्यामुळे सुखबिरसिंग यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २७.५% कमी दराची निविदा मंजूरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राहुलनगर स्लम भागात खडी रस्ते आणि खांडकी पेव्हींगचे काम करण्यासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २७.५% कमी दराच्या श्री.सुखबिरसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६५/३१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, राहुलनगर स्लम भागात ४५० मी.मी.व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकर आर.सी.सी.गटार बसविण्याचे कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना दि.०४.१२.९२ द्वारे स्थानिक वृत्तपत्र दै.सकाळ, दै.मराठवाडा, दै.औरंगाबाद टाईम्स द्वारे विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (७) निविदा विकण्यांत आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे

नियोजित तारखेस फक्त (४) निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदाराने दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बी.आर.आनंद | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.९९% जास्त |
| २. | मे.एस.एच.असोशिएटस | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०७% कमी |
| ३. | श्री.अनवर खान | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १२.५% कमी |
| ४. | श्री.एन.जी.गुनवाणी | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या श्री.अनवरखान यांची निविदा कमी दराची असून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १२.५% कमी आहे. सदरील काम झोपडपट्टी सुधारणा योजने अंतर्गत असल्यामुळे ३१ मार्चपुर्वी पुर्ण करुन "म्हाडाने" ठरवून दिलेले आर्थिक उद्दिष्ट पुर्ण करण्याचे दृष्टीने तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १२.५% कमी दर असलेली श्री.अनवरखान यांची निविदा मंजूरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राहुल नगर स्लम भागात ४५० मी.मी.व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर.सी.सी.गटार बसविण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १२.५% कमी दराच्या श्री.अनवर खान यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

सदरील काम झोपडपट्टी सुधारणा योजने अंतर्गत (म्हाडा) ३१ मार्च पुर्वी करुन देणे आवश्यक असल्यामुळे या कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६६/३२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. विद्युत कॉलनी पासून ते भावसिंगपुरा पर्यंत ५०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.२३,५५,५५०/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले असून मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. तसेच सदर काम शासकीय अनुदान सन १९९१-९२ च्या तरतूदीतून करण्यांत येईल.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१४/१२८४/९२, दि.१८.०९.९२ ला.दैनिक इंडियन एक्सप्रेस व लोकमत टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण नऊ निविदा विकण्यांत आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ सात निविदा प्राप्त झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.एम.मंडोरे | - | १% कमी |
| २. | श्री.एम.ए.अजिज | - | ७.५०% कमी |
| ३. | मे.गोडयानी कन्स्ट्रक्शन | - | अंदाजपत्रकीय दराने |
| ४. | श्री.जी.एम.कटारिया | - | ३५% जास्त |
| ५. | श्री.एस.ए.नवाब | - | १३.१३% जास्त |
| ६. | मेसर्स योग सिमेंट प्रा.लि. | - | ०.५७% कमी |
| ७. | श्री.कुलवंतसिंग | - | १५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५०% कमी दराचे श्री.एम.ए.अजीज, गुत्तेदार यांचे दरपत्रक आहे.

करिता प्रस्ताव पुढील मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदरील कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.४६७/३३ :**

मा.आयुक्तांचे मान्यतेनुसार मालमत्ता अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिका सभागृहात आता पर्यंत सहा राष्ट्रीय महापुरुषांचे तैलचैत्रे लावण्यात आलेली आहेत.

परंतू अद्याप लोकमान्य टिळक, सरदार वल्लभ पटेल व लाल बहादूर शास्त्री या राष्ट्रीय महापुरुषांचे तैलचित्रे सभागृहात लावलेली नाहीत. ती आता तयार करुन घेऊन सभागृहात लावण्याची योजना आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे तैलचित्र मनपा सभागृहात आहे. परंतू मा.महापौर यांनी त्यांचे दालनात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे तैलचित्र लावण्याची इच्छा व्यक्ती केली आहे. त्यासाठी महात्मा गांधीचे एक नवीन तैलचित्र तयार करुन घेण्याचे तसेच पुर्वीचे सहा तैलचित्र व आताचे नवीन चार अशा सर्व तैलचित्रे खराब होवू नयेत. याची खबरदारी म्हणून प्लॉस्टीक कव्हर लावून घ्यावयाचे आहे.

या आधी कार्यालयाने सहा राष्ट्रीय पुरुषांचे तैलचित्रे प्रा.दिलिप बडे यांचेकडून तयार करुन घेतलेली आहेत. तेव्हा आतासुध्दा वर उल्लेखित नवीन चार तैलचित्रे तयार करुन घेण्याचे तसेच जुन्या व नव्या सर्वच तैलचित्रांना प्लॉस्टिक कव्हर बसविण्याचे काम प्रा.दिलिप बडे यांचेकडूनच करुन घेणे बाबत विचार होणेस्तव व यासाठी होणाऱ्या खर्चास मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.अजिजुल्ल बग, श्री.जयवंत ओक :** महापालिका सभागृहात लावण्यांत येणाऱ्या राष्ट्रीय महापुरुषांचे तैलचित्रांबरोबर, विर सावरकर, इंदिरा गांधी व जाकीर हुसेन या राष्ट्रीय महापुरुषांचे ही तैलचित्रे तयार करुन मनपा सभागृहात लावण्यांत यावीत.

**मा.सभापती :** सं.सभासदांच्या सुचनेप्रमाणे राष्ट्रीय महापुरुषांचे तैलचित्रे लावण्याची व्यवस्था करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सभागृह, आणि मा.महापौर यांचे दालन यात लावण्यासाठी लोकमान्य टिळक, सरदार वल्लभभाई पटेल, लालबहादुर शास्त्री राष्ट्रपिता महात्मा गांधी, विर सावरकर, इंदिरा गांधी आणि डॉ.जाकीर हुसेन या राष्ट्रीय महापुरुषांची तैलचित्रे तयार करुन घेणे तसेच जुन्या व नव्या सर्व तैलचित्रांना प्लास्टीक कव्हर चढविण्याचे काम प्राध्यापक दिलीप बडे यांचेकडून करुन घेण्यास आणि त्यासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६८/३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, सन १९९२-९३ या वर्षाकरिता लागणारे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरिता निविदा सूचना जा.क्र./मनपा/अशअ/३६८/९२, दि.२१.०७.९२ अन्वये दैनिक लोकमत, इंडियन एक्सप्रेस, मुकद्दस, स्वरगंगा व रहेबर, या वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण अकरा निविदा विकल्या गेल्या. त्यापैकी अंतिम तारखेपर्यंत फक्त सात निविदा प्राप्त झाल्या आहे. व या निविदा दिनांक २५.०९.९२ रोजी उघडण्यांत आल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१. मे.फिलीप्स
२. मे.मेहता ट्रेडर्स
३. मे.सत्य इलेक्ट्रीकल्स
४. मे.पगारिया इंटरप्राईजेस
५. मे.लुना इलेक्ट्रीकल्स
६. मे.प्रविण इलेक्ट्रीकल्स
७. मे.उमेश इलेक्ट्रीकल्स

निविदा सुचनाच्या अटीनुसार पुरवठाधारकांनी साहित्याचे नमुने दाखल करणे आवश्यक होते. वरील सात पुरवठा दारांपैकी फक्त मे.प्रविण इलेक्ट्रीकल्स यांनीच साहित्याचे नमुने दाखल केले. हयामुळे मुख्य लेखा परिक्षक यांनी फक्त प्रविण इलेक्ट्रीकल्स यांचीच निविदा उघडली व इतर पुरवठा दारांच्या निविदा उघडल्या नाहीत. करिता निविदा पत्रकातील ॲटम क्र.१ ते ३३ करिता मे.प्रविण इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदा पत्रकातील दरास मान्यता मिळण्यास्त व सन १९९२-९३ करिता रु.८,००,०००/- चे विद्युत साहित्य ॲटम क्र.१ ते ३३ प्रमाणे मे.प्रविण इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून खरेदी करण्यास मंजूरी मिळण्यास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९२-९३ या वर्षाकरिता लागणारे विद्युत साहित्य खरेदीसाठी ॲटम क्र.१ ते ३३ करिता मे.प्रविण इलेक्ट्रीकल्स यांचे निविदापत्रकातील दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच सन १९९२-९३ करिता मेसर्स प्रविण इलेक्ट्रीकल्स यांचेकडून ॲटम क्र. १ ते ३३ प्रमाणे रु.८,००,०००/- चे विद्युत साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**विषय क्र.४६९/३५ :**

सन १९९१-९२ या वर्षाच्या सरकारी अनुदानातून ८ ते १० टनी डिझेल रोड रोलर खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविली असता फक्त ग्रिव्हज कॉटन ॲण्ड कंपनी हयांचे एकच दरपत्रक रु.५,२८,३५५/- चे आले होते व त्यामुळे दिनांक १२.०८.९२ च्या स्थायी समितीच्या मिटींगमध्ये असे ठरले होते की, जोसेफ कंपनीकडून दरपत्रक आल्यानंतर हया रोलर खरेदी साठी विचार करणे योग्य राहील. मे.जोसेफ कंपनीच्या मे.भारत प्रोसेस ॲंड मेकॅनिकल इंजिनिअर लि.मुंबई चे भारत सरकारचे उपक्रम आहे. (गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अंडरटेकींग) यांना जोसेफ मॉडल - ८१० डिझेल रोड रोलर ८ ते १० टनी क्षमतेचे रोड रोलरची किंमत खालीलप्रमाणे दिली आहे.

किंमत - ४,०२,९९४=००

| | | |
|---|---|---|
| एक्साईज ड्युटी - १५% | - | ६०,४४९=०० |
| स्पेशल एक्साईज ड्युटी-११% (एक्साईज ड्युटीच्या १०%) | - | ६,०४५=०० |
| सेल टॅक्स अंदाजे-१२% | - | ५६,३६८=०० |
| | **एकूण रु.** | **५,२५,८२६=००** |

वरील किंमत ही एफ.ओ.आर.कलकत्ता आहे. व कलकत्ता ते औरंगाबाद रोलर ट्रान्स्पोर्टेशन करण्यासाठी अंदाजे रु.२०,०००/- खर्च येईल. असे रोलरची एकूण किंमत रु.५,४५,८२६/- होते. दिलेले दर हे डी.सी.एस.ॲण्ड जी.प्रमाणे आहे व सदरील एजन्सी ही भारत सरकारचे उपक्रम असून हयापुर्वी मनपाने खरेदी केलेले जोसेफ रोड रोलर चांगल्याप्रकारे कार्यरत आहेत. त्यामुळे मे.भारत प्रोसेस ॲण्ड मेकॅनिकल इंजिनियरिंग लि.मुंबई हयांचे कडून ८ ते १० टनी रोड रोलर खरेदी करण्यास मंजूरी मिळावी. त्यांच्या अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. ९८% ॲडव्हान्स पेमेन्ट रोलर डिसपॅच करते वेळी
२. राहिलेले २% रोलर मिळाल्यानंतर
३. जकात कर अतिरिक्त

तरी वरील अटींसह रोलर खरेदीस मंजूरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ च्या सरकारी अनुदानातून मे.भारत प्रोसेस ॲण्ड मेकॅनिकल इंजिनियरिंग लि.मुंबई यांच्याकडून ८ ते १० टनी जोसेफ रोड रोलर खरेदी करिता प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ च्या अटीनुसार रक्कम रु.५,२५,८२६/- अधिक कलकत्ता ते औरंगाबाद पर्यंतची वाहतुक करण्यासाठी अंदाजे रु.२०,०००/- असे एकूण रक्कम रु.५,४५,८२६/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४७०/३६ :**

१) टाटा- १२१० चेसीसवर व्हॅक्युम गली एम्टीयर हे युनीट बसविण्याच्या कामासाठी दैनिक इंडियन एक्स्प्रेस, दैनिक लोकमत, दैनिक तरुण भारत हया वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिध्दीस देण्यांत आल्या असता एकूण (२) निविदापत्रके वसुल झाली.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.आय.पी.डब्ल्यु टी.प्रा.लि.मुंबई | - | |
| | युनिटची मुळ किंमत | - | १३,५०,०००.०० |
| | + एक्साईज ड्युटी- १५% | - | २,०२,५००.०० |
| | + सेल टॅक्स - १५% | - | २,०२,५००.०० |
| | + ट्रान्स्पोर्टेशन चार्जेस | - | ६,०००.०० |
| | | - | १७,६१,०००.०० |
| | + जकात २% प्रमाणे | - | ३५,२५०.०० |
| | | - | १७,९६,२२०.०० |
| २. | मे.साऊदर्न पॉवर टेक इक्विपमेंट प्रा.लि.मद्रास | | |
| | युनिटची मुळ किंमत | - | ४,७५,०००.०० |
| | + एक्साईज ड्युटी - ५% | - | २३,७५०.०० |
| | + स्पेशल एक्साईज ड्युटी | | |

| | | |
|---|---|---|
| एक्साईज ड्युटीच्या-१५% | - | ३,५६२.०० |
| | - | ५,०२,३१२.०० |
| + सेंट्रल सेल टॅक्स-१०% | - | ५०,२३१.०० |
| एकूण | - | ५,५२,५४३.०० |
| + जकात कर - २% प्रमाणे | - | ११,०५०.०० |
| | - | ५,६३,५९३.०० |
| राऊंडेड किंमत रु. | - | ५,६४,०००.०० |

मे.साऊदर्न पॉवर टेक इक्विपमेंट लि.मद्रास हया कंपनीस टी.जी.जी.कंपनी मद्रासच्या मॅन्युफॅक्चरिंग व टेक्नीकल हॉटेल देते. व त्या प्रमाणे हे युनिट तयार करणार आहेत. मा.आयुक्तांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे मनपा तर्फे कार्यकारी अभियंता व उप अभियंता, (यांत्रिकी) हयांना मद्रास येथे कंपनीने तयार केलेल्या हया प्रकारच्या युनिटचे प्रात्यक्षिक पाहण्यासाठी पाठविण्यांत आले होते व अशाप्रकारचे युनिट समाधानकारक आहे अशी शिफारस त्यांनी केलेली आहे. तरी मे.साऊदर्न पॉवर टेक इक्विपमेंट प्रा.लि.मद्रास हयांनी दिलेले दर कमी दराचे असल्यामुळे त्यांनी दिलेल्या रु.५,६४,०००.००० च्या दरपत्रकास मंजूरी मिळावी.

२) सन १९९१-९२ च्या हया वर्षाच्या सरकारी अनुदानातून टाटा-१२१० चेसीसवर हायप्रेशर जेटींग मशिन युनिट बसविण्याच्या कामासाठी दैनिक इंडियन एक्स्प्रेस, दैनिक लोकमत, दैनिक तरुण भारत हया वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्दीस देण्यांत आल्या असता एकूण दोन निविदा पत्रके वसुल झाली.

१. आय.पी.डब्ल्यु.टी.प्रा.लि.मुंबई सर्व टॅक्सेस धरुन रुपये २०,९७,८९०.००
२. मे.विजय फायर प्रोटेक्शन सिस्टीम लि.मुंबई रुपये ५,७५,८९२.००

वरीलपैकी मे.आय.पी.डब्ल्यु.टी.प्रा.लि.मुंबई हयांना हया प्रकारचा युनिट बसविण्याचा अनुभव आहे. परंतू मे.जिवय फायर प्रोटेक्शन सिस्टीम लि.मुंबई हयांना हया प्रकारचे युनिट बसविण्याचा अनुभव नाही. हया प्रकारचे युनिट बसविण्याचा अनुभव नाही. ते फक्त फायर ब्रिगेडचे वाहन बनवितात. हे युनिट हया क्षेत्रामधल्या नामांकित उत्पादन करणाऱ्या अनुभवी कंपनीकडून तयार करुन घेणे मनपाच्या दृष्टीने उपयुक्त आहे. म्हणून मा.आयुक्त हयांच्या आदेशाप्रमाणे हया कामासाठी फेरनिविदा बोलावण्यांत आल्या असता खालील नामांकित कंपनीनीं निविदा विकत घेतल्या.

१. मे.आय.जी.डब्ल्यु.टी.प्रा.लि.मुंबई -
२. मे.उषा टेल हॉयस कंपनी, मुंबई -
३. मे.साऊदर्न पॉवर टेक इक्पिमेंट (प्रा.लि.मद्रास) -

निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत फक्त एकच निविदा वसूल झाली असून ती मे.साऊदर्न पॉवर टेक इक्विपमेंट या प्रा.लि.मद्रास हयांची असून त्यांनी खालीलप्रमाणे दिले आहेत.

अ) जेटींग इक्विपमेंट ४५२ मॉडेल व १०५ बाटप्रेशर व डिसचार्ज-१६१ लिटर एका मिनीटाला या प्रकारच्य युनिटची किंमत रु.१,२५,०००.०० व रु.१,००,०००.०० प्रा.मिटर पाईप + एक्साईज ड्युटी - ५% + एक्साईज ड्युटीवर-१५% स्पे्शल एक्साईज डृयुटी + १०% सेंट्रल सेल्स टॅक्स अशी किंमत दिली आहे. परंतू हया

प्रकारचे पंप हे हाय प्रशे्‌रचे नाहीत. त्यामुळे ही निविदा तांत्रिकदृष्ट्या स्विकारता येणार नाही.

ब) जेटांट इक्विपमेंट-१५०२ मॉडेलचे हायप्रेशर जेटांग इक्विपमेंट-१५०२ मॉडेलचे हायप्रेशर जेटांग पंप ज्याचे प्रेशर-१६० बार व डिसचार्ज-२१० लि.एका मिनिटाला आहे. अशा प्रकारच्या हायप्रेशर जेटांग मशिनची किंमत खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इक्वीपमेंट मुळ किंमत रु. | - | १०,७५,०००.०० |
| २. | ५० मा.हायप्रेशर पाईपची किंमत | | |
| | इक्वीपमेंटची मुळ किंमत रु. | - | १०,७५,०००.०० |
| | ५० मिटर लांब हाय प्रेशर पाईप | - | ५०,०००.०० |
| | प्रति मिटर-१०००/- रु प्रमाणे | - | ११,२५,०००.०० |
| | एक्साईज ड्युटी-५,७५% | - | ६४,६८७.०० |
| | | - | ११,८९,६८७.०० |
| | सेंट्रल सेल्स टॅक्स-१०% | - | १,१८,९३८.०० |
| | | - | १३,०८,७००.०० |
| | राऊंडेट किंमत | - | १३,०८,७००.०० |
| | जकात कर-२% | - | रु. २६,१७४.०० |
| | | - | १३,३४,८७४.०० |

राऊंडेड किंमत रु.१३,३५,७००.००

हया प्रकारचे युनिट मनपास उपयुक्त आहे.

हयापुर्वी मे.आय.पी.डब्ल्यु.टी.प्रा.लि.मुंबई हयांनी रु.२०,९७,९००.०० अशी किंमत दिली होती व हे जेटांग मशिन पण चांगल्या प्रकारचे आहे. मे.आय.पी.डब्ल्यु.टी.प्रा.लि.मुंबई व मे.आय.पी.डब्ल्यु.टी.प्रा.लि.मुंबई व मे.साऊदर्न पॉवर टेक प्रा.लि.मद्रास हया दोघांनी दिलेल्या दराची तांत्रिकदृष्ट्या तुलना केली असता मे.साऊदर्न पॉवर टेक प्रा.लि.मद्रास हयांचे दर कमी दराचे आहेत. तरी त्यांचे दर स्विकारणे योग्य राहील. हया कंपनीने बँक गॅरंटी घेऊन ३०% ॲडव्हान्स रक्कम घेण्यासाठी अट घातली आहे. ज्यास मा.आयुक्तांनी मंजूरी दिली आहे. हे युनिट सरकारी अनुदानातून खरेदी करावयाचे आहे व मार्च-९३ अखेरपर्यंत काम करुन घेणे जरुरीचे आहे. त्यादृष्टीने ही निविदा स्विकारण्याच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १२१० चेसीसवर व्हॅक्युमगली एम्टीयर हे युनिट बसविण्याच्या कामासाठी आलेल्या दोन निविदा पत्रकापैकी मे.साऊदर्न पॉवर टेक इक्विपमेंट प्रा.लि.मद्रास हयांचे दर कमी दराचे असल्यामुळे हे युनिट त्यांच्या आलेल्या खालील दरात खरेदी करण्यास मंजूरी देण्यांत येते.

| | | |
|---|---|---|
| मुळ किंमत | - | रु.४,७५,०००.०० |
| एक्साईज ड्युटी - ५% | - | २३,७५०.०० |
| स्पेशल एक्साईज ड्युटी | | |
| एक्साईज ड्युटीच्या-१५% | - | ३,५६२.०० |
| | - | ५,०२,३१२.०० |
| सेंट्रल सेल टॅक्स-१०% | - | ५०,२३१.०० |
| एकूण | - | ५,५२,५४३.०० |
| जकात कर - २% प्रमाणे | - | ११,०५०.०० |

| | | |
|---|---|---|
| | - | ५,६३,५९३.०० |
| राऊंडेड किंमत रु. | - | ५,६४,०००.०० |

तसेच हे काम तातडीचे असल्यामुळे याच सभेत मंजूरी व स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

२) सन १९९१-९२ च्य सरकारी अनुदानातून टाटा चेसीसवर आयप्रेशर जेटांग मशिन बसविण्याच्या कामासाठी दोन वेळा निविदा पत्रके बोलाविण्यांत आली. पाहिल्या वेळी मे.आय.पी.डब्ल्यु.टी.प्रा.लि.मुंबई हयांचे दर रु.२,९७,८९०.०० असे आले होते व त्याचवेळी मे.विजय फायर प्रोटेक्शन सिस्टीम लिमिटेड मुंबई हयांचे दर रु.५,७५,८९२.०० आले होते. मे.आय.पी.डब्ल्यु.टी.कंपनीचे दर फारच जास्त असल्यामुळे व मे.विजय फायर प्रोटेक्शन सिस्टीम लि.चे दर कमी असूनही (रु.५,७५,८९२/-) ह्या कंपनीस अशा प्रकारचे मशिन बसविण्याचा अनुभव नसल्यामुळे हया कामासाठी फेर निविदा बोलाविण्यांत आले भारतातील-३ नामांकित कंपनीनी टेंडर्स विकत घेतले होते. परंतू निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी मात्र फक्त मे.साऊदर्न ८फायर टेक इक्वीपमेंट प्रा.लि.मद्रास हयांचे एक दरपत्रक वसुल झाले. त्यांनी लो.प्रेशर व हायप्रेशर दोन्ही प्रकारच्या पंपासाठी दर भरले आहेत. तांत्रिक दृष्ट्या अतिरिक्त शहर अभियंता व उप अभियंता (तांत्रिक) हयांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे आपणास हाय प्रेशर जेटांग मशिन घेणे आहे. त्या दृष्टीने मे.साऊदर्न इक्वीपमेंट प्रा.लि.मद्रास हयांचे जेटांग पंप मॉडेल १५०२ चे १६० बार प्रेशरचे व २१० लिटर एका मिनिटाला डिसचार्ज असणारे आहे. ज्याचे दर जास्त जरी असले तरी विकत घेणे जरुरी आहे. मद्रासच्या कंपनीने खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| इक्वीपमेंटची मुळ किंमत रु. | - | १०,७५,०००.०० |
| ५० मिटर लांब हाय प्रेशर पाईप | - | ५०,०००.०० |
| प्रति मिटर- १०००/- रु. प्रमाणे | - | ११,२५,०००.०० |
| एक्साईज ड्युटी-५.७५% | - | ६४,६८७.०० |
| | - | ११,८९,६८७.०० |
| सेंट्रल सेल्स टॅक्स-१०% | - | १,१८,९३८.०० |
| राऊंडेड किंमत | - | १३,०८,७००.०० |
| जकात कर-२% रु. | - | २६,१७४.०० |
| | - | १३,३४,८७४.०० |
| राऊंडेड किंमत रु. | - | १३,३५,७००.०० |

मे.आय.पी.डब्ल्यु.टी.प्रा.लि. मुंबई हयांनी पहिल्यांदा जी निविदा भरली होती त्यात त्यांनी रु.२०,९७,९००.०० चे दर भरले होते. हया दोन्ही कंपनींनी दिलेल्या दराची तांत्रिक तुलना केली असता मद्रासच्या कंपनीचे युनिट चांगल्या प्रतिचे आहे. व दर पण कमी आहेत. तेव्हा मे.साऊदर्न फायर टेक प्रा.लि.मद्रास हयांनी दिलेल्या कमी दराच्या र.रुपये १३,३५,७००/- च्या दरपत्रकास मंजूरी देण्यांत येते.

पेमेंटसाठी मे.साऊदर्न पॉवर टेक प्रा.लि.मद्रास हयांनी ३०% ॲडव्हान्स पेमेंट बँक गॅरंटी घेऊन देण्याची घातलेल्या अटीस मंजूरी देण्यांत येते. वरील काम सन १९९१-९२ च्या सरकारी अनुदानातून करावयाचे असल्यामुळे त्यास मंजूरी देऊन हयाच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**विषय क्र.४७१/३७ :**

सन १९९१-९२ हया वर्षाच्या सरकारी अनुदानातून खालीलप्रमाणे कामे करुन घेण्यासाठी सूचना दैनिक लोकमत टाईम्स (दि.१२.११.९२) व दैनिक सिटीजन्स (दि.११.११.९२) हया वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी दिल्या असता खालीलप्रमाणे निविदा वसुल झाल्या.

१) टाटा-१२१० चेसीसवर १०,००० लिटरचे वॉटर टॅंकर, स्टिल कॅबीन पाईप लाईन डीवॉटरिंग सेट-५ अश्वशक्तीचे किर्बोस्कर कंपनीचे बसविणे या कामासाठी एकूण ३ दरपत्रके विक्री झाली व त्यापैकी निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत २ निविदा वसुल झाल्या.

१. मे.इंडियन हायवेस्टर, औरंगाबाद - रु.१,८३,७००.००
२. मे.परमार ॲटोगॅरेज, औरंगाबाद - रु.१,५७,५००.००

मे.परमार ॲटो गॅरेज औरंगाबाद हयांचे दर कमी असून त्यास मंजूरी मिळावी.

२) टाटा-६०८ चेसीसवर ३ हजार लिटरचे टॅंकर बसवणे डी-वॉटरिंग सेट, २५ अश्वशक्ती किर्लोस्कर कंपनीचे बसवणे, पाईप लाईन इ.कामासाठी ३ दरपत्रके विकली गेली. निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत-२ निविदा वसुल झाल्या.

१. मे.इंडियन हायवेस्टर, औरंगाबाद - रु.१,०८,९००.००
२. मे.परमार ॲटोगॅरेज, औरंगाबाद - रु.९८,२००.००

मे.परमार ॲटो गॅरेज, औरंगाबाद हयांचे दर कमी असून त्यास मंजूरी मिळावी.

३) टाटा-४०७ चेसीसवर कॅबीन बसविणे व ब्रेक डाऊन मॅकॅनिझम बसवून देणे हया कामासाठी - २ दरपत्रके विकली गेली निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत-२ निविदा वसुल झाल्या.

१. मे.प्रोन्स मोटर्स, ठाणे - रु.१,६२,५००.००
२. मे.परमार ॲटो गॅरेज, औरंगाबाद - रु.१,६५,०००.००

मे.प्रोन्स मोटार्स, ठाणे हयांचे दर कमी असून त्यास मंजूरी मिळावी.

वरील तिनही कामे गव्हर्नमेंट एडेड प्रोग्राम-१९९१-९२ च्या तरतूदीतून करावयाची आहेत.

४) सन १९९२-९३ हया आर्थिक वर्षातील मनपाच्या तरतूदीतून मेटॅडोर चेसीसवर मांस वाहतुक करण्यासाठी बॉडी तयार करण्याच्या कामासाठी - ३ दरपत्रके विकली गेली. व निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत-३ दरपत्रके विकली गेली व निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत-२ निविदा वसुल झाल्या.

१. मे.इंडियन हायवेस्टर, औरंगाबाद - रु.१,१८,०००.००
२. मे.परमार ॲटोगॅरेज, औरंगाबाद - रु.१,०२,७००.००

मे.परमार ॲटो गॅरेज, औरंगाबाद हयांचे दर कमी असून त्यास मंजूरी मिळावी.

**ठराव :**

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ वर्षाच्या सरकारी अनुदानातून टाटा-१२१० चेसीसवर दहा हजार लिटरचे वॉटर टॅंकर स्टिल कॅबीन पाईप लाईन डीवॉटरिंग

सेट पाच अश्वशक्तीचे किर्लोस्कर कंपनीचे इंजिन बसविणेच्या कामासाठी मे.परमार ॲटो गॅरेज, औरंगाबाद यांचे रुपये १,५७,५००/- च्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

२) टाटा-६०८ चेसीसवर तीन हजार लिटरचे टँकर बसविणे डी-वॉटरींग सेट २.५ अश्वशक्तीचे किर्लोस्कर इंजिन बसविणे आणि पाईप लाईन इत्यादी कामासाठी मे.परमार ॲटो गॅरेज, औरंगाबाद यांचे रु.९८,२००/- च्या कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

३) टाटा-४०७ चेसीसवर कॅबीन बसविणे ब्रेक डाऊन मॅकॅनिझम बसवून घेण्याच्या कामाकरिता मे.प्रीन्स मोटार्स, ठाणे यांचे रुपये १,६२,५००.०० च्या कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

४) सन १९९२-९३ या आर्थिक वर्षातील महापालिकेच्या तरतूदीतून मेटॅडोर चेसीसवर मांस वाहतुकीसाठी बॉडी तयार करण्याच्या कामाकरिता मे.परमार ॲटो गॅरेज औरंगाबाद यांचे रु.१,०२,७००/- च्या कमी दराच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४७२/३८ :**

वार्ड क्र.५७ मो.ज्योतीनगर येथे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.५,७४,०००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून प्राप्त सरकारी अनुदानातून सदर काम करणेस्तव मा.आयुक्त महोदयांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामा करिता कार्यालयीन निविदा सूचना क्र./१८/१४७२/९२, दि.०९.११.९२ नुसार दैनिक देवगिरी तरुण भारत व रहेबर दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात दुसरी वेळ निविदा पत्रके मागविले असता एकूण पाच निविदा पत्रके विकण्यांत आल्या होत्या. त्यापैकी चार निविदापत्रके प्राप्त झाली असून त्यांचा तुलनात्मक तक्ता दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.टी.बी.परमार | - | ८% जास्त |
| २. | मे.उदय इंजिनियरिंग | - | २०% जास्त |
| ३. | मे.पाल कन्स्ट्रक्शन | - | १०.५०% जास्त |
| ४. | श्री.एस.ए.नवाब | - | १४% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा-८% जास्त दराचे श्री.टी.बी.परमार यांचे दर पत्रक आहे. सिमेंटच्या नवीन दराप्रमाणे सदर दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३७% कमी येत असून मा.आयुक्त महोदयांनी ७% जास्त अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने मंजूरी दिलेली आहे. ७% जासत दर सिमेंटच्या नवीन दराप्रमाणे ०.३२% कमी येतात. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५७ ज्योतीनगर, येथे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराचे श्री.टी.बी.परमार यांचे दरपत्रक आहे. सिमेंटच्या नवीन दराने दरपत्रक हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३७% कमी येतात. मा.आयुक्त

महोदयांच्या आदेशावरुन दर वाटाघाटी होऊन संबंधितास ७% जास्त दराने काम देण्यास मंजूरी दिलेली आहे. ७% जास्त दर सिमेंटच्या नवीन दराने ०.३२% कमी येतात. करिता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दराने श्री.टी.बी.परमार यांचेकडून काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २२.०१.१९९३ रोजी सकाळी ११.०० वाजता भरलेल्या विषेश स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत.**

**शुक्रवार दिनांक २२.०१.१९९३ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.सभापती ॲड.श्री.इकबालसिंग गिल यांच्या अध्यक्षतेखाली विशेष स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
२. श्री.भगुरे तुळशीराम छगन
३. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
४. श्री.पेरकर विठ्ठल कोंडाजी

**विषय क्र.४७३/३९ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील वाहतुक बेटात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुर्णकृती पुतळा बसविणेचे ठरले सदरील कामास येणारा खर्च हा १९९२-९३ या आर्थिक वर्षाच्या सौंदर्यीकरणातून करण्यांत येईल.

सदर कामासाठी निविदा नोटीस क्र.१५ जा.क्र./मनपा/बांध-१/५४८/९२, दि.०९.११.९२ अन्वये दैनिक लोकसत्ता, दै.सकाळ, व दै.लोकमत, या वृत्तपत्रात खुल्या निविदा मागविल्या असता खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झाली.

१. देवरे आणि लाड असोशिएट
(ब्रान्झ पुतळा-८ फुट उंच) - रु.५,२५,०००.००
२. शिल्पकार लोंढे बंधु
(१) ८ फुट उंच - रु.२,३०,०००.००
(२) १/२ फुट उंच - रु.२,९५,०००.००
३. श्री.मडीलगेकर आर्ट, स्टुडिओ
(१) ८ फुट उंच - रु.१,९२,०००.००
(२) ९ फुट उंच - रु.२,२६,०००.००
(३) १० फुट अंच - रु.३,००,०००.००
४. व्हिबजोर आर्ट स्टुडिओ
लाईफ साईज (६ फुट उंच) - रु.१,८०,०००.००

वरील सर्व शिल्पकारांनी दिलेले दर हे काही अटी व शर्तीस अधिन राहुन दिलेले आहेत.

मा.आयुक्तांनी निवड समिती गठीत करुन पुतळा निवडणे बाबत दि.११.०१.९३ रोजी समितीची बैठक बोलावली. या समितीमध्ये पदाधिकारी या व्यतिरिक्त दोन प्रतिष्ठीत व्यक्ती ज्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जवळून परिचित आहेत. यांचा समितीमध्ये समावेश केलेला आहे. या बैठकीमध्ये खालील निर्णय घेण्यांत आलेले आहेत.

१. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे साहित्यीक असल्यामुळे हातात पुस्तक असावे.
२. पोषाख पैजामा पेहराव असावा.

३. दाखल केलेल्या छायाचित्राप्रमाणे पुतळा असावा.

वरीलपैकी अ.क्र.३ चे व्हिबजोर आर्ट स्टुडिओ यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी असल्यामुळे व गरज भासल्यास ८ फुटच उंचीच्या पुतळ्यास किती खर्च येईल या बाबत विचारणा केली असता संबंधिताने सदरील कामास रु.१,९०,०००.०० एव्हढा खर्च येईल. असे लेखी दिले आहे.

पुतळा उभारण्यासाठी चबुतरा बांधणी करिता वेगळा खर्च रु.७५,०००/- येईल असे नमूद केले आहे. त्यासही मान्यतेस्तव सादर.

तरी व्हिबजोर आर्ट स्टुडिओ यांच्या निविदाचे दर विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

<u>संवाद :</u>

**उप अभियंता (बांध-१) :** अहमदनगर निवासी श्री.वैराळे हे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे बरोबर - २० वर्ष राहिलेले आहेत. शाहीर अण्णाभाऊ साठे यांचे व्यक्तीमत्वाबाबत श्री.वैराळे यांनी तयार केलेल्या (स्केच) छायाचित्राबाबत नमुना सभागृहाच्या अवलोकनार्थ समोर ठेवण्यांत आलेला आहे.

**मा.सभापती :** शाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा राज्यात फार कमी ठिकाणी बसविलेला आहे. औरंगाबाद शहरात उभारावयाच्या शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासाठी नियुक्त केलेल्या समितीमध्ये शाहीर अण्णाभाऊ साठे यांचे निकट वर्ती सभापती श्री.त्रिभुवन यांचाही समावेश केला आहे. त्यामुळे शाहीर अण्णाभाऊ यांच्या व्यक्तीमत्वाबाबत आणि त्यांच्या कार्याबाबत बरीच माहिती मिळालेली आहे. त्यानुसार प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ प्रमाणेच्या माहितीचा समावेश त्यात करण्यांत आला आहे. यानुसार मुर्तीकाराने क्ले मॉडेल (मातीचा पुतळा) तयार झाल्यानंतर समिती पाहणी करुन त्याबाबत निर्णय देईल. व त्यास अंतिम मंजूरी दिली जाईल. ८ फुट उंचीच्या पुतळ्यासाठी रु.१,९०,०००/- चे व्हिबजोर आर्ट स्टुडिओ यांचे दरपत्रक मंजूर करण्यांत येते. त्यानुसार शाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा-१४ एप्रिल, १९९३ रोजी उभारला जाईल. अशी व्यवस्था करण्यांत यावी.

**उप अभियंता, (बांध-१) :** शाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वाहतुक वर्तुळ विकसीत करण्याचा वेगळा प्रस्ताव आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.विठ्ठल पेरकर, श्री.नारायण फत्तेलष्कर :** यापुर्वीही महाराणी अहिल्याबाई होळकर, धर्मविर संभाजी महाराज, छत्रपती शाहु महाराज, विर सावरकर, महाराणा प्रताप अशा महापुरुषांचे पुतळे उभारणे बाबत ही मागणी करण्यांत आली आहे. या संदर्भाने काय कार्यवाही झाली याचा खुलासा करण्यांत यावा.

**उप अभियंता (बांध-१) :** सन्माननीय सभासदांच्या सुचनेप्रमाणे छत्रपती शाहु महाराज यांचे पुतळ्याचा अनावरण समारंभ होईल अशी व्यवस्था प्रशासनाने करावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** विर सावरकर यांचा पुतळा स्थानिक संस्थेमार्फत तयार करुन घेण्यांत आला आहे. या पुतळ्याच्या उभारणीसाठी मनपातर्फे वाहतुक वर्तूळाच्या विकासाचा खर्च करावयाचा आहे. तेव्हा प्रशासनाने तशी व्यवस्था करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील वाहतुक बेटात ८ फुट उंचीचा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी मे.व्हिबजोर आर्ट स्टुडिओ यांचे रु.१,९०,०००.०० च्या सर्वात कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर पुतळा तयार करतांना निवड समितीने दिलेल्या खालील बाबींचा त्यात समावेश असावा, १) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे साहित्यीक असल्यामुळे हातात पुस्तक असावे, २) पोषाख पैजामा पेहराव असावा, ३) दाखल केलेल्या छायाचित्राप्रमाणे पुतळा असावा.

याशिवाय जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील बेटात उभारण्यांत येणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारणीसाठी तयार करावयाच्य चबुतरा बांधणी करिता र.रु.७५,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे लोकशाहीर अण्णाभाऊ आणि छत्रपती शाहू महाराज या दोन्ही पुतळ्यांचे १४ एप्रिल, १९९३ रोजी अनावरण होईल, अशी व्यवस्था प्रशासनाने करावी. असे सर्वानुमते ठरले. सदर ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २२.०१.१९९३ रोजी दुपारी ३.३० वाजता भरलेल्या विशेष स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. शुक्रवार दिनांक २२.०१.१९९३ रोजी दुपारी ३.३० वाजता समिती सभागृहात मा.सभापती ॲड.श्री.इकबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली विशेष स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
२. श्री.भगुरे तुळशीराम छगन
३. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
४. श्री.विजय गोविंदलाल पालीवाल
५. श्री.जावेद हसन खान कसीम हसन खान
६. श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
७. श्री.पेरकर विठ्ठल कोंडाजी
८. श्री.शिंदे मधुकर माणिकराव

**विषय क्र.४७४/१ :**

श्री.भरतकुमार किसनलाल जैस्वाल दुय्यम आवेक्षक यांच्या अपिलावर चर्चा करणे बाबत.

**<u>संवाद :</u>**

**मा.उपआयुक्त :** कार्यालयीन टिप्पणी श्री.भरतकुमार जैस्वाल यांनी स्थायी समितीपुढे काय अपिल केले याची प्रत प्रशासनास दिलेली नाही. तथापि, श्री.जैस्वाल सध्या कामावर आहेत. मुंबई प्रांतिक अधिनियम - १९४९ चे कलम (५६) (४) अन्वये एखाद्या कर्मचाऱ्यास पदावन्नत किंवा बडतर्फे नोकरीतून काढून टाकले तरच अशा कर्मचाऱ्यास स्थायी समितीसमोर अपिल करता येते. श्री.जैस्वाल हे सध्या नौकरीवर पुर्ववत असल्यामुळे त्यांचे प्रकरण अपिल होऊ शकत नाही व ही बाब स्थायी समितीच्या कक्षेत येत नाही.

**श्री.अजिजुल्ला बेग :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये कामावरुन कमी करण्याचे अधिकार स्थायी समितीस आहे. कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ लागला म्हणून अपिल दाखल केले आहे. महाराष्ट्र सिव्हील सर्व्हीसेस (शिस्त आणि अपिल) नियम १९७९ चे नियम - १७ अन्वये कोणत्याही शिक्षेविरुध्द अपिलार्थीला वरीष्ठ प्राधिकरणाकडे अपिल करता येते. (उक्त कलम वाचून दाखविले)

**मा.उपआयुक्त :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम मध्ये तरतूद नसेल तर महाराष्ट्र सिव्हील सर्व्हीसेस (शिस्त आणि अपिल) नियम १९७९ चा आधार घेतला जातो. परंतू मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम आवश्यक ती तरतूद आहे. म्हणून १९७९ च्या नियमाचा विचार करु शकत नाही.

**श्री.अजिजुल्ला बेग :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५५ अन्वये प्रशासनाने उपविधी तयार केलेले नाहीत. महाराष्ट्र सिव्हील सर्व्हीसेस

(शिस्त आणि अपिल) नियम - १९७९ नियम सर्व महाराष्ट्रसाठी लागू आहे. कोल्हापूर महानगरपालिकेने आवश्यक उपविधी तयार केले आहेत. जोपर्यंत उपविधी तयार होत नाहीत तो पर्यंत महाराष्ट्र सिव्हील सर्व्हीसेस १९७९ चा आधार घेऊन कार्यवाही केली पाहिजे.

**मा.उपआयुक्त :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार पदावन्नत करणे, कामावरुन कमी करणे यासाठी अपिल करता येते. इतर कारणांसाठी अपिल करता येणार नाही.

**श्री.अजिजुल्ला बेग, मा.सभापती :** श्री.जैस्वाल यांचे फ्रेश प्रकरणात त्यांना बाजु मांडण्याची संधी दिली नाही. तसेच प्रशासनास अंधारात ठेवण्यांत आले.

**विधी सल्लागार :** श्री.जैस्वाल यांचे प्रकरणी स्थायी समितीने निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही झाली आहे. तेव्हा तेव्हा अपिलार्थी या निर्णयाविरुध्द सर्वसाधारण सभेत अपिल करु शकले असते.

**श्री.तुळशीराम भगुरे :** श्री.जैस्वाल यांचे प्रकरण प्रशासनातर्फे स्थायी समितीपुढे ठेवले आहे. असा खुलासा श्री.जैस्वाल यांनी केला होता काय?

**मा.उपआयुक्त :** नाही.

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम - ४६५ अन्वये श्री.भरत जैस्वाल यांची स्थायी समितीने जो दोन वेतनवाढ बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यावेळी त्यावेळी स्थायी समितीची मंजूरी न घेतल्यामुळे कोर्टाने निर्णय दिला की, मनपाचा आदेश रद्द करण्यांत येतो आणि पुन्हा फ्रेश प्रकरण स्थायी समिती समोर पाठवावे. त्यावेळेस श्री.जैस्वाल यांना कलम - ५६ (३) अन्वये बाजु मांडण्याची संधी दिली नाही असे निदर्शनास येत आहे. स्थायी समितीस कल्पना दिली नाही. म्हणून स्थायी समितीने श्री.जैस्वाल यांच्या रोखल्या. कलम - ५६ (३) नुसार तांत्रिक कार्यवाही पुर्ण न झाल्यामुळे श्री.जैस्वाल यांची वेतनवाढ पुर्ववत करण्यात यावी. महापालिकेमध्ये कलम - ४६५ (१) (आय) अन्वये उपविधी उपलब्ध नसल्यामुळे श्री.जैस्वाल यांच्या रोखण्यांत आलेल्या दोन वेतनवाढी पुर्ववत करण्यांत याव्यात. असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४७५/२ :**

शेख कमर सहाय्यक अभियंता इमारत बांधकाम उप विभाग यांच्या अपिलावर चर्चा करणे बाबत.

**संवाद :-**

**उपआयुक्त :** कार्यालयीन टिप्पणी सदरील कर्मचारी सध्या नोकरीमध्ये असून त्यांचेविरुध्द निलंबन अथवा बडतर्फे करण्यांत आलेली नाही. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम- १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये एखाद्या कर्मचाऱ्यास पदावन्नत किंवा बडतर्फे, नोकरीतून काढून टाकले तरच अशा कर्मचाऱ्यास स्थायी समिती समोर अपिल करता येते. त्यामुळे उपरोक्त कर्मचाऱ्यांचे प्रकरण अपिल होऊ शकत नाही. व ही बाब स्थायी समितीच्या कक्षेत येत नाही.

**ठराव :**

श्री.शेख कमर, सहाय्यक अभियंता यांचे प्रकरणात प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.४७६/३ :**

यामीन अली खान, कर निरिक्षक यांच्या अपिलावर चर्चा करणे बाबत.

**संवाद :-**

**मा.उपआयुक्त :** कार्यालयीन टिप्पणी :- सदरील कर्मचारी सध्या नोरीमध्ये असून त्याचेविरुध्द निलंबन अथवा बडतर्फे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम - १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये एखाद्या कर्मचाऱ्यांस पदावन्नत किंवा बडतर्फे, नोकरीतून काढून टाकले तरच अशा कर्मचाऱ्यास स्थायी समिती समोर अपिल करता येते. त्यामुळे उपरोक्त कर्मचाऱ्यांचे प्रकरण अपिल होऊ शकत नाही व ही बाब स्थायी समितीच्या कक्षेत येत नाही.

**श्री.नाराण फत्तेलष्कर, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.अजिजुल्ला बेग :** सर्व झोनमध्ये झोन क्र.३ ची वसुली किती क्रमांकावर आहे. झोन क्र.३ मधील अन्य दोन कर निरिक्षकांची वसुलही कमी प्रमाणात आहे. तेव्हा त्यांच्यावर काय कार्यवाही केली. श्री.यामीन अली खान, कर निरिक्षक, यांच्या बाबतीत फक्त तक्रार केली म्हणून शिक्षा करता येत नाही. त्याबाबत चौकशी झाली काय? याचा खुलासा व्हावा.

**मा.उपआयुक्त :** तक्रारीची मुळ परिस्थिती आणि ठरवून दिलेले उद्दिष्ट यानुसार झालेल्या वसुलीचा आकडा प्रत्यक्ष समोर असतांना चौकशी करण्याची गरज नाही. कर निरिक्षक श्री.यामीन अली खान यांनी ठरवून दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे ७०% वसुली केली तर वेतनवाढ शिथील करण्याचा विचार केला जाईल.

**ठराव :**

कर निरिक्षक, श्री.यामीन अली खान यांचे अपिलाप्रमाणे प्रशासनाने फेर विचार करावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.४७७/४ :**

जे.ई.जाधव अनुरेखक कर आकारणी विभाग, यांच्या अपिलावर चर्चा करणे बाबत.

**संवाद :**

**सहा.आयुक्त -१ :** कार्यालयीन टिप्पणी :- सदरील कर्मचारी सध्या नोकरीमध्ये असून त्यांचे विरुध्द निलंबन अथवा बडतर्फे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये एखाद्या कर्मचाऱ्यांस पदावन्नत किंवा बडतर्फे, नोकरीतून काढून टाकले. तरच अशा कर्मचाऱ्यांस स्थायी समितीसमोर अपिल करता येते. त्यामुळे उपरोक्त कर्मचाऱ्यांचे प्रकरण अपिल होऊ शकत नाही. व ही बाब स्थायी समितीच्या कक्षेत येत नाही.

**श्री.अजिजुल्ला बेग :** अनुरेखक श्री.जे.ई.जाधव यांचे प्रमाणेच अन्य एका प्रकरणात न्यायालयाचा निकाल झाल्यानंतर त्या प्रकरणाशी संबंधित असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निलंबन काळ हा सेवाकाळ धरण्यांत येऊन पुर्ण वेतन देण्यांत आले आहे. अनुरेखक श्री.जे.ई.जाधव यांचे प्रकरणात असा फरक का? याचा खुलासा व्हावा.

**ठराव :**

श्री.एस.एस.गायकवाड अनुरेखक आणि जे.ई.जाधव, अनुरेखक यांचे प्रकरण सारखेच असून या दोघानांही न्यायालयाने निर्दोष असल्याचे म्हटले आहे. म्हणून अनुरेखक

श्री.एस.एस.गायकवाड यांचे प्रकरण प्रमाणे अनुरेखक श्री.जे.ई.जाधव यांचे प्रकरणात निलंबन काळ हा सेवा काळ धरण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४७८/५ :**

विष्णु गोपाळराव वझे शाखा अभियंता यांच्या अपिलावर चर्चा करणे बाबत.

**संवाद :-**

**सहाय्यक आयुक्त-१ :** कार्यालयीन टिप्पणी : सदरील कर्मचारी सध्या नोकरीमध्ये असून त्यांचेविरुध्द निलंबन अथवा बडतर्फे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये एखाद्या कर्मचाऱ्यास पदावन्नत किंवा बडतर्फे नोकरीतून काढून टाकले तरच अशा कर्मचाऱ्यास स्थायी समितीसमोर अपिल करता येते. त्यामुळे उपरोक्त प्रकरण अपिल होऊ शकत नाही व ही बाब स्थायी समितीच्या कक्षेत येत नाही.

पदोन्नती देतांना ४०:४०:२० या प्रकरात पदोन्नती देण्यांत येते. तेव्हा अपिलार्थी श्री.विष्णु वझे यांच्यावर अन्याय झालेला नाही.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** भटक्या विमुक्त जाती संघटनेचा मी अध्यक्ष आहे. कार्यालयात कार्यरत असलेले उप अभियंता श्री.सिकंदर अली हे सर्वसाधारण उमेदवार म्हणून नियुक्त झालेले आहे. परंतू त्यांचा भाऊ जो या कार्यालयात कनिष्ठ अभियंता या पदावर काम करीत आहे. तो छप्परबंद या भटक्या विमुक्त जातीचा उमेदवार म्हणून नियुक्त झालेला आहे. तेव्हा हे कसे आहे. याचा खुलासा व्हावा. छप्परबंद या भटक्या विमुक्त जातीचे अगदी ठरावीकच लोक मराठवाड्यात आहेत.

**ठराव :**

श्री.विष्णु वझे यांनी अपिलाबरोबर दिलेली सर्व कागदपत्रे पाहता उप अभियंताची भरलेल्या एकूण चौदा पदांपैकी राखीव पाच पदे, पदवीधारक चार पदे, पदविकाधारक दोन पदे, आय.टी.आय.धारक तीन पदे, वरीलप्रमाणे एकूण उप अभियंता पदांमध्ये प्रथम आरक्षित (राखीव) पदे - ५० बिंदु रोस्टरप्रमाणे भरणेत येतात व उरलेल्या बिनराखीव पदांमध्ये ४०:४०:२० असे प्रमाण अनुक्रमे पदवीधारक, पदवीकाधारक व आय.टी.आय.यांचे असावयास हवे.

परंतू ४०% ४०% २०% अशी विभागणी आपल्या कार्यालयातर्फे (अस्थापनाकडून) एकूण-१४ पदाकरिता केली जात आहे. हे चुकीचे वाटते कारण यामुळे राखीव उमेदवारांना दोन वेळेस फायदा मिळतो.

जेव्हा रोस्टरप्रमाणे राखीव पदे भरली जातात. तेव्हाच उरलेल्या बिनराखीव पदाकरिता ४०% ४०% २०% हे प्रमाण लावणेत यावे. म्हणजे पदविकाधारकांवर (बिनराखीव) अन्याय होणार नाही. यावरुन पदवीधारक कर्मचाऱ्यांवर अन्याय झालेला दिसतो. तरी प्रशासनाने वरील बाबींचा फेरविचार करुन निर्णय घ्यावा आणि तीस दिवसाचे आत अर्जदारास कळवावे असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४७९/६ :**

श्री.आर.एस.तायडे, लिपीक, यांच्या अपिलांवर चर्चा करणे बाबत.

**संवाद :-**

**सहाय्यक आयुक्त-१ :** कार्यालयीन टिप्पणी : सदरील कर्मचारी सध्या नोकरीमध्ये असून त्यांचे विरुध्द निलंबन अथवा बडतर्फे कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम -१९४९ चे कलम ५६ (४) अन्वये एखाद्या कर्मचाऱ्यास पदावन्नत किंवा बडतर्फे नोकरीतून काढून टाकले, तरच अशा कर्मचाऱ्यांस स्थायी समितीसमोर अपिल करता येते. त्यामुळे उपरोक्त कर्मचाऱ्यांचे प्रकरण अपिल होऊ शकत नाही व ही बाब स्थायी समितीच्या कक्षेत येत नाही.

**श्री.विठ्ठल पेरकर, श्री.अजिजुल्ला बेग :** अपिलार्थी श्री.आर.एस.तायडे यांनी अपिलासोबत जोडलेली कागदपत्रे पाहता एकाच दिवशी अनेक वर्षाचे गोपनिय अहवाल त्यांना दिल्याचे दिसते. तेव्हा हे कसे याचा खुलासा व्हावा.

**ठराव :**

श्री.आर.एस.तायडे सेवा जेष्ठता डावलून त्यांना कनिष्ठ असलेल्या उमेदवारास पदोन्नती देण्यांत आली या विरोधात श्री.तायडे यांनी अपिल बरोबर जी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यावरुन असे निदर्शनास आले आहे की, निवड समितीचे गठन पत्र क्र.मनपा/१/२३९/९२, दि.२९.०१.१९९२ प्रमाणे करण्यांत आलेले आहे. दिनांक ०१.०२.९२ रोजी झालेल्या निवड समितीच्या बैठकीमध्ये निवड करण्यांत आलेल्या जेष्ठ लिपिकांना मनपा/अस्था-१/२९१/९२, दि.०४.०२.९२ अन्वये आदेश देण्यांत आले सदर आदेशानुसार श्री.तायडे यांची सेवा जेष्ठता डावलण्यांत आल्याचे दिसून येते.

या संदर्भात श्री.तायडे यांनी दिनांक ०४.०२.९२ रोजी आपले लेखी निवेदन देवून सेवा जेष्ठता डावलून सेवा जेष्ठता यादी कनिष्ठ असलेल्या उमेदवारास पदोन्नती दिल्याने त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची दाद मागितली आहे. वरील तिन्ही बाबींचा विचार करता प्रशासनाच्या नंतर लक्षात आले असावे की, या प्रकरणामध्ये प्रशासन अडचणीत येत आहे. तेव्हा या अडचणी मधुन सुटण्यासाठी प्रशासनाने घाईगर्दीत नवीनच मार्ग शोधलेला दिसतो तो असा की, श्री.तायडे यांचे गोपनिय अहवाल हेतू पुरस्सर प्रतिकुल शेरा देवून मुद्दामपणे त्यांचे गोपनिय अहवाल खराब करुन त्यांना नंतर कळविण्यांत आले. वास्तविक प्रशासनाला हे चांगले माहिती असावे की, कर्मचाऱ्यांच्या विरोधात असलेल्या गोपनिय अहवालातील प्रतिकुल शेरा ज्या त्या वर्षातच संबंधित कर्मचाऱ्यांना वेळीच कळवावा लागतो. असे असतानांही श्री.तायडे यांचे गोपनिय अहवाल हे खालीलप्रमाणे वरील पदोन्नतीचे आदेश निघाल्यानंतर व श्री.तायडे यांनी त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची दाद मागितल्यानंतर गोपनिय अहवाल देण्यांत आले आहेत. ते येणेप्रमाणे -

१. गोपनिय अहवाल पत्र क्र.मनपा/अस्था-१/सी.आर./७४२/९२, दि.२८.०२.९२ प्रमाणे वर्ष - १९८२/८३.
२. मनपा/अस्था-१/सि.आर./७४३/९२, दि.२८.०२.९२ प्रमाणे वर्ष - १९८३-८४.
३. मनपा/अस्था-१/सि.आर./७४४/९२, दि.२८.०२.९२ प्रमाणे वर्ष - १९८५-८६.
४. मनपा/अस्था-१/सि.आर./७४५/९२, दि.२८.०२.९२ प्रमाणे वर्ष - १९९०-९१.

वरील गोपनिय अहवालावरुन असे निदर्शनास येते की, सदर कर्मचाऱ्यांने आपल्यावर झालेल्या अन्यायाची दाद मागितली असता त्याला एकाच दिवशी प्रतिकुल असलेले शेरे दि.२८.०२.९२ ला देण्यांत आले. याचाच अर्थ असा की, निवड समितीला किंवा प्रशासनाला श्री.तायडे यांना पदोन्नती द्यावयाची नव्हती म्हणून हेतूपुरस्सर त्यांनी प्रतिकुल शेरे ताबडतोब पदोन्नतीच्या वेळी लिहून घेतले असावे. हे निश्चित दिसून येते. व अशाप्रकारचे कृत्य हे दखलपात्र आहे याचे भान प्रशासनाने किंवा निवड समितीने ठेवलेले दिसत नाही. तसेच

मागासवर्गींना पदोन्नती देतांना या संदर्भात शासनाने काढलेल्या आदेशाचेही पालन केलेले दिसत नाही.

तेव्हा वरील बाबींचा साफल्याने विचार करुन स्थायी समिती असे आदेश देते की, प्रशासनाने श्री.तायडे यांना दिनांक ०४.०२.९२ पासून जेष्ठ लिपीक म्हणून तात्काळ पदोन्नतीचे आदेश देण्यांचा विचार करावा असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८०/७ :**

खलील अहमद वल्द इकबाल अहमद यांच्या अपिलावर चर्चा करणे बाबत.

**<u>संवाद :-</u>**

**सहाय्यक आयुक्त-१ :** कार्यालयीन टिप्पणी : सदरील कर्मचारी सध्या नोकरीमध्ये असून त्यांचेविरुध्द निलंबन अथवा बडतर्फे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये एखाद्या कर्मचाऱ्यास पदावन्नत किंवा बडतर्फे, नोकरीतून काढून टाकले, तरच अशा कर्मचाऱ्यास स्थायी समिती समोर अपिल करता येते. त्यामुळे उपरोक्त कर्मचाऱ्यांचे प्रकरण अपिल होऊ शकत नाही. व ही बाब स्थायी समितीच्या कक्षेत येत नाही. प्रशासनाकडे वर्ग-३ च्या जागा रिक्त नाही. याशिवाय जेष्ठता यादीनुसार पदोन्नतीसाठी अपिलार्थीचा नंबर-३८ वा आहे.

**मा.उपआयुक्त :** अपंग उमेदवारांना पदोन्नती देण्यासाठी काही तरतूद नाही.

**श्री.अजिजुल्ला बेग :** अपिलार्थी श्री.खलील अहेमद यांनी वर्ग-४ मधून वर्ग-३ मध्ये पदोन्नती मिळणे बाबत वेळोवेळी अर्ज दिलेले आहेत. त्याचा कुठल्याही प्रकारचा विचार झालेला नाही. किंवा त्याबाबत साधे उत्तरही देण्यांत आलेले नाही. अर्जदाराने वर्ग-३ चे पदाच्या मुलाखतीच्या वेळी अपंगाना पदोन्नती देण्याबाबत शासकीय परिपत्रक सादर केले परंतू त्याचाही विचार केलेला दिसत नाही. यावरुन अपिलार्थी श्री.खलील अहेमद यांचेवर अन्याय झालेला दिसतो. तेव्हा प्रशासनाने तिस दिवसांचे आत श्री.खलील अहेमद यांना खुलासा करावा.

**ठराव :**

श्री.खलील अहेमद यांनी अपिलासोबत दाखल केलेले कागदपत्र पाहता त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. असे दिसते. तेव्हा प्रशासनाने - ३० (तिस) दिवसाचे आत अर्जदारास खुलासा करावा असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ३०.०१.१९९३ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. शनिवार दिनांक ३०.०१.१९९३ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा.सभापती ॲड.श्री.इकबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.भगुरे तुळशीराम छगन
२. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
३. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
४. श्री.जावेद हसन खान कसीम हसन खान
५. श्री.मोहंमद इस्माईल अ.करीम
६. श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
७. श्री.पेरकर विठ्ठल कोंडाजी

**विषय क्र.४८१/१ :**

मा.कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.५५ मोहल्ला कबीरनगर, मुरलीधरनगर झोपडपट्टी भागात ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये १,४८,४००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून स्लम विभागाच्या भांडवली तरतूदीच्या बचतीमधून सदर काम करण्यास मा.आयुक्त महोदयांनी मंजूरी दिलेली आहे.

करिता स्थायी समितीच्या मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५५ मो.कबीरनगर, मुरलीधर झोपडपट्टी भागात ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता र.रु.१,४८,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. कामाची तातडी लक्षात घेता सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८२/२ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.महात्मा फुलेनगर येथील समाज मंदिराच्या सभोवती संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९१-९२ डी.एस.आर.दराने रक्कम रुपये १,०८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरचा खर्च इतर इमारती व उर्वरित कामे या शिर्षकातून करण्यांत येईल.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु.१,०८,०००/- चा प्रस्ताव मंजूरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महात्मा फुले नगर येथील समाज मंदिराच्या भोवती संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता रक्कम रु.१,०८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. कामाची तातडी लक्षात घेता सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८३/३ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला की, पडेगांव व मिटमिटा ही गांवे - १९८२ मध्ये महापालिका हद्दीत समाविष्ट झालेली आहेत. मात्र अद्याप पावेतो तेथे जलनि:सारणाची सुविधा देण्यांत आलेली नाही. करिता त्या भागात जलनि:सारण व्यवस्था करणेसाठी परिसर अभियांत्रिकी च्या सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार पडेगांव येथील कामासाठी रु.८,८२,०००/- चे अंदाजपत्रक तर मिटमिटा येथील कामासाठी रुपये ६,८२,५००/- चे अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी १९.१२.९२ रोजी मंजूरी दिलेली आहे. सदरील कामाच्या खर्चाचा समावेश शासकीय अनुदान १९९२-९३ मध्ये केलेला आहे.

त्यानुसार उपरोक्त दोन्ही कामासाठी रु.१५,०१,०८०/- ची निविदा सूचना क्र.६/९२/९३ ही प्रसिध्दीस देण्यासाठी जनसंपर्क अधिकारी यांचे मार्फत दैनिक लोकमत व दैनिक इंडियन एक्स्प्रेस मध्ये प्रसिध्दीस देवून निविदा मागविल्या असता १२ कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | उदय इंजिनियरिंग कंपनी | - | १३% कमी |
| २. | एस.ए.नवाब | - | १३.१३% कमी |
| ३. | आर.एल.बारवाल | - | ४% जास्त |
| ४. | जी.एम.कटारिया | - | १३.५०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.५०% कमी दराची श्री.जी.एम.कटारिया यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८२ मध्ये महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या पडेगांव आणि मिटमिटा या गांवामध्ये जलनि:सारणाच्या कामाची व्यवस्था करण्याकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १३.५०% कमी दराच्या श्री.जी.एम.कटारिया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८४/४ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९८९-९० मधील शासकीय विशेष विकास निधीमधून जवाहर कॉलनी व परिसरातील भागात जलनि:सारणाच्या लॅटरल व ब्रँचेस टाकलेल्या आहेत. याच परिसरातील गारखेडा गांव व बाजुला नव्याने वसलेल्या कॉलनीज मध्ये जलनि:सारणाच्या लाईन टाकलेल्या नाहीत. करिता या भागामध्ये जलनि:सारण वाहिन्या टाकण्याच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार रु.१७,६७,७००/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी दि.१९.१२.९२ रोजी मंजूरी दिलेली आहे. सदरील कामाच्या खर्चाचा समावेश शासकीय अनुदान १९९२-९३ मध्ये केलेला आहे.

त्यानुसार उपरोक्त कामासाठी रु.१६,८४,०००/- ची निविदा सुचना क्र.६/९२/९३ ही प्रसिध्दीस देण्यासाठी जा.क्र./मनपा/वि.का/१/९३, दि.०१.०१.९३ नुसार जनसंपर्क अधिकारी यांचेकडे पाठवण्यांत आली असता दै.लोकमत व दै.इंडियन एक्स्प्रेस मध्ये प्रसिध्दीस देण्यांत आली. त्यानुसार निविदा विक्रीच्या अंतिम तारिख ०८.०१.९३ रोजी १.०० वाजतापर्यंत एकूण - १३ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीची नियोजित तारिख १६.०१.९३ रोजी

सहा मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या असल्याचे दिनांक १६.०१.९३ रोजीच निविदापेटी उघडली असता दिसून आले. प्राप्त मोहरबंद निविदा उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.डी.अंजय्या ॲण्ड सन्स | - | अंदाजपत्रकापेक्षा ७.१०% कमी |
| २. | श्री.एस.ए.नवाब | - | अंदाजपत्रकापेक्षा १४.१३% कमी |
| ३. | श्री.आर.एल.बारवाल | - | अंदाजपत्रकापेक्षा १४.००% कमी |
| ४. | उदय इंजिनियरिंग कंपनी | - | अंदाजपत्रकापेक्षा १८% कमी |
| ५. | श्री.जी.एम.कटारिया | - | अंदाजपत्रकापेक्षा १२.५०% कमी |
| ६. | श्री.योग सिमेंट प्रॉडक्टस मॅन्यु ॲण्ड कन्स्ट्रक्शन कं.प्रा.लि. | - | अंदाजपत्रकापेक्षा ९.२०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा उदय इंजिनियरिंग कंपनी यांची अंदाजपत्रकापेक्षा १८% कमी दराची आहे.

करिता गारखेडा स्लम व परिसरातील कॉलनीमध्ये आर.सी.सी.जलनिःसारण वाहिन्या टाकण्याच्या कामासाठी उदय इंजिनियरिंग कंपनी यांची अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १८% कमी दराची निविदा स्विकारण्याच्या प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जवाहर कॉलनी व परिसरातील गारखेडा गांव व त्या बाजुला नव्याने वसलेल्या कॉलनीमध्ये आर.सी.सी.जलनिःसारणाची लाईन टाकण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १८% कमी दराच्या मे.उदय इंजिनियरिंग कंपनी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८५/५ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनिःसारण) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.सिल्क मिल कॉलनी येथील ड्रेनेज लाईन अपरुटींग करुन २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता रक्कम रु.२,७२,९००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.३६४, दि.०९.११.९२ मंजूरी मिळालेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१८/१४७२/९२, दि.०९.११.९२ नुसार दैनिक देवगिरी तरुण भारत व रहेबर या वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविल्या असता एकूण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या. पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सलीम अहेमद | - | १०% जास्त |
| २. | श्री.कैसर खान | - | १२% जास्त |
| ३. | श्री.कुलवंतसिंग | - | १५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराचे श्री.सलीम अहेमद यांचे दरपत्रक आहे. मा.आयुक्तांच्या आदेशावरुन संबंधितास दर वाटाघाटीकरिता बोलावले असता त्यांनी १०% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७%

जास्त दराने काम करण्यास संबंधिताने सम्मती दर्शविली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.सिल्क मिल कॉलनी येथील ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता गुत्तेदार श्री.सलीम अहेमद यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८६/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.१९ बुढी लाईन येथे ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.१,४९,५००/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.३७/६ दि.०९.०६.९२ नुसार मंजूरी मिळालेली असून सदर काम शासकीय अनुदान सन १९९१-९२ च्या तरतूदीतून करण्यास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.१७/१३८१/९२, दि.१३.१०.९२ ला दुसऱ्यांदा दैनिक नवा मराठा, औरंगाबाद टाईम्स, डॉन या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सोळा निविदा विकण्यांत आलेल्या होत्या त्यापैकी केवळ दोन निविदा प्राप्त झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मिर्झा आर.बी. | - | दर दर्शविलेला नाही. |
| २. | श्री.सईद खान | - | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे ५% जास्त दराचे श्री.सईद खान यांचे दरपत्रक आहे. परंतू मा.आयुक्त यांना दर योग्य वाटत नसल्यामुळे संबंधित गुत्तेदार श्री.सईद खान यांना वाटाघाटीकरिता पाचारण करण्यांत आले. सदर कामाची मा.आयुक्त यांच्या दालनात दिनांक ०८.०१.९३ ला दर वाटाघाटी करण्यांत आली. मा.आयुक्त यांनी ४% जास्तीच्या दरास मंजूरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१९, बुढ्ढी लाईन येथे ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता गुत्तेदार श्री.सईद खान यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८७/७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जलनिःसारण विशेष कार्यक्रम योजने अंतर्गत सन १९९१-९२ साठी धन आईस फॅक्टरी ते सिध्दार्थ गार्डन पर्यत मुख्य जलनिःसारण वाहिनी सी.सी.वर टाकण्याच्या कामासाठी शासनाची प्रशासकीय मान्यता निर्णय क्र.एएमसी/१८९२/७५७/सी.आर./४१/९, नवि-४, दि.२३.०३.९२ नुसार मिळालेली आहे.

वरील योजने अंतर्गत मा.आयुक्तांचे दिनांक १४.०५.९२ च्या मान्यतेनुसार बॉम्बे मर्कंटाईल बँक ते अंजली सिनेमा पर्यंत १००० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.एन.पी.-२ क्लासची मुख्य जलनिःसारण वाहिनी सी-१ टाकणेच्या रक्कम रु.१८,१२,८४७/- च्या कामासाठी निविदा सुचना क्र.५/९२/९३ (तिसरी वेळ) ही दै.लोकमत व दैनिक इंडियन एक्स्प्रेस मध्ये प्रसिध्दीस देऊन जाहिर निविदा मागविल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा कोऱ्या निविदा विक्री झाल्या. पैकी पाच मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.एल.बारवाल | - | १६% जास्त |
| २. | श्री.गॉडविन कन्स्ट्रक्शन | - | २६.५०% जास्त |
| ३. | एम.एस.एस.आय.डी.सी. | - | रु.१०९५-३४ आर.एम.टी. (फक्त पाईप पुरवठ्याचे दर) |
| ४. | योग सिमेंट प्रॉडक्टस मॅन्यु ॲण्ड कन्स्ट्रक्शन | - | २७.७% जास्त |
| ५. | मे.रे.कन्स्ट्रक्शन | - | ६८.९०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.आर.एल.बारवाल यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% जास्त दराची आहे. हे काम १६% अधिक दराने कसे परवडेल याबाबत पत्र क्र.मनपा/विका/३७४/९२, दि.१६.१२.९२ नुसार ठेकेदार श्री.आर.एल.बारवाल यांना विचारणा केली असता त्यांनी त्याच्या दिनांक २२.१२.९२ च्या लेखी पत्रकानुसार योग्य तो खुलासा केलेला आहे.

तरी उपरोक्त काम लवकर पुर्ण करणे जरुरीचे असल्यामुळे श्री.आर.एल.बारवाल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% अधिक दराची निविदा मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे धन आईस फॅक्टरी ते सिध्दार्थ गार्डन पर्यंत मुख्य जलवाहिनी सी.सी.वर टाकण्याच्या कामापैकी बॉम्बे मर्कन्टाईल बँक ते अंजली टॉकीज पर्यंत १००० मी.मी.व्यासाची सी-१ मुख्य जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १६% अधिक दराच्या आर.एल.बारवाल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८८/८ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, दिल्ली गेट आयलँड मध्ये पाण्याचे कारजे तयार करणे व पुतळ्याचे पेडस्टल उभारणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.२,२०,०००/- चे बनविण्यांत आले असून सदरील कामाचा खर्च सुशोभीकरण या सदराखाली करण्यांत येईल.

सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१६ जा.क्र./मनपा/बांध-१/५५५/९२, दि.१२.११.९२ अन्वये निविदा मागविल्या गेल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण चार निविदा विकल्या गेल्या. त्यापैकी एकूण तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि.०१.१२.९२ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

१. श्री.बदर बिन सालम - ११% जास्त

२. श्री.कुलवंतसिंग - १५% जास्त
३. श्री.कैसर खान - १४% जास्त

वरीलपैकी श्री.बदरबीन सालम यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ११% जास्त दराची निविदा आहे. दर जास्त असल्याकारणाने संबंधित गुत्तेदारास वाटाघाटी करण्यासाठी मा.आयुक्त यांच्याकडे बोलाविले असता संबंधिताने सदरील काम ११% जास्त ऐवजी ९% जास्त दराने करण्यास सम्मती दर्शविलेली आहे. करिता निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्ली गेट आयलँड मध्ये पाण्याचे कारंजे तयार करणे व पुतळ्याचे पेडस्टल उभारण्याच्या कामाकरिता रक्कम रु.२,२०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच गुत्तेदार श्री.बदरबीन सालम यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८९/९ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मिलकॉर्नर येथील रस्त्यावरील वाहतुक बेटाचे सुशोभीकरण करुन छत्रपती शाहू महाराज यांचा पुतळा उभारणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु.१,२०,०००/- चे बनविण्यांत आले असून सदरील कामाचा खर्च सुशोभीकरण या सदराखाली करण्यांत येईल.

सदरील कामाकरिता कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१४ जा.क्र./मनपा/बांध-१/५३५/९२, दिनांक ०२.११.९२ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण पाच निविदा विकल्या गेल्या. त्यापैकी तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि.२३.११.९२ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

१. श्री.कुलवंतसिंग - १५% जास्त
२. श्री.एस.जी.मेहबुब अली - ८% जास्त
३. श्री.सय्यद सिराजुद्दीन - १६% जास्त

वरीलपैकी श्री.एम.जी.मेहबुब अली यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ८% जास्त दराची निविदा आहे. सदरील दर जास्त असल्याकारणाने संबंधित गुत्तेदारास वाटाघाटी करण्यासाठी मा.आयुक्त यांच्याकडे बोलाविले असता संबंधिताने ८% जास्त ऐवजी ७% जास्त दराने करण्यास सम्मती दर्शविलेली आहे. करिता निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलकॉर्नर येथील वाहतुक बेटाचे सुशोभीकरण करुन छत्रपती शाहु महाराज यांचा पुतळा उभारणेच्या कामासाठी रक्कम रु.१,२०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच श्री.मेहबुब अली यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९०/१० :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मो.भवानी नगर व निजामगंज भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,६७,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. व सदरील अंदाजपत्रकास स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१४ जा.क्र./मनपा/बांध-१/५३५/९२, दि.०२.११.९२ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण दोन निविदा विकल्या गेल्या. त्यापैकी दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक २३.११.९२ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारसमक्ष उघडण्यांत आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

१. मे.रे.कन्स्ट्रक्शन - १३% जास्त
२. श्री.खाजा मोईनुद्दीन - १८% जास्त

वरीलपैकी मेसर्स रे.कन्स्ट्रक्शन यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १३% जास्त दराची निविदा आहे. दर जास्त असल्याकारणज्ञने संबंधित गुत्तेदारास वाटाघाटी करिता मा.आयुक्त यांच्याकडे बोलाविले असता संबंधिताने सदरील काम १३% जास्त ऐवजी १०% जास्त दराने करण्यास सम्मती दर्शविलेली आहे.

करिता निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला भवानी नगर व निजामगंज भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता गुत्तेदार श्री.रे.कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित संस्थेकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १०% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९१/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हमालवाडी, रेल्वेस्टेशन येथे खडी रस्ता व डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर. दराने रक्कम रु.४४,८९,२८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास दिनांक ११.०९.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरचा खर्च शासकीय अनुदानातून सन १९९१-९२ या सदरातून करण्यांत येईल. खडी रस्ता व डांबरीकरणाचे व खडी करणासाठी रक्कम रु.१९,७७,८८०/- चे कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/बांध-२/५८६९/९२, दि.२४.१२.९२ द्वारे दै.इंडियन एक्स्प्रेस व दै.लोकसत्ता या वर्तमानपत्रात जाहिरात देवून प्रगट निविदा मागविल्या असता एकूण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या. पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

१. श्री.डी.अजितसिंग - ०.०५% कमी दराने
२. श्री.एल.एम.पडघन - ५.५% जास्त दराने
३. श्री.एम.एस.जग्गी - ६.७% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हमालवाडी, रेल्वेस्टेशन येथे खडी रस्ता व डांबरीकरण करणेच्या कामापैकी खडी रस्त्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री.डी.अजितसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९२/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हॉटेल पंचवटी ते हॉटेल नंदनवन या ८० फुट डी.पी.रोडवर मध्ये दुभाजक टाकणेच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.१,७५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास दि.२९.०६.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च शासकीय अनुदान सन १९९०-९१ या सदरातून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बां-२/५८६९/९२, दि.२४.१२.९२ द्वारे दै.इंडियन एक्स्प्रेस व दै.लोकसत्ता या वर्तमानपत्रात जाहिरात देवून प्रगट निविदा मागविल्या असता एकूण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या. पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ४.९५% जास्त |
| २. | श्री.एल.एम.पडघन | - | ७% जास्त |
| ३. | श्री.एम.एस.जग्गी | - | ९.२०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५% जास्त दराची मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल पंचवटी ते हॉटेल नंदनवन या ८० फुट डी.पी.रोडवर मध्ये दुभाजक टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.५०% जास्त दराच्या मे.एस.एच.असोशिएटस यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९३/१३ :**

मुल्य निर्धारण अधिकारी १ व २ यांनी प्रस्ताव दिला आहे की, सन १९९३-९४ या पुढील वित्तीय वर्षासाठी औरंगाबाद मनपा क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे प्रकरण-९ व कलम ९९ अन्वये मनपाने दिनांक २०.०२.९३ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजूर करणे आवश्यक आहे.

त्यानुसार सन १९९३-९४ या वित्तीय वर्षासाठी खालील दर स्थायी समितीचे मंजूरीस्तव प्रस्तावित आहेत. खालील दराचे दर हे कर योग्य मुल्यावर आकारले जातील.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | - | ३०% (सध्या अमलात असलेला २२% ऐवजी ३०%) |
| २. | सर्वसाधारण पाणीपट्टी | - | ३ % (सध्या अमलात असलेला २२% ऐवजी ३०%) |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | साफसफाई कर निवासी वापर | - | ३% १२९ (ब) प्रमाणे (निवासेत्तर वापर - ६% (सहा) १३७ प्रमाणे) |
| ४. | वृक्ष कर | - | ०.५०% |
| ५. | अग्निशमन कर | - | ०.७५% |

तसेच राज्य शिक्षण कर व रोजगार हमी उपकर या कराची आकारणी कर योग्य मुल्यावर खालीलप्रमाणे व दराने शासन निर्णयानुसार करण्यांत येईल.

| अ.क्र. | करयोग्य मुल्य | राज्य शिक्षण कर | | रोजगार हमी उपकर |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | निवासेत्तर | निवासेत्तर |
| १. | रु.१ ते ७४ | -- | -- | -- |
| २. | रु.७५ ते १५० | २% | ४% | १% |
| ३. | रु.१५० ते ३०० | ३% | ६% | १.५०% |
| ४. | रु.३०० ते ३००० | ४% | ८% | २% |
| ५. | रु.३००० ते ६००० | ५% | १०% | २.५% |
| ६. | रु.६००० ते त्यापेक्षा जास्त | ६% | १२% | ३% |

मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर हे शासनाचे नियमाप्रमाणे करयोग्य मुल्याचे १०% सहान जागेवरील कर करयोग्य मुल्यावर सामान्य कराचे दराने तरी वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेले मालमत्ता कराचे दराने प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ कलम ९९ अन्वये सन १९९३-९४ या वित्तीय वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तावरील मालमत्ता कराचे दर कर योग्य मुल्यावर खालीलप्रमाणे आकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | - | ३०% ऐवजी २५% सध्या अमलात असलेला दर २२% ऐवजी २५%) |
| २. | सर्वसाधारण पाणीपट्टी | - | ३% (मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे कलम १३० प्रमाणे व ज्या घरांना मनपाचे नळ नाही.) |
| ३. | साफसफाई कर | - | निवासी वापराकरिता ३% कलम - १२९ (ब) प्रमाणे निवासेत्तर वापराकरिता - ६% (सहा) कलम १३७ प्रमाणे. |
| ४. | वृक्ष कर | - | ०.५०% |
| ५. | अग्निशमन कर | - | ०.७५% |

तसेच शासन निर्णयानुसार राज्य शिक्षण कर व रोजगार हमी उपकर या कराची करयोग्य मुल्यावर खालील दराने कर आकारणी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | करयोग्य मुल्य | राज्य शिक्षण कर | | रोजगार हमी उपकर |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | निवासेत्तर | निवासेत्तर |
| १. | रु.१ ते ७४ | -- | -- | -- |
| २. | रु.७५ ते १५० | २% | ४% | १% |
| ३. | रु.१५० ते ३०० | ३% | ६% | १.५०% |
| ४. | रु.३०० ते ३००० | ४% | ८% | २% |
| ५. | रु.३००० ते ६००० | ५% | १०% | २.५% |
| ६. | रु.६००० ते त्यापेक्षा जास्त | ६% | १२% | ३% |

याशिवाय शहरातील मोठ्या निवासी क्षेत्रावर शासनाचे नियमाप्रमाणे कर योग्य मुल्याचे १०% मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर आणि सहान जागेकरिता कर योग्य मुल्यावर सामान्य कराचे दराने कर आकारणी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

प्रस्तावाची तातडी लक्षात घेता सदर प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांत येते.

**विषय क्र.४९४/१४ :**

जकात अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम - १९४९ चे कलम -९९ अन्वये पुढील आर्थिक वर्षासाठी सन १९९३-९४ साठी सन १९९२-९३ या वर्षात ज्या दराने जकात कर वसुल केल्या जात होता. त्याच दराने पुढील वर्षात जकात कर वसुल करण्याबाबत प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** लोखंड, मार्बल, लोखंडी पत्रे, प्लायवुड इत्यादी आयात होणाऱ्या मालाचे मार्केट रेट काय आहे. त्यावर जकात कशी आकारली जाते याचा खुलासा व्हावा.

**जकात अधिक्षक :** स्टीलसाठी सध्या रु.१,११०/- प्रति टन मार्केट रेट आहे. मार्केट रेटचे टेबल (तक्ता) उपलब्ध आहेत. जकात निरिक्षक आयात होणाऱ्या पत्र्यासाठी त्याबाबतचे जे बिल असेल त्याप्रमाणे जकात वसुल करतात.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** मार्केटमध्ये स्टील, मार्बल, लोखंडी पत्रे, प्लायवुड इत्यादी मालाचे दर कमी जास्त होतात. तेव्हा त्याप्रमाणेच जकात वसुल करणे बाबत सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समितीची मंजूरी घेतली आहे काय? याबाबत महापालिका अधिनियम प्रमाणे खुलासा व्हावा.

**जकात अधिक्षक :** अशा प्रकारची मंजूरी घेतलेली नाही.

**मा.उपआयुक्त :** जकात कर वसुल करतांना चालु मार्केट दराने जकात कराची वसुली करावी असे स्थायी आदेश दिलेले आहेत. मार्केटमध्ये सर्वच वस्तुंचे दर कमी जास्त होतात.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** जकात विभागात गेल्या सात/आठ वर्षापासून जे कर्मचारी सतत काम करतात त्यांच्या बदल्या करण्याबाबत वेळोवेळी मागणी करण्यांत आलेली आहे. नियमाप्रमाणे एकाच विभागात तीन वर्षापेक्षा जास्त काळ काम

करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या कराव्या असा नियम आहे. तेव्हा प्रशासनाने याबाबत खुलासा करावा.

**मा.उपआयुक्त :** ज्या ज्या वेळी कर्मचाऱ्यांच्या बदल्याचा प्रश्न सभागृहात उपस्थित झाला त्या त्यावेळी मार्चनंतर सर्वच कर्मचाऱ्यांच्या नियमाप्रमाणे सार्वत्रिक बदल्या करण्यांत येतील असा खुलासा करण्यांत आला आहे. तेव्हा त्याचबरोबर जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्याही बदल्या करण्यांत येईल. तसेच मार्केटरेट बाबत जकात अधिक्षक यांनी टाईम्स ऑफ इंडिया मध्ये प्रसिध्द होणारे बाजारभाव प्रत्येक आठवड्याल्या त्यांचे कार्यालयात व आवश्यक त्या ठिकाणी लावण्याची व्यवस्था करावी.

**श्री.जावेद हसन खान, श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.अलिम बेग, श्री.तुळशीराम भगुरे :** सभागृहातील चर्चेनुसार कमलनयन बजाज हॉस्पीटलचे जकात कर व मालमत्ता कर माफीबाबत खुलासा व्हावा.

**मुल्य निर्धारण अधिकारी :** सर्वसाधारण सभेच्या निर्णयाप्रमाणे सदर संचिका सादर करण्यांत आली आहे.

**श्री.अलिम बेग, श्री.जावेद हसन खान :** जकात करात नजरचुकीचे माफी देण्यांत आली असा खुलासा मा.आयुक्त यांनी केला आहे. तेव्हा कमलनयन बजाज हॉस्पीटल यांना मालमत्ता करात सुट का देण्यांत आली? सदर हॉस्पीटल चारिटेबल ट्रस्ट असले तरी हया हॉस्पीटलमध्ये रुग्णांकडून मोठ्या प्रमाणावर फी वसुल केली जाते. जर चॅरिटेबल ट्रस्ट असलेल्या संस्थांना मालमत्ता करात माफी मिळत असेल तर अशा अनेक चारिटेबल संस्थांची प्रकरणे आम्ही आपल्या समोर सादर करु त्यांनाही मालमत्ता करात सुट दिली पाहिजे.

**मा.उपआयुक्त :** कमलनयन बजाज हॉस्पीटल या संस्थेस जकात करात माफी दिलेली नाही. कमलनयन बजाज हॉस्पीटल ही संस्था धर्मदाय आयुक्त नोंदणीकृत असल्यामुळे कलम १३२ प्रमाणे मालमत्ता कर माफ केला आहे.

**श्री.नारायण फत्तेलष्कर, श्री.अलिम बेग, श्री.तुळशीराम भगुरे :** कमलनयन बजाज हॉस्पीटल हया संस्थेस पत्र पाठवून त्यांचेकडील नियम व अन्य माहिती मागवून घ्यावी म्हणजे त्या संबंधीचे कागदपत्र पाहता येतील तसेच कमलनयन बजाज हॉस्पीटलची कार्यालयीन संचिका मागविण्यांत यावी.

**श्री.अलिम बेग, श्री.जावेद हसन खान :** कर्मचाऱ्यांचे बदली प्रकरणी मार्चनंतर कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यांत येतील. असा खुलासा केलेला असतांना रेंगटीपुरा शाळेतील शिक्षक आणि श्री.जाधव शिक्षक यांची बदली कशी करण्यांत आली याचा खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** श्री.जाधव शिक्षक यांचे बाबत आलेल्या तक्रारीवरुन त्यांची बदली करण्यांत आलेली आहे.

**श्री.जावेद हसन खान :** श्री.जाधव यांचेबाबत कोणी तक्रार केली आणि कशाप्रकारे तक्रार केली याची माहिती देण्यांत यावी.

**मा.उपआयुक्त :** शिक्षण अधिकाऱ्यांनी संबंधित संचिका सादर करावी.

**श्री.जावेद हसन खान :** आजच्या स्थायी समितीची उर्दू विषयपत्रिका मिळाली नाही म्हणून निषेध करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये सन १९९३-९४ या वर्षाकरिता सन १९९२-९३ या वर्षात ज्या दराने जकात कर

वसुल करण्यांत येत होती. त्याच दराने सन १९९३-९४ या वर्षात जकात कर वसुल करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांत येते.

**विषय क्र.४९५/१५ :**

मा.शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका वाचनालयासाठी १९९२-९३ च्या आर्थिक तरतूदीस अधीन राहुन पुस्तके खरेदी करावयाची आहेत. पुस्तके खरेदी साठी पुस्तकांच्या यादया व दर मागविण्यांत आलेले आहेत. सदरील दर खालीलप्रमाणे दि.०५.१२.९२ व दि.१८.१२.९२ च्या लोकमत मधील जाहिरातीप्रमाणे एकुण ९ निविदा प्राप्त झाल्या.

| **पुस्तके प्रकार** | **सर्वाधिक सुट** | **त्यापेक्षा कमी** | **त्यापेक्षा कमी** |
|---|---|---|---|
| | **(अ)** | **(ब)** | **(क)** |
| मराठी पुस्तके | १५% | -- | -- |
| हिंदी पुस्तके | १५% | १०% | -- |
| इंग्रजी पुस्तके | २५% | १५% | १०% |
| उर्दू पुस्तके | १०% | -- | सुट नाही |
| संदर्भिय पुस्तके | १५% | १०% | -- |
| अ) मराठी | १५% | १०% | -- |
| ब) हिंदी | १५% | १०% | -- |
| क) इंग्रजी | २५% | १५% | १०% |
| ड) उर्दू | १०% | सुट नाही | -- |
| शासकीय प्रकाशने | १०% | सुट नाही | -- |
| लॉ बुक्स | १०% | सुट नाही | -- |
| क्रमिक पुस्तके | १०% | ५% | सुट नाही |
| बालवाडी मप | २५% | १५% | १०% |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९२-९३ च्या आर्थिक तरतूदीतून मनपा वाचनालयासाठी खरेदी करावयाच्या प्रस्तावित पुस्तकांपैकी सर्वाधिक सुट २५% याप्रमाणे रक्कम रु.५०,०००/- खर्चाची इंग्रजी पुस्तके खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

तसेच प्रस्तावित अन्य पुस्तके खरेदीसाठी संबंधित दरपत्रक धारकांना वाटाघाटीसाठी बोलावण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९६/१६ :**

औरंगाबाद महानगरपालिकेने १९८९-९० साली दिल्ली गेट येथील ६० फुट व १०० फुट रुंद रस्त्याचा विकास करणे कामी दिल्लीगेटच्या पश्चिमेस कडील काही मिळकती संपादन केल्या असून संपादनावर शिल्लक मिळकती नगर भूमापन क्र.११५९२/१, ११५९२/२, ११४४५/१, ७४६६/१, ७४७०/१, ७४७१/१ हयांचे मालकांशी संपादनाबाबत समक्ष चर्चा करुन जमिनीचा दर निश्चित केला असून रस्त्यात बाधित होणाऱ्या मिळकती खालील दर्शविलेल्या तपशिलासह संपादन करुन जमीन मालकांना मोबदला देणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर मंजूरीसाठी करणेत येत आहे.

| न.भु.क्र. | बाधित क्षेत्र चौ.मी. | दर चौ.मी. | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) ११५९२/१ | १५७.५ | ५५०.०० | ८६६२५.०० |
| २) ११५९२/२ | २१३.१ | | ११७२०५.०० |
| ३)११४४५/१ | ७३२.२ | | ४०२७१०.०० |
| ४) ७४६६/१ | १८७.३५ | | १०३०४२.०० |
| ५) ७४७०/१ | ८१.०० | | ४४५५०.०० |
| ६) ७४७१/१ | १३०.० | | ७१८८५.०० |

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**नगररचनाकार :** प्रशासनातर्फे सादर करण्यांत आलेल्या प्रस्तावात नगरभूमापन क्रमांक-११५९२/१ व ११५९२/२ या ऐवजी ११५९१/१ व ११५९१/२ असे वाचावे तसेच प्रशासनाच्या मुळ प्रस्तावित दर निश्चित करतेवेळी जमिनीचा दर रुपये ५५० प्रति चौ.मीटर व बांधकामासाठी रु.१०७ प्रति चौरस मिटर असा काढण्यांत आला असून सदर प्रस्तावात बांधकामासाठीचे दर नमूद केलेले नाहीत. कृपया बांधकाम साहित्याचा खर्च रु.१०७ प्रति चौरस मिटर दराने मंजूरीसाठी सादर.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्याने खुलासा केल्याप्रमाणे आवश्यक ती दुरुस्ती करण्यांत यावी. तसेच या मिळकतीसोबतच श्री.अंभोरे यांची मिळकत संपादन करण्याबाबत काय कार्यवाही झाली. याचा खुलासा संबंधित अधिकाऱ्यांने करावा.

**नगररचनाकार :** दिल्ली गेट येथील जमीन संपादनाची कार्यवाही करतेवेळी नगरभूमापन क्र.७४७७ ही जागा अंभोरे यांचे नांवे नव्हती आता या जागेचे नामांतर झाले आहे. त्यामुळे संपादनाचे वेळी त्याबाबत कार्यवाही झाली नाही. नगर भुमापन क्रमांक ७४७७ ही आरक्षण क्रक.३२ खुली जागा व डी.पी.रोड दिल्ली गेट मध्ये बाधित झालेली आहे. नगर भूमापन क्रमांक-७४७७ या जागेचा भागश: भाग बाधित होत असून बाधित होणाऱ्या जागेचे क्षेत्र ११२.३६ चौरस मिटर आहे. तेव्हा इतरांप्रमाणेच श्री.अंभोरे यांना मोबदला देता येईल.

**मा.सभापती :** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आवश्यक त्या दुरुस्ती व वाढ यासह ठरावास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्लीगेट येथील ६० फुट व १०० फुट विकास रस्त्याचे कामी दिल्लीगेटच्या पश्चिमेकडील खालील तक्त्यात दर्शविलेल्या मिळकती संबंधित मिळकतीचे मालकाशी संपादनाबाबत झालेल्या चर्चेनुसार जमिनीकरिता रु.५५०/- प्रति चौरस मिटर व बांधकामाकरिता रु.१०७/- प्रति चौरस मिटर या दराने संपादन करुन जमिन मालकांना मोबदला अदा करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | नगर भूमापन क्रमांक | बाधित क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | ११५९१/१ | १५७.५ |
| २ | ११५९१/२ | २१३.१ |

| | | |
|---|---|---|
| ३ | ११४४५/१ | ७३२.२ |
| ४ | ७४६६/१ | १८७.३५ |
| ५ | ७४७०/१ | ८१.०० |
| ६ | ७४७१/१ | १३०.०० |
| ७ | ७४७७ | ११२.३६ |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९७/१७ :**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी अध्यादेश काढून (अध्यादेश-२) (दि.०४.०१.९३) मुं.प्रा.म.अ.१९४९ चे कलम - १४८ मध्ये अे व १४८ सी अशी सुधारणा केली आहे. त्यानुसार (अ) कलम १४८ अे प्रमाणे मनपा शिक्षण कर खालील प्रमाणे प्रस्तावित आहे.

| | **इमारतीचे कर योग्य मुल्य रुपये** | **टक्केवारी (करयोग्य मुल्यावर)** |
|---|---|---|
| १. | १ ते १५० | माफ |
| २. | १५० ते ३०० | २% ऐवजी १% |
| ३. | ३००-३००० | ३% ऐवजी २% |
| ४. | ३०००-६००० | ४% ऐवजी ३% |
| ५. | ६००० व त्यापेक्षा जास्त | ५% ऐवजी ४% |

ब) तसेच कलम -१४८ सी प्रमाणे पथकर करयोग्य मुल्यावर ८% प्रस्तावित ऐवजी ५% आहे. मंजूरी झाल्यास सदर कराची अंमलबजावणी दिनांक ०१.०४.९३ पासून महानगरपालिका क्षेत्रातील इमारतीवर करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अध्यादेश २ दिनांक ०४.०१.९३ अन्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८ मध्ये १४८ अे व १४८ सी अशी सुधारणा केल्यामुळे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील इमारतीवर दिनांक ०१.०४.९३ पासून कलम-१४८ अे प्रमाणे खालील दर्शविलेल्या दराने शिक्षण कर आकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| | **इमारतीचे कर योग्य मुल्य रुपये** | **टक्केवारी (करयोग्य मुल्यावर)** |
|---|---|---|
| १. | १ ते १५० | माफ |
| २. | १५० ते ३०० | १% |
| ३. | ३००-३००० | २% |
| ४. | ३०००-६००० | ३% |
| ५. | ६००० व त्यापेक्षा जास्त | ४% |

ब) तसेच कलम - १४८ सी प्रमाणे करयोग्य मुल्यावर - ५% दराने पथकर आकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. प्रस्तावाची तातडी लक्षात घेता सदर प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांत येते.

**विषय क्र.४९८/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नारेगांव येथील पाण्याच्या टाकी इ.एस.आर.जवळील खुल्या जागेस कंपाऊंड बांधणे बाबत (पाण्यावर, दवाखाना,उद्यान या सर्वांना मिळून एकच कंपाऊंड वाल बांधकाम करता येईल.) अंदाजपत्रक रक्कम रु.२,०८,०८०/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यांत आलेले आहे. सदर कामाचा खर्च मागासवर्गीय कमकुवत घटकांसाठी ५% निधीतून करण्यांत येईल. तसेच मा.आयुक्त यांनी सदर अंदाजपत्रकास मंजूरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव येथील पाण्याच्या टाकीजवळील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरिता (पाण्यावर टाकी, दवाखाना, उद्यान या सर्वांना मिळून एकाच एकच संरक्षित भिंत बांधण्यात येईल) रक्कम रु.२,०८,०८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. सदर कामाचा खर्च मागासवर्गीय कमकुवत घटकांसाठी ५% निधीतून करण्यांत यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९९/१९ :**

शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला हर्सुल येथील रस्त्याचे रिमेटलिंग करण्याकरिता अंदाजपत्रक रक्कम रुपये १,८७,९००/- चे तयार करण्यांत आले असून ज्यास स्थायी समिती ठराव क्र.३८/७ दिनांक ०८.०६.९२ अन्वये मंजूरी मिळाल्यानंतर सदर कामाकरिता प्रगट निवेदनाद्वारे निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक ०३.११.९२ पर्यंत एकूण (४) चार कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांक ०९.११.९२ रोजी एकूण फक्त (३) तीन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या. सदर प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १२.११.९२ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडल्या असता ठेकेदारांनी पुढील प्रमाणे निविदेत दर दिल्याचे आढळले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.शेख करीम पटेल | - | ०.५% कमी |
| २. | श्री.टी.आर.पटेल | - | ८.५% जास्त |
| ३. | श्री.व्ही.आर.पाटील | - | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराची श्री.शेख करीम पटेल यांची निविदा मंजूर करणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील रस्त्याचे रिमेटलिंग करण्याच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.५% कमी दराच्या श्री.शेख करीम यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५००/२० :**

कार्यकारी अभियंता पा.पु.यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको भागातील जलवाहिनीच्या स्लुइझ व्हॉल्वच्या चेंबरसाठी एस.एफ.आर.सी.चे फ्रेम व कव्हर टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.४,८१,२८०/- चे तयार करण्यांत आले असून त्या सदरील

अंदाजपत्रकास स्थायी समितीचे ठराव क्र.३९०/२८ दि.०९.११.९२ अन्वये मान्यता मिळाली आहे.

जा.क्र./मनपा/पा.पु.-२/११४९/९२, दि.०३.१२.९२ अन्वये जाहिर सुचना देऊन सदरील कामासाठी बी-१ नमुन्यावर सिलबंद निविदापत्रके मागविण्यांत आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या दिनांकास एकूण दोनच निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अखेरच्या दिनांकास एकूण फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | के.के.मेनहोल अँड ग्रिटिग्ज कं. | - | १०.७३% जास्त दराने |
| २. | प्रीकॉस्ट कॉंक्रीट प्रॉडक्टस कं. | - | १८.३८% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या वरील प्राप्त निविदा पैकी के.के.मेनहोल ॲण्ड ग्रिटींग्ज कं.यांची निविदा सर्वात कमी म्हणजे १०.७३% जास्त दराची आहे.

मा.आयुक्तांचे दि.०९.०१.९३ रोजीचे आदेशान्वये सदरील एजन्सीज दराबाबत वाटाघाटी करिता बोलावण्यांत आले असता वाटाघाटा अंती ४.००% जास्त दराने सदरील एजन्सीने मालाचा पुरवठा करण्याचे मान्य केले आहे.

करिता के.के.मेनहोल ॲण्ड ग्रिटिंग्न कंपनीचे वाटाघाटी अंती अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.००% जास्त दराची निविदा स्विकारणेच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको भागातील जलवाहिनीच्या स्लुझ व्हॉल्वच्या चेंबरसाठी आवश्यक असलेले एस.एफ.आर.सी.चे फ्रेम व कव्हर या मालाचा पुरवठा करण्यासाठी मे.के.के.मेन होल ॲण्ड ग्रिटींग्ज कंपनी यांचेशी झालेल्या दिनांक ०९.०१.९३ च्या वाटाघाटी नुसार अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने संबंधित संस्थेकडून मालाचा पुरवठा करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०१/२१ :**

मा.आयुक्त यांचे मंजूरीनुसार मालमत्ता अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की, श्रीमती रुपाबाई रामधन बिबने रा.हर्सुल यांनी हर्सुल येथील हनुमान मंदिरापासून उत्तर बाजूकडून देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील दक्षिणेस श्री.रमाकांत पांडव व शामलाल जैस्वाल या दोघांच्या घराचे मधील जागेपैकी - १०'x१५' आकाराची जागा मिरची कांडप व्यवसाय करणेसाठी भाडेपट्ट्याने मागणी केलेली आहे.

सदरहू जागा गावठाणची असून ग्रामपंचायत कडून महानगरपालिकेकडे आलेली आहे. अर्जदार यांनी मागणी केलेली १०'x१५' आकाराची जागा सहाय्यक संचालक, नगररचना ठरवतील त्या अटीशर्तीवर व भाड्याने १५ वर्षासाठी भाडेपट्ट्याने देणे बाबत विचार होणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील हनुमान मंदिरापासून उत्तर बाजूकडून देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील दक्षिणेस श्री.रमाकांत पांडव व शामलाल जैस्वाल या दोघांचे घरामधील ग्रामपंचायतीकडून नगर पालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या जागेपैकी १०'x१५' फुटाची जागा श्रीमती रुपाबाई रामधन बिबने रा.हर्सुल यांना मिरची कांडप

व्यवसायाकरिता सहाय्यक संचालक, नगररचना ठरवतील त्या अटी शर्तीवर भाड्याने पंधरा वर्षासाठी भाडेपट्ट्याने देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ११.०२.१९९३ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या विशेष स्थायी समितीचा वृत्तांत. गुरुवार दिनांक ११.०२.१९९३ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.सभापती ॲड.श्री.इकबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली समिती सभागृहात विशेष स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.भगुरे तुळशीराम छगन
२. श्री.अलिम बेग मिर्झा कलीम बेग
३. श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
४. श्री.जावेद हसन खान कसीम हसन खान
५. श्री.मोहंमद इस्माईल अ.करीम
६. श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
७. श्री.पेरकर विठ्ठल कोंडाजी

**विषय क्र.५०२/१ :**

सन १९९२-९३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन १९९३-९४ च्या मुळ अंदाजपत्रकास मंजूरी देणे बाबत.

**<u>संवाद :-</u>**

**मा.आयुक्त :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेचे सन १९९२-९३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन १९९३-९४ चे मुळ अंदाजपत्रक स्थायी समितीस सादर करण्यांत येत आहे. कृपया सदर अंदाजपत्रकास मान्यता देवून ते सर्वसाधारण सभेपुढे आवश्यक त्या शिफारशीसह सादर करण्यांत यावे. शासनाच्या आदेशाप्रमाणे या वर्षापासून पाणी पुरवठा व जलनि:सारण विभागाचे वेगळे "क" अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. (प्रशासकीय टिप्पणी सभागृहात वाचून दाखविण्यांत आली)

**श्री.तुळशीराम भगुरे :** प्रशासनातर्फे सादर केलेल्या अर्थसंकल्पात रुपये ७० लाख रुपयाचे कर्जाबाबत उल्लेख दर्शविला आहे. तेव्हा हे कर्ज मनपाला कोण देणार याचा खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त :** हुडको आणि प्रशासनामार्फत मनपा हे कर्ज घेणार असून बाकी शेअर महापालिकेत आहेत.

**श्री.अजिजुल्ला बेग :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ ब प्रमाणे सन १९९३-९४ या वर्षाकरिता प्रारंभीची शिल्लक १ लाख ८३ हजार असावयास हवी. तसेच विविध विभागाच्या कामासाठी करण्यांत आलेल्या तरतूदीमध्ये स्पील ओव्हरच्या कामाची रक्कम किती आहे. याचा खुलासा व्हावा. आणि स्पिल ओव्हर ची सर्व कामे चालु अर्थसंकल्पाचे सुरवातीपासून एक महिन्यात पुर्ण करण्यांत यावी अशी व्यवस्था करण्यांत यावी.

**श्री.मोहंमद इस्माईल :** प्रशासनातर्फे सादर करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकात ज्या ज्या भागातील रस्त्यांच्या विकासाचा उल्लेख केला आहे. त्यामध्ये रात्रंदिवस ज्या

रस्त्यावरुन रहदारी आहे. अशा रस्त्यांच्य उल्लेख करण्यांत आलेला नाही. उदा.रोषनगेट ते सेंट्रल गोडावून, टाकळकर सोसायटी या रस्त्यावर नेहमी वाहतुक असते. या रस्त्याच्या विकासाबाबत अंदाजपत्रकात कोणत्याही प्रकारची तरतूद दर्शविण्यांत आलेली नाही.

**उप अभियंता, बांध-२ :** रस्ते विकासासाठी झोनवाईज रस्त्यासाठी विशिष्ट रक्कम ठेवली आहे. या रकमेतून विविध रस्त्याच्या विकासाची कामे हाती घेता येईल.

**मा.आयुक्त :** १९९२-९३ वर्षात चालू असलेली कामे शक्य तो याच वर्षात पुर्ण करुन घेण्यांत यावी आणि २०% कामेच स्पील ओव्हर कामात रहावी. अशा प्रकारचा आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यांत आलेला आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग, श्री.गिरजाराम हाळनोर :** मालमत्ता व इतर करामध्ये वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावास स्थायी समितीने मंजूरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. या प्रस्तावांना सर्वसाधारण सभेतही मंजूरी मिळेलच त्यादृष्टीने मालमत्ता करात वाढ होणे आवश्यक आहे. नागरीकांकडून मालमत्ता कर व्यवस्थीत वसुल होत नाही. असा आमचा आरोप आहे.

**मा.आयुक्त :** सुधारित अंदाजपत्रकातील वाढीव तरतूद ही शासनाचे रु.६ कोटी अनुदान असल्यामुळे झाली आहे. आतापर्यंत वसुल झालेल्या मालमत्ता करामध्ये रु.५० लाख जादा वसुली झाली आहे. मार्च अखेरपर्यंत आणखी रु.५० लाख वसुल होण्याची अपेक्षा आहे. मालमत्ता कराची वादग्रस्त दोनशे प्रकरणे निकाली काढण्यांत आली आहेत. त्यातून मनपाचे उत्पन्न वाढले. सरकारी कार्यालयाकडे मालमत्ता कराची रुपये १ कोटी वसुली आहे. ती वसुली साधारणतः मार्च अखेर जमा होते. यानंतर सन १९९२-९३ चे सुधारित अंदाजपत्रक आणि १९९३-९४ चे मुळ अंदाजपत्रक यामध्ये स.सभासदांकडून दुरुस्त्या व वाढ सुचविण्यांत आली.

## १९९२-९३ चे सुधारित अंदाजपत्रकात सुचविलेल्या दुरुस्त्या

| अ. क्र. | पान क्र. | बाब क्र. | लेखा शिर्ष | मा.आयुक्तांनी सुचविलेली तरतूद | स्थायी समितीने मंजूर केलेली तरतूद | वाढ/घट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

**जमा बाजु**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | २ | १०ब | शहर विकास निधी | -- | ३००० | (+) ३००० | |
| | | | | | **३०००** | **(+) ३०००** | |

**खर्च बाजु**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ३ | ७अ | दि.०१.१०.६४ नंतर नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन | १००० | १० | (-) ९९० | |
| २) | २० | ३१ | धसारा निधी | १५०० | १०० | (-) १४०० | |
| ३) | २० | ३२ | वृक्ष अंशदान निधी | १००० | १०० | (-) ९०० | |
| ४) | २० | ३३ | राखीव पगार निधी | १००० | १०० | (-) ९०० | |
| ५) | २० | ३७ | सुधारित वेतनश्रेणी | ५००० | २००० | (-) ३००० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | थकबाकी | | | | |
| | | | | **९५००** | **२३१०** | **(-) ७१९०** | |

**क-अंदाजपत्रक खर्च बाजु**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | | ४ | शासकीय अनुदानातील कामे-१९९२-९३ | ९३०० | ३४२२ | (-) ५८७८ | |

## १९९३-९४ चे सुधारित अंदाजपत्रकात सुचविलेल्या दुरुस्त्या

**जमा बाजु**

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | १ | १-अ | जकात कर | १६०००० | १६५००० | (+) ५००० | |
| २) | १ | २-१ | सर्वसाधारण कर | ६०००० | ६२५००० | (+) २५०० | |
| ३) | १ | २-५ | पथ कर | --- | १८०० | (+) १८०० | |
| ४) | १ | २-६ | मनपा शिक्षण कर | --- | ७८२ | (+) ७८२ | |
| ५) | २ | ३-१ | करमणूक कर | ३०० | ५०० | (+) २०० | |
| ६) | २ | १०-ब | शहर विकास निधी | --- | ५००० | (+) ५००० | |
| ७) | ३ | १-क | इमारत/दुकान भाडे | १५५० | १६०० | (+) ५० | |
| ८) | ४ | २-क | मांस वाहतुक फी | ५० | १०० | (+) ५० | |
| ९) | ४ | १-क | रोड रोलर भाडे | १०० | २०० | (+) १०० | |
| १०) | ६ | ३-३-१-क | शेल्टर अपग्रेडेशन | --- | २०० | (+) २०० | |
| ११) | ७ | ३-६-१४ | २% रिबीट इ.जी.एस. | --- | ५०० | (+) ५०० | |
| १२) | ११ | २ | हडको कर्ज | --- | ६०० | (+) ६०० | |
| | | | | २२२००० | २३८७८२ | (+) १६७८२ | |

**महसुली खर्च** **खर्च बाजु**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ३ | ६-अ-१ | सभासदांचे मानधन व भत्ते | ३२५ | १००० | (+) ६७५ | |
| २) | ३ | ६-अ-२ | बैठक खर्च | ३०० | ४०० | (+) १०० | |
| ३) | ७ | १-क-१ | खोरी, घमेली, हातगाडी, वगैरे खरेदी | ८०० | १००० | (+) २०० | |
| ४) | १५ | १९-क-३ | व्यायाम शाळा साहित्य खरेदी | -- | १५० | (+) १५० | |
| ५) | १० | १० | पाहुणचार भत्ता मा.महापौर | ५ | ५० | (+) ४५ | |
| ६) | २० | ३६ | शहर सर्वेक्षण (सिटी सर्व्हे) | १०० | २००० | (+) १९०० | |
| | | | | **१५३०** | **४६००** | **(+) ३०७०** | |

**भांडवली खर्च**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | २२ | १-१ | झोपडपट्टी सुधारणा | ५००० | ६००० | (+) १००० | |
| २) | २२ | ३-७ | उर्दू वाचनालय | --- | २०० | (+) २०० | |
| ३) | २२ | ३-८ | सामान्य वाचनालय | --- | २०० | (+) २०० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४) | २३ | ३ | नाला ट्रेडिंग | १०० | ५०० | (+) ४०० | |
| ५) | २३ | ४ | सिकंदर अली वज्द मेमोरियल | ५०० | १००० | (+) ५०० | |
| ६) | २३ | ७ | मा.सभासदांचा स्वेच्छा निधी | ४५०० | ७८०० | (+) ३३०० | |
| ७) | २३ | १२-ब | शेल्टर अपग्रेडेशन | --- | ८०० | (+) ८०० | |
| | | | | **१०१००** | **१६५००** | **(+) ६४००** | |
| **एकूण महसुली व भांडवली खर्च** | | | | **११६३०** | **२११००** | **(+) ९४७०** | |

**"क" अंदाजपत्रक**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ७ | ४ | शासकीय अनुदानातील कामे | १९९२-९३ | ५८७८ | (+) ५८७८ | |

**मा.सभापती :** प्रशासनातर्फे दाखल करण्यांत आलेल्या सन १९९२-९३ चे सुधारित अंदाजपत्रक आणि १९९३-९४ चे मुळ अंदाजपत्रकात स.सभासदांनी सुचविलेल्या दुरुस्त्या आणि वाढ यांचा समावेश करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रशासनातर्फे सादर करण्यांत आलेल्या सन १९९२-९३ चे सुधारित अंदाजपत्रक आणि सन १९९३-९४ चे मुळ अंदाजपत्रकात स.सभासदांनी सुचविलेल्या वरील दुरुस्ती व वाढ सह सन १९९२-९३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन १९९३-९४ चे मुळ अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

## सन १९९३-९४ चे अंदाजपत्रक

**(आकडे हजारात)**

| **जमा** | | |
|---|---|---|
| प्रारंभी शिल्लक | - | ३८३ |
| महापालिका कर | - | १६९८० |
| विशिष्ट कायद्यान्वये येणारी वसुली | - | १६९८० |
| कराच्या व्यतिरिक्त मनपा च्या मिळकत व अधिकारापासून मिळणारे उत्पन्न | - | ७४०५ |
| देणग्या व अनुदाने | - | १०१२२५ |
| संकीर्ण | - | ७९५० |
| कर्ज | - | ६०० |
| अग्रीम वसुली | - | २९०० |

| **खर्च** | | |
|---|---|---|
| महसुली खर्च | - | २३४८५ |
| अ) सर्व सामान्य प्रशासन | - | १४३५० |
| ब) सार्वजनिक आरोग्य सुखसोई | - | ५८०३० |
| क) सार्वजनिक सुरक्षा | - | ३२३९० |
| ड) लोक शिक्षण | - | ३९८७५ |
| ई) संकीर्ण अग्रीम | - | ४००० |
| महसूली भांडवली खर्च | - | १७२१३० |
| १) झोपडपट्टी सुधारणा | - | ६००० |
| २) रस्ते बांधणी | - | २००० |
| ३) इमारती | - | |
| अद्यावत कत्तलखाना | - | ५०० |
| मटन बीफ मार्केट | - | १०० |
| खडकेश्वर वाचनालय | - | २०० |
| विकास इमारती | - | २५०० |
| उर्दू वाचनालय | - | २०० |
| सामान्य वाचनालय | - | २०० |
| इमारती व उर्वरित कामे | - | २००० |
| स्मशान भुमी | - | ५०० |
| इतर भांडवली कमे | - | |

| | | |
|---|---|---|
| नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड विकास | - | ५०० |
| पोहण्याचा तलाव | - | ८०० |
| नाला ट्रेनिंग | - | ५०० |
| सिकंदर अली वज्द मेमोरियल हॉल | - | १००० |
| शहराचे सौंदर्यीकरण | - | १००० |
| नविन वाहने खरेदी | - | १००० |
| मा.सभासदांचे मानधन | - | ७८०० |
| हरित औरंगाबाद | - | १०० |
| उद्यान (नवीन) | - | १००० |
| डी.पी.डी.सी. | - | १२०० |

**नेहरु रोजगार योजना**

| | | |
|---|---|---|
| अ) मापको इंटरप्राईजेस | - | १५०० |
| ब) शेल्टर अपग्रेडेशन | - | ८०० |
| क) ट्रेनिंग झोपडपट्या हलविण्याची नुकसान भरपाई | - | १०० |
| कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना | - | ३५०० |
| भुमी संपादन | - | ७५०० |
| विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण | - | १००० |
| नवीन पोल बसविणे (एम.एस.ई.बी.) सोसायटी | - | २००० |
| जी.आय.पोल. | - | ५००० |
| सर्वसामान्य पोल बसविणे | - | ३०० |
| रस्त्यावर गाड्या पार्कींग करणे | - | १०० |
| संशोधन केंद्र, मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र, | - | १०० |
| श्री.छत्रपती शिवाजी महाराज | - | १०० |
| साठा खरेदी | - | १०० |
| स्टेडियम | - | १०० |
| महिलांसाठी प्रसाधनगृह | - | २०० |
| शासकीय अनुदानातून करावयाच्या कामाच्या भागाचे एकत्रीकरण रस्ते बांधणी | - | ५३१०० |
| सार्वजनिक आरोग्य सुविधा | - | ७०० |
| नवीन उद्याने | - | ३००० |
| डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर | - | ५०० |
| एकूण भांडवली खर्च | - | १०५२०० |

**"क" अंदाजपत्रक**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पाणी पुरवठा विभाग | - | | पाणी पुरवठा | | |
| जमा बाजू | - | ६१०१० | महसुली खर्च | - | ११७७०० |
| जलनि:सारण विभाग | - | | जलनि:सारण विभाग | | |
| जमा बाजू | - | २११५५ | महसुली खर्च | - | ९०४४ |

**"क" विभागातील भांडवली खर्च**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १) लोक वर्गणी | - | १०००० |
| | | | | २) भांडवली खर्च | - | ५००० |
| | | | | ३) वायरलेस सेट | - | १००० |
| | | | | ४) भांडवली कामे सिडको | - | १५०० |
| | | | | ५) जलनि:सारण भांडवली कामे | - | ५००० |
| | | | | ६) एल.आय.जी.अंतर्गत गरीबांसाठी नवीन संडास बांधणे | - | ३१५० |
| | | | | ७) इ.डब्ल्यु.एस.अंतर्गत गरीबांसाठी नवीन संडास बांधणे | - | ११७०० |
| | | | | पाणी पुरवठा शासकीय अनुदानातून करावयाची कामे | - | ७०७५ |
| | | | | जलनि:सारण शासकीय अनुदानातून करावयाची कामे | - | ३०८७८ |
| | | | | एकूण महसुली खर्च | - | १७२१३० |
| | | | | एकूण भांडवली खर्च | - | १०७२०० |
| | | | | "क" विभागाचा महसुली खर्च | - | १२६७४४ |
| | | | | "क" विभागाचा भांडवली खर्च | - | ७४४०३ |
| | | | | अखेरची शिल्लक | - | ११३ |
| **दुबेरजी जमा** | **-** | **२४००० दुबेरजी** | | | | **२४०००** |
| | | | | | | |
| **एकूण** | **-** | **५०२५९० एकूण** | | | | **५०२५९०** |

वरीलप्रमाणे सन १९९२-९३ च्या सुधारित अंदाजपत्रकास आणि सन १९९३-९४ च्या मुळ अंदाजपत्रकातील जमा व खर्चास सर्वानुमते मंजूरी देवून सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.